मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २८ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.
**दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स**
भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर » मुंबई, मंगळवार, २४ सप्टेंबर २०२४ » वर्ष- २९ » अंक - ९४ » पाने- ८
आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ किंमत : ३ रुपये



चाईल्ड पॉर्न पाहणे, डाऊनलोड करणे हे देखील गुन्हेच

पान ८



# नराधम अक्षय शिंदेचा एन्काऊंटर

## पोलिसांनी केलेल्या गोळीबारात संशयास्पद मृत्यू

### माझ्या पोराला पैसे देऊन मारून टाकलं...
**अक्षयच्या बापाने फोडला हंबरडा**

- अक्षय शिंदेंच्या वडीलांनी आज थेट आरोप केला. ते म्हणाले की, पोलिसांनी सांगितलेलं सगळं खोटं आहे. माझ्या पोराला पैसे देऊन मारून टाकलं आहे. मी त्याला नुकतचं जाऊन भेटून आलो. त्याला साधं होळीची पिचकारी बंद नाही करता येत तर तो पोलिसांनी बंदूक कुठून चालवेल. तो कधी फटाकेही वाजवत नव्हता. याबाबत पोलिसांनीही आम्हाला काही सांगितलं नाही. मी टीव्हीवर पाहिलं तेव्हा मला ही घटना समजली.

### फरार आरोपींना वाचविण्यासाठी शिंदेचा एन्काउंटर केला का?



- या प्रकरणात पोलीस अधिकारी इतके बेसावध आणि निष्काळजीपणे आरोपींना घेऊन जातात का ? वरिष्ठ पातळीवरून फरार आरोपींना अटक करण्यासाठी टाळाटाळ केली जात आहे का ? फरार आरोपींना वाचवण्यासाठी या प्रकरणातील मुख्य आरोपीचे एन्काऊंटर करून प्रकरण संपवण्याचा प्रयत्न आहे का ? हे संपूर्ण प्रकरण दाबण्याचा वरिष्ठ पातळीवरच्या प्रयत्नांचा भाग म्हणून पोलिसांमार्फत आरोपीचे एन्काऊंटर केले आहे का? प्रकरण दाबण्याचा उत्तरेतील पॅटर्न महाराष्ट्रात आणला जात आहे का, असे सवाल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी उपस्थित केले आहेत.

प्रतिनिधी
ठाणे

बदलापूरमधील शाळेत चिमुरड्यांवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याला आज तळोजा कारागृहातून ठाणे येथे आणले जात असताना त्याने पोलिसांची बंदूक हिसकावली व त्यांच्यावर गोळीबार केला. यावेळी पोलिसांनी स्वसंरक्षणासाठी केलेल्या गोळीबारात अक्षय शिंदे याचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. अक्षयचा मृतदेह कळवा रुग्णालयात आणण्यात आला असून तेथे त्याच्या मृतदेहावर शवविच्छेदन होणार आहे.

अक्षयची पाहिली बायको त्याला लग्नानंतर पाच दिवसांनी सोडून गेली होती. तिने अक्षयवर बलात्कार आणि मारहाणीचा आरोप केला होता. अक्षयच्या पहिल्या पत्नीने दाखल केलेल्या गुन्ह्यांच्या संदर्भात चौकशीसाठी त्याला ताब्यात घेऊन बदलापूर पोलीस अक्षयचा ट्रान्झिट रिमांड घेण्यासाठी तळोजा कारागृहात गेले होते. आरोपी अक्षयला घेऊन सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास पोलीस पथक मुंब्रा बायपासजवळ पोहोचले. त्यावेळी शिंदे याने एका हवालदाराची बंदूक हिसकावून त्याच्यावर गोळीबार केला. प्रत्युत्तरादाखल, दुसऱ्या अधिकाऱ्याने त्याच्यावर गोळी झाडली, ज्यामुळे तो गंभीर जखमी झाला. रुग्णालयात नेले असता त्यांचा मृत्यू झाला.

### गृहविभागाचा अक्षम्य हलगर्जीपणा



*बदलापूर येथे दोन चिमुरड्यांवर झालेल्या अन्यायाला न्याय मिळण्यासाठी कायद्याच्या योग्य चौकटीतून फाशी झालीच पाहीजे होती. परंतू या घटनेतील मुख्य आरोपीला स्थलांतरीत करताना गृह विभागाने दाखवलेला हलगर्जीपणा संशयास्पद आहे. भविष्यात अशा निंदनीय कृत्याची कल्पनाही कोणाच्या मनाला शिवणार नाही यासाठी कायद्याचा धाक घालण्यात शासन दुर्बल ठरलंय, असे भासते. या घटनेच्या सखोल चौकशीतून वस्तूस्थिती समोर येणं अपेक्षित आहे, असं शरद पवार म्हणाले आहेत. राज्याच्या इतिहासात गृह विभागाच्या एवढ्या भयंकर कारभाराचा अनुभव प्रथमच येत आहे, असेही पवार या प्रकरणावर बोलताना म्हणाले.*

### शिंदेनंतर आपटे ?
**अशी होतेय चर्चा**

अक्षय शिंदेच्या एन्काउंटरनंतर आता पुतळा प्रकरणातील आरोपी जयदीप आपटे बाबतही विविध चर्चा सुरु झाल्या आहेत. कारण आपटे तुलनेने कमी सुरक्षा असलेल्या सावंतवाडीच्या जिल्हा कारागृहातील कोठडीत आहे. जसं बदलापूर प्रकरणातील आरोपी फरार आहेत त्याप्रमाणे मालवणच्या पुतळा प्रकरणातील मुख्य आरोपीबाबत प्रश्नचिन्ह कायम आहे. त्यामुळे शिंदे प्रमाणेच आपटेचाही गेम होणार का? अशी चर्चा एव्हाना सर्वत्र सुरु झाली आहे.

# आमचं सरकार आल्यावर मुंबई-गोवा महामार्गाची चौकशी करु

## शरद पवार यांचे प्रतिपादन



प्रतिनिधी
चिपळूण

मुंबई-गोवा महामार्गावरील रस्त्याच्या कामात मोठा भ्रष्टाचार झाला आहे. दोन महिन्यानंतर आमचे सरकार आल्यानंतर आम्ही रस्त्याच्या कामांची चौकशी लावू आणि जनतेला चांगले रस्ते देऊ, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार म्हणाले.

चिपळूण येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी शरद पवार यांनी कराडवरून चिपळूणला येताना आलेला खराब रस्त्याचा अनुभव सांगितला. ते म्हणाले की, मी काल कराड मार्गे चिपळूणला आलो. अतिशय खराब रस्त्याचा अनुभव घेतला. रस्त्यावर अनेक खड्डे पडले आहेत. मुंबई-गोवा महामार्गाची अवस्थाही तीच आहे. हा सरकारचा बेफिकिरपणा आहे. चिपळूण येथे कोसळलेल्या ओवरब्रिजचा उल्लेखही त्यांनी यावेळी केला.

महाविकास आघाडीचे जागावाटप लवकर पान 8 वर

### कोणत्याही मुख्यमंत्र्याची पुढची पिढी अशी नाही...

*शरद पवार यांनी सोमवारी आपल्या वादग्रस्त विधानांमुळे कायम वादात राहणाऱ्या भाजप आमदार नितेश राणे यांचा चांगलाच समाचार घेतला. सिंधुदुर्ग जिल्ह्याने महाराष्ट्राला एक मुख्यमंत्री दिला. पण त्यांचे चिरंजीव हल्ली ज्या पद्धतीने बोलतात, ते पाहता महाराष्ट्राच्या इतिहासात कोणत्याही मुख्यमंत्र्यांची पुढची पिढी अशी झालेली नाही. आज या लोकांची भाषा कशा प्रकारची आहे ते पाहा, असे ते म्हणाले. पवार म्हणाले, सत्ता येते व जाते. सत्ता असते तेव्हा जमिनीवर पाय ठेवायचे असतात आणि सत्ता नसेल तेव्हा चिंता करायची नसते. काम करत राहायचे असते. सत्तेच्या राजकारणात संयम ठेवायचा असतो.*

## म ह त्वा चे

### मंत्रालयातील 'मुख्यमंत्री वॉर रुम'चे उद्घाटन

**मुंबई, :**मंत्रालयातील सातव्या मजल्यावरील नूतनीकरण केलेल्या 'मुख्यमंत्री वॉर रूम' आणि म्युरल (भित्तीचित्र) चे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते रिमोटची कळ दाबून आज करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक ब्रिजेश सिंह आदी उपस्थित होते. उद्घाटनानंतर मुख्यमंत्री शिंदे यांनी वॉर रूममधील सोयी सुविधांची माहिती घेतली. प्रकल्पांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या डॅशबोर्ड, प्रकल्पाची फाईलची सद्यस्थिती, ज्या विभागाकडे प्रलंबित आहे, त्या विभागाला जाणारी नोटिफिकेशन आदींबाबत माहितीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी घेतली. या सर्व पद्धतीमुळे प्रकल्पाला गती मिळून विहित कालावधीत प्रकल्प पूर्ण होण्यास मदत होणार आहे.

### बस नदीत कोसळली; अपघातात 6 सरकारी कर्मचारी ठार

**अमरावती :** आज खासगी प्रवासी बस पुलावरुन नदीत कोसळल्यानं मोठी खळबळ उडाली. ही घटना मेळघाटातील सोमाडोह परिसरात धारणीजवळ घडली. या अपघातात तब्बल 6 प्रवाशांचा मृत्यू झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या बसमधून शिक्षक आणि शाळेवरील कर्मचारी प्रवास करत असल्याची माहिती घटनास्थळावरील नागरिकांनी दिली आहे. शनिवारी आणि रविवारी सुट्टी असल्यामुळे धारणी, हरीसाल, सेमाडोह या ठिकाणी शासकीय सेवेत असणारे अनेक कर्मचारी शुक्रवारी अमरावतीला आले. अमरावतीतूनच ही खासगी बस सुमारे 55 ते 60 प्रवाशांना घेऊन धारणीकडं निघाली होती.

# दहशतवाद जगासाठी गंभीर धोका

## संयुक्त राष्ट्रांच्या मंचावरुन पंतप्रधान मोदींनी दिला इशारा

वृत्तसंस्था
संयुक्त राष्ट्रे

आज युनायटेड नेशन्स जनरल असेंब्लीच्या 79 व्या सत्रात बोलताना पंतप्रधान मोदींनी जागतिक दहशतवाद आणि शांततेच्या मुद्द्यावर आपली महत्वपूर्ण प्रतिक्रिया दिली.

यूएनमध्ये बोलताना पंतप्रधान म्हणाले की, मी येथे भारताचा आवाज बुलंद करण्यासाठी आलो आहे. आम्ही भारतातील 25 कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढले आहे. शाश्वत विकास यशस्वी होऊ शकतो, हे आम्ही भारतात दाखवून दिले. यशाचा हा अनुभव जगासोबत शेअर करण्यास आम्ही तयार आहोत.



मानवतेचे खरे यश आपल्या सामूहिक सामर्थ्यात, युद्धभूमीवर नाही. जागतिक शांतता आणि विकासासाठी जागतिक संस्थांमधील सुधारणा महत्त्वाच्या आहेत.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, एकीकडे दहशतवाद हा जागतिक शांतता आणि सुरक्षेसाठी गंभीर धोका आहे, तर दुसरीकडे सायबर सुरक्षा, सागरी आणि अवकाश ही संघर्षाची नवीन क्षेत्रे बनत आहेत. तंत्रज्ञानाच्या सुरक्षित आणि जबाबदार वापरासाठी संतुलित नियमन आवश्यक आहे. आम्हाला जागतिक डिजिटल प्रशासन हवे आहे, ज्यामध्ये सार्वभौमत्व आणि अखंडता अबाधित राहील. डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर (DPI) एक पूल बनावा, अडथळा नाही. जागतिक भल्यासाठी भारत आपला DPI सामायिक करण्यास तयार आहे. भाषणापूर्वी पंतप्रधान मोदींनी नेपाळचे पंतप्रधान केपी शर्मा ओली आणि पॅलेस्टाईनचे अध्यक्ष महमूद अब्बास यांच्यासह अनेक जागतिक नेत्यांसोबत स्वतंत्र बैठका घेतल्या.

## आतिशींनी मुख्यमंत्र्यांची खुर्ची रिकामी सोडली

# भरत राजाने जसे सिंहासनावर पादुका ठेवून राज्य केले त्याप्रमाणेच आम्ही दिल्लीचा कारभार पाहू!

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्री आतिशी यांनी सोमवारी पदभार स्वीकारला. आज सकाळी 12 वाजण्याच्या सुमारास त्या मुख्यमंत्री कार्यालयात गेल्या आणि सर्व औपचारिकता पूर्ण केली. यादरम्यान आतिशी यांनी सीएम ऑफिसमध्ये रिकामी खुर्ची सोडली आणि स्वतः दुसऱ्या खुर्चीवर बसल्या.

आतिशी म्हणाल्या, त्यांनी




ही रिकामी खुर्ची अरविंद केजरीवाल यांच्यासाठी सोडली आहे. मला पूर्ण विश्वास आहे की, फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या निवडणुकांनंतर दिल्लीची जनता केजरीवाल यांना पुन्हा या खुर्चीवर बसवेल. तोपर्यंत ही खुर्ची याच खोलीत राहून केजरीवालजींची वाट बघेन.

दिल्ली मद्य धोरण प्रकरणात 13 सप्टेंबर रोजी जामिनावर बाहेर आल्यानंतर केजरीवाल यांनी 17 सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला होता. 21 सप्टेंबर रोजी आतिशी दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्री बनल्या.

# 'कुणबी'च्या तीन पोटजाती 'ओबीसी'मध्ये

## ब्राह्मणांसाठीही परशुराम महामंडळ

प्रतिनिधी
मुंबई

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात राज्य मंत्रिमंडळाच्या सोमवारी झालेल्या बैठकीत राज्यभरातील सरपंच व उपसरपंचांच्या मानधनात दुपटीने वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. सरकारच्या या निर्णयाचा फायदा राज्यभरातील हजारो सरपंच व उपसरपंचांना होणार आहे. दरम्यान, राज्य मंत्रिमंडळाने मंत्रिमंडळ बैठकीत ब्राह्मण समुदायासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा व पुणे विमानतळाला संत तुकाराम यांचे नाव देण्याचा निर्णयही हातावेगळा केला.

## कॅबिनेटमध्ये चोवीस निर्णयांचा धडाका

### सरपंच व उपसरपंचांचे मानधन दुप्पट

*सरपंच व उपसरपंच यांचे मानधन दुप्पट केले असून, ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी हे एकच पद करण्याबाबत आजच्या मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आल्याची माहिती ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. मंत्री महाजन म्हणाले की, राज्यातील सरपंच व उपसरपंच यांचे मानधन दुप्पट करण्यात आले असून ज्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या 2000 पर्यंत आहे त्या सरपंचाचे मानधन रु. 3000 वरुन रु. 6000. तर उपसरंपचाचे मानधन 1000 रुपये वरुन 2000 रुपये करण्यात आले आहे. ज्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या 2000 ते 8000 पर्यंत आहे त्या सरपंचाचे मानधन रु. 4000 वरुन रु. 8000. तर उपसरपंचाचे मानधन 1500 वरुन रु. 3000 करण्यात आले आहे.ज्या ग्रामपंचायतींची लोकसंख्या 8000 पेक्षा जास्त आहे त्या सरपंचाचे मानधन 5000 रु. वरुन 10,000 रु. तर उपसरपंचाचे मानधन 2000 रुपये वरुन 4000 रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.*

#### ग्रामविकास विभागाच्या 6 मागण्यांना मान्यता

आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत ग्रामविकास विभागांतर्गत येणाऱ्या 6 मागण्यांना मान्यता देण्यात आली. त्यात प्रामुख्याने राज्यातील सरपंच व उपसरपंच यांच्या मानधनात दुपटीने वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार, 2 हजार लोकसंख्या असणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सरपंचांचे मानधन 3 हजारांहून 6 हजार होईल. तर 1 हजार मानधन असणाऱ्या उपसरपंचाचे मानधनही 2 हजार रुपये होईल. 2 ते 8 हजार लोकसंख्या असणाऱ्या सरपंचांचे मानधनही या निर्णयामुळे 4 हजार रुपयांहून 8 हजार व उपसरपंचाचे मानधन 1500 हून 3 हजार रुपये होईल.

#### ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ

आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत ब्राह्मण समुदायासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचाही निर्णय घेण्यात आला. तसेच ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी हे पद एकच असल्यावरही शिक्कामोर्तब करण्यात आले. गत अनेक दिवसांपासून ग्रामसेवक




व ग्रामविकास अधिकारी हे पद एकच असावे, अशी मागणी केली जात होती. त्यानुसार मंत्रिमंडळाने यासंबंधीच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे.

#### शिरुर ते संभाजीनगर ग्रीन फील्ड एक्सप्रेस वे

मंत्रिमंडळाने शिरूर ते छत्रपती संभाजीनगर ग्रीन फिल्ड एक्सप्रेस महामार्ग उभारण्याचाही निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे 50 किलोमीटर रस्ता वाढणार, पण वाहतूक कोंडीचा मोठा प्रश्न सुटणार असा दावा केला जात आहे.

पान 8 वर



**मुंबई -** मुंबई उच्च न्यायालयाच्या वांद्रे,कलानगर येथील नवीन प्रस्तावित जागेचा भूमीपूजन सोहळा सोमवारी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या शुभहस्ते पार पडला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यासह सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती बी.आर. गवई, अभय ओक, दीपंकर दत्ता, उज्ज्वल भुयान, प्रसन्न वेराळे मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय, सॉलिसिटर जनरल देवांग व्यास, राज्याचे ॲडव्होकेट जनरल वीरेंद्र सराफ हे मान्यवर उपस्थित होते



## जव्हारचा 570 वर्षांची परंपरा असलेला उरुस 23 ते 25 सप्टेंबर दरम्यान साजरा होणार

**जव्हार :** जव्हार शहराला संस्थानाची पार्श्वभूमी लाभली आहे. राजाश्रय लाभल्याने अनेक चांगल्या परंपरा, रूढी येथे अनादी काळापासून आजही सुरू आहेत.जव्हारच्या मुकणे राजघराण्याचे राजगुरू असलेले श्री सदानंद महाराज यांचा ५७२ वा शाही उरुस २३ ते २५ सप्टेंबर या तीन दिवसात साजरा होणार आहे. जव्हारमधील हिंदू व मुस्लीम धर्मीय बांधव एकोप्याने हा उरुस वर्षानुवर्षे साजरा करतात. राष्ट्रीय एकात्मतेचे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणूनही त्याची नोंद आहे. हा उरुस भाद्रपद महिन्यात सप्तमी, अष्टमी व नवमी या तीन दिवसांमध्ये आयोजित केला जातो. आजही या तीन दिवशी येथे उरुस साजरा करण्यात येत आहे. यावेळी मुंबई, पालघर, तारापूर, डहाणू नाशिक, वसई , गुजराज, सेल्वासा आदी ठिकाणाहून भाविक येत असतात.तसेच लहान मोठी दुकाने, आकाश पाळणे, लहान मुलांसाठी विविध खेळ लागून मोठी यात्रा भरते .पूर्वी भाद्रपद वद्य प्रतिपदेपासून सप्तमीपर्यंत जुना राजवाडा येथील नगारखान्यातून नगारे वाजवले जात असत, कालांतराने ही प्रथा बंद झाली. तिसऱ्या दिवशी म्हणजे नवमीला सायंकाळी ख्वाजा पीर यांच्या संदल वाटपाचा कार्यक्रम श्रीमंत महेंद्रसिंह मुकणे राजेसाहेबांच्या उपस्थितीत होतो.



# थोडक्यात

## जूचंद्र येथे भाऊराव पाटील यांची जयंती साजरी

**विरार :** रयत शिक्षण संस्थेच्या जूचंद्र येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व एस.पी. ज्युनिअर कॉलेज येथे रविवार (ता. २२) कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक रंगनाथ नाडेकर, पर्यवेक्षक राजेंद्र काकड, संजय म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थी समूहाने रयत गीत सादर केले. विद्यार्थिनींच्या पथकाने ढोल-ताशांचे वादन व लेझीम नृत्य सादर केले. यावेळी मिरवणूक काढली. मिरवणुकीत रयत शिक्षण संस्थेचे सदस्य विनय पाटील, स्थानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष पुरुषोत्तम पाटील, उपाध्यक्ष विवेकानंद पाटील, सदस्य हरिहर पाटील, जितेंद्र भोईर, मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी, पालक सहभागी झाले होते. सूत्रसंचालन जान्हवी भोसले हिने केले. एस. व्ही. म्हात्रे यांनी आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी यासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली.

## गटाराचे झाकण तुटल्याने अपघाताची भीती

**मुंबई :** जोगेश्वरी पूर्वच्या आयकर वसाहतीच्या बसथांब्याजवळील रस्त्यावर गटाराचे झाकण तुटले आहे. त्यामुळे येथे अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सर्वोदयननगर, कोकणनगर, इन्कलाबनगर येथून ये-जा करणारी वाहने आणि पादचारी यांची मोठ्या प्रमाणात या विभागात वर्दळ असते. जवळच शाळा असल्याने बेस्ट बस व शाळेच्या बस समोरासमोर आल्यानंतर वाहतूक कोंडी होते. विशेष करून, शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिकांना प्रवास करताना मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. पालिकेने लवकरात लवकर झाकण बदलावे, अशी मागणी वाहनचालकांनसह नागरिक करीत आहेत.

## पश्चिम रेल्वेवर साडेसहा तासांचा ब्लॉक

**मुंबई :** पश्चिम रेल्वेवरील गोरेगाव आणि कांदिवली स्थानकांदरम्यान सहाव्या मार्गिकेच्या कामानिमित्त ब्लॉक मालिका सुरू आहे. सोमवारी मध्यरात्री साडेसहा तासांचा ब्लॉक घेण्यात येणार आहे. तर, मंगळवारी रात्री ११.३० ते पहाटे ५.३० वाजेपर्यंत साडेसहा तासांचा ब्लॉक असेल. पश्चिम रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री ११.३० ते रात्री ३.३० वाजेपर्यंत सर्व अप जलद मार्गावरील लोकल बोरिवली ते अंधेरी स्थानकांदरम्यान अप धीम्या मार्गावरून धावतील. मंगळवारी रात्री ११ ते पहाटे ५.३० वाजेपर्यंत सर्व अप आणि डाऊन मेल/एक्स्प्रेस अंधेरी ते बोरिवली दरम्यान अप आणि डाउन जलद मार्गावर धावतील. या ब्लॉकमुळे पश्चिम रेल्वेच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला असून अनेक लोकल रद्द करण्यात येतील.

### महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# बोईसर मतदारसंघ ठरणार आव्हानात्मक!

प्रतिनिधी
■ वसई

आगामी विधानसभा निवडणुकीची घोषणा येत्या नवरात्रोत्सव काळात होण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने बोईसर मतदार संघात राजकीय हालचालींना वेग आला आहे. येत्या विधानसभा निवडणुकीत बहुजन विकास आघाडी, महायुती व महा विकास आघाडी यांच्यासाठी हा गड आव्हानात्मक ठरणार आहे.

गेल्या वेळेस बोईसर मतदार संघात भाजपचे संतोष जनाठे यांनी बंडखोरी करत अपक्ष निवडणूक लढवली, त्याचा लाभ बहुजन विकास आघाडी होऊन या पक्षाचा आमदार केवळ अडीच हजार मतांनी जिंकला. यावेळेस मात्र भाजप अशा बंडखोरीपासून सावध आहे. त्यामुळे अशी बंडखोरी बोईसर मध्ये होणार नसल्याने बोईसर मध्ये यावेळेस बहुजन विकास आघाडीला गड राखण्यासाठी संघर्ष करावा लागेल.

तसेच दुसरीकडे मनसे राज्याच्या विधानसभा निवडणुकीत जोमाने उतरणार असल्याने बोईसर मध्येही मनसे रणांगणात उतरणार आहे. त्यामुळे इतर तुल्यबळ पक्षांसाठी ही निवडणूक आणखीच आव्हानात्मक ठरणार आहे.

बोईसर मधील महत्वाच्या ग्रामपंचायतींवर मनसेची सत्ता आहे. त्यामुळे मनसे येथे निर्णायक मते घेणार यात शंका नाही. मनसेच्या मतांचा लाभ मात्र कोणाला होईल हे आताच सांगता येणे कठीण आहे. मनसेचे पालघर जिल्हा अध्यक्ष अविनाश जाधव हे स्वतः या निवडणुकीसाठी मेहनत घेत असल्याने मनसेची एन्ट्री ही बहुजन विकास आघाडी, महाविकास आघाडी व महायुती यांच्यासाठी आव्हानात्मक ठरणार आहे. दुसऱ्या बाजूने सलग तीन वेळेस बोईसर राखणाऱ्या बहुजन विकास आघाडीला यंदाची निवडणूक सोपी नाही हे मात्र तितकेच खरे आहे.

# गोखिवरे तलावाचे अस्तित्व धोक्यात

## सोसायटी-झोपड्यांचे सांडपाणी तलावात; मनसे आक्रमक

प्रतिनिधी
■ वसई



वसई पूर्वेतील गोखिवरे येथील पालिकेच्या मालकीचा सार्वजनिक तलाव अद्याप संवर्धनाच्या प्रतिक्षेत आहे. इतर तलावांचे संवर्धन झालेले असताना तसेच काही तलाव संवर्धनाच्या वाटेवर असताना गोखिवरे तलाव कधी कात टाकणार असा सवाल उपस्थित होत आहे. दरम्यान, या तलावाचे संवर्धनाचे काम हाती घेतले न गेल्याने तलावात नजिकच्या रहीवाशी सोसायट्या व झोपडपट्ट्यांतील सांडपाणी सोडले जात असल्याने तलावाचे प्रदुषण वाढले आहे. तलावाचे अस्तित्वच त्यामुळे लोप पावण्याचा धोका असून याप्रकरणी मनसेचे वसई तालुकाध्यक्ष प्रवीण भोईर यांनी आक्रमक भुमिका घेतली आहे.


गोखिवरे तलावात गौरी-गणपतीचे व दुर्गामातांचे विसर्जन होत असते. तर उत्तर भारतीय नागरिकांच्या छटपुजेसाठीही तलावाचा वापर केला जातो. तलावाला मोठे धार्मिक महत्व असताना तलावात आजबाजूच्या सोसायट्यांतील तसेच झोपडपट्ट्यांतील सांडपाणी सोडले जात असल्याने मनसेचे तालुकाध्यक्ष प्रवीण भोईर यांनी आक्रमक भूमिका घेत पालिकेला तलावाचे संवर्धन व विकास करण्याचा इशारा दिला आहे. पालिकेने आपल्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केल्यास पालिकेला मनसेच्या तिव्र आंदोलनाला सामोरे जावे लागेल, असे त्यांनी म्हटले आहे.

या तलावाच्या बरोबर समोर ऐतिहासिक महत्व असलेले तसेच स्वत: नरवीर चिमाजी आप्पा यांनी वसईच्या मोहिम काळात बांधलेले भगवान महादेव श्री काशी विश्वेश्वरांचे मंदिर आहे. त्यामुळे ऐतिहासिक महत्व असलेल्या मंदिरासमोरील पालिकेचा तलाव अस्वच्छता व निगा न राखल्यामुळे काळवंडला आहे. पालिकेने तलावाची योग्य ती निगा राखणे गरजेचे असताना पालिका तलावाच्या संवर्धनाकडे काणाडोळा करत आहे. दरम्यान, गेले अनेक वर्ष या तलावात देव-देवतांच्या मुर्त्यांचे विसर्जन होत आहे. मात्र या तलावात विसर्जन घाट बांधण्याची तसदी पालिकेने घेतलेली नसल्याचे चित्र दिसून येते. हा तलाव मुख्य रस्त्याला लागून असतानाही उपेक्षित राहिला आहे. तर दुषित सांडपाण्यामुळे तलावातील मत्स्यजीव धोक्यात आला आहे. यावर आता मनसेने आक्रमक भूमिका घेतली आहे.

# मांडवी परिसरातील क्रेशर मशीनमुळे नदी, नाले दूषित

## निसर्गसंपदेलाही धोका

प्रतिनिधी
■ वसई



विरार पूर्वेकडील मांडवी येथे तुंगारेश्वर अभयारण्यलगत सुरू असलेल्या क्रेशर मशिन मधून येणाऱ्या पाण्यामुळे या परिसरातील नदी, नाले दूषित झाले आहेत.तसेच या परिसरातील निसर्गसंपदेलाही धोका निर्माण झाला आहे. नदी,नाले दूषित झाल्याने जंगली प्राणी तसेच या परिसरातील गोधन यांचा पाणी पिण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे नैसर्गिक संपत्तीला हानिकारक ठरणाऱ्या या प्रेशर मशीनवर कारवाई व्हावी अशी मागणी या भागातील निसर्गप्रेमी करत आहेत.

वसई तालुक्यातील निसर्ग संपदा या परिसरात होणाऱ्या दगड खाणीमुळे धोक्यात आली आहे तसेच या भागात प्रेशर मशीन सुरू झाल्याने त्यामधून निघणारे पाणी हे आता नदी,नाले दूषित करीत आहे. मांडवी परिसरात हीच अवस्था असून या परिसरात मोठ्या प्रमाणात क्रेशर मशीन सुरू आहेत. हा परिसर तुंगारेश्वर अभयारण्यलगत असल्याने या परिसरात सुरू असलेल्या क्रेशर मशीन मुळे परिसरातील झाडांवर धूळ जमा झाली असून ती नदी,नाल्यात जात असल्याने या नाल्याचेही पाणी सफेद झाले असून ते गोधनासाठी किंवा पाळीव प्राण्यासाठी पिणे धोक्याचे असल्याचे प्राणी तज्ञांचे मत आहे.

### तिघांच्या भांडणात क्रेशर मालकांचा लाभ

*मांडवी परिसरात तुंगारेश्वर अभयारण्य, वनविभाग, व वनविकास या तीन खात्यांकडे या परिसरातील जंगल असून सदर क्रेशर बाबत सदर खात्याकडे विचारणा केली असता ही हद्द आमची नाही असे अधिकाऱ्यांकडून उत्तर मिळत असल्याने नक्की ही हद्द आहे तरी कुणाची हा प्रश्न उभा राहिला आहे. त्यामुळे या ठिकाणी कोणताही विभाग तसेच महसूल विभाग ही कारवाई करत नसल्याने या तीन विभागाच्या भांडणात मात्र क्रेशर मशीन दिवस-रात्र सुरू असल्याने सदर व्यवसायिकांना या बाबीचा फायदा असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.*

# शनिवार , रविवारी 'काळा घोडा परिसर' वाहनांसाठी बंद

**मुंबई :** दक्षिण मुंबईतील ऐतिहासिक वारसा आणि पुरातन वास्तू असलेल्या काळा घोडा परिसरातील पाच रस्ते हे दर शनिवारी व रविवारी सायंकाळी केवळ पादचाऱ्यांसाठी खुले ठेवण्यात येणार आहेत. प्रत्येक शनिवारी आणि रविवारी सायंकाळी ६ ते रात्री १२ वाजण्याच्या दरम्यान वाहनांसाठी बंद राहतील. तसेच या संपूर्ण परिसराचे सुशोभीकरण करण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने घेतला आहे.

दक्षिण मुंबईतील काळा घोडा परिसर हा ऐतिहासिक आणि पुरातन खाणाखुणा जपणारा परिसर आहे. नागरिक, पर्यटक आदींची या भागात नेहमीच वर्दळ असते. पर्यटकांना 'हेरिटेज वॉक'चा आनंद घेता यावा, येथील पुरातन वास्तू न्याहाळता याव्यात या उद्देशाने काळा घोडा परिसरातील साईबाबा मार्ग, रोप वॉक लेन, व्ही. बी. गांधी मार्ग/फोर्ब्स स्ट्रीट, रुदरफोर्ड स्ट्रीट आणि बी भरुचा मार्ग हे पाच रस्ते प्रत्येक शनिवारी आणि रविवारी सायंकाळी ६ ते रात्री १२ वाजण्याच्या दरम्यान वाहनांसाठी बंद करुन केवळ पादचाऱ्यांसाठी सुरु ठेवण्याचा आणि या संपूर्ण परिसराचे सुशोभीकरण करण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने घेतला आहे.

# आम्ही सातारकर विकास प्रतिष्ठान संघटनेचा 10 ऑक्टोबरला साताररत्न पुरस्कार सोहळा

## पुरस्कारासाठी नामांकन पाठवण्याचे आवाहन

प्रतिनिधी
■ मुंबई

आम्ही सातारकर विकास प्रतिष्ठानच्या वतीने मुंबई, ठाणे व नवी मुंबई परिसरातील सातारावासियांचे स्नेहसंमेलन व दसरा मेळावा 10 ऑक्टोबर या दिवशी सायंकाळी छत्रपती शिवाजी मंदिर नाट्यगृह ,दादर येथे सायंकाळी 6 वाजता होणार असून त्यानिमित्ताने राजकीय, कला, प्रशासकीय, साहित्य, उद्योग, कामगार, कायदा, सहकार, वैद्यकीय, पत्रकारिता, शैक्षणिक, क्रीडा व सामाजिक अशा क्षेत्रातील किर्तीवंतांचा सातारा रत्न देऊन सत्कार करण्यात येणार आहे.

वरील विभागासाठी नामांकन पाठवण्यासाठी amhisatarkar12@gmail.com वर मेल करावा अथवा आम्ही सातारकर विकास प्रतिष्ठान व्दारा बी /१, प्रोग्रेसिव्ह बिल्डिंग, डॉक्टर कम्पाउंड ,चिंचपोकळी-पूर्व, मुंबई- १२ या पत्यावर प्रत्यक्ष किंवा कुरिअर ने 25 सप्टेंबर पर्यंत पोहचेल असे पाठवावे.

अधिक माहितीसाठी संपर्क ९९६७९१५५७७, ९९८७१९९५६५, ०२२ २३७४९६३८. 25 सप्टेंबर नंतर आलेल्या नामांकनाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. वरील नमुन्याप्रमाणे माहिती भरणा करून आवश्यक सांगितल्याप्रमाणे कागदपत्र जोडून वरील मेलआयडी दिल्याप्रमाणे मेल करावी अथवा वरील पत्यावर 25 sept पर्यंत पोहचेल असे कुरिअर करावे किंवा प्रत्यक्ष आणून द्यावे.15 पानी पेक्षा जास्त पानी फाईल असेल तर प्रत्यक्ष किंवा कुरिअर ने पाठवावी.25 सप्टेंबर नंतर आलेल्या नामांकनाचा विचार केला जाणार नाही.

# मनपाच्या 'निर्लज्जम सदा सुखी' या तत्वामुळे फसवणुकीचे प्रकार वाढले

## महाठगांच्या रडारवर सर्वसामान्य ग्राहक

प्रतिनिधी
■ वसई

सिडको प्रशासनाच्या बरखास्तीनंतर वसई- विरार शहर महानगरपालिका प्रशासनाला बांधकामांना परवानग्या देण्याचे अधिकार प्राप्त झाले, तेव्हापासून पालिकेतील बहुतांश अधिकारी पायाभूत विकासकामांची गंगोत्री वसई, विरारकरांना देण्याऐवजी अनधिकृत बांधकामांतून विनासायास पदरात पडणाऱ्या आर्थिक मोहमायेच्या मगरमिठीत गुंतून पडले आहेत. सध्याच्या प्रशासकीय काळात अशा स्वरूपाच्या व्यवहाराला भलतेच उत्तेजन मिळाले असून वाढत्या अनधिकृत बांधकामांना हातभार लावण्याच्या मानसिकतेतून सामान्य ग्राहकांना गंडा घालण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. गेल्या काही वर्षात सदनिका व चाळींतील रूम विकत देण्याच्या बहाण्याने महाठगांकडून लाखो रूपयांना सामान्य ग्राहकांची फसवणूक करण्याचे प्रकार वाढले असून कायदा-सुव्यवस्थेसमोर ते मोठे आव्हान ठरले आहे.

मुंबईत घर विकत घेणे सर्वसामान्य नोकरदार वर्गाच्या आर्थिक आवाक्याबाहेरचे ठरले आहे. त्यामुळे खिशाला परवडेल अशा दरातील घरे विकत देणारे शहर म्हणून वसई- विरार अशी ओळख या शहरांची झाली आहे. त्यामुळेच मुंबईतील सर्वसामान्य नोकरदार वर्ग तसेच छोटे मोठे व्यवसाय करून उदरनिर्वाह भरणारे नागरिक शनिवार-रविवार अशा सुट्टीच्या दिवसांत वसई- विरारमध्ये घर खरेदी करण्याच्या उद्देशाने येत असतात. मनासारख्या परिसरात घर मिळाले की ते ठरलेल्या रक्कमेनुसार सदनिका अथवा चाळीतील रूमचा सौदा करून ती विकत घेतात. मात्र बऱ्याचदा रूम खरेदी-विक्रीचा व्यवहार करताना आधी ग्राहकांकडून चांगला मोबदला घेऊन नंतर त्या ग्राहकांना महिनो न महिने ताटकळत ठेवले जाते. त्यामुळे कंटाळून ग्राहकाने रूमसाठी दिलेल्या पैशासाठी तगादा सुरू केल्यावर संबंधित बांधकामधारकाकडून पैसे देण्यास टाळाटाळ केली जाते. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच संबंधित ग्राहक पोलीस ठाण्यात धाव घेतात. मात्र तेथेही सरकारी काम नी बारा महिने थांब अशा प्रकाराचा त्यांना सामना करावा लागतो. कष्टाने मिळवलेला पैसा आयताच महाठग गिळंकृत करतो.

अलिकडच्या काही वर्षात सदनिका व रूम खरेदी-विक्रीतील प्रकार वाढले असून सर्वसामान्य ग्राहक हा महाठगांच्या रडारवर आला आहे. विविध पोलीस ठाण्यातदेखील बांधकामांतून होणाऱ्या फसवणूकीचे गुन्हे वाढत असून पोलिसांची डोकेदुखी वाढली आहे. वसई- विरार शहर महानगरपालिका प्रशासनाच्या प्रशासकीय काळात बोगस सीसी घोटाळ्यासारखा प्रकार ताजा असताना अनधिकृत बांधकामांवर कारवाया न करणाऱ्या पालिका प्रशासनाच्या उदासिन कारभारामुळे सर्वसामान्य जनता मात्र भरडली जात आहे. दरम्यान, नुकतेच वसई पश्चिमेतील माणिकपूर येथील एका ग्राहकाची सदनिकेच्या नावावर 2 लाख 25 हजारांची फसवणूक झाली असल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, एका बंगलो प्रोजेक्टमध्ये 50 टक्के भागिदारी देण्याच्या बहाण्याने भागिदाराने भागिदारालाच सुमारे 24 लाखांचा गंडा घातला असल्याप्रकरणी तुळिंज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाढत्या फसवणुकीच्या गुन्ह्यांमुळे सर्वसामान्य जनताही भयभित झाली असून अशा महाठगांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी होत आहे.

### सदनिका, रूम विक्रीसाठी विविध आमिषे

*एखाद्या बांधकाम प्रकल्पातील सदनिका किंवा चाळी विकण्यासाठी बांधकाम एजंटकडून खोट्या जाहिराती प्रसिद्ध करून ग्राहकांना गंडा घातला जात आहे. अमुक बांधकामात सदनिका किंवा रूम विकत घेतल्यास चांगल्या सुविधा मिळतील, पाण्याची, विजेची 24 तास सोय असेल अशा जाहिराती एजंटमार्फत केल्या जातात, मात्र प्रत्यक्षात सदनिका वा रूम खरेदी केल्यानंतर तेथे कोणत्याच प्रकारच्या सुविधा नसल्याचे ग्राहकांच्या लक्षात येऊन त्यांची फसवणूक होते. कधी कधी तर एकच रूम किंवा सदनिका दोन ग्राहकांना विकून लाखो रूपयांची फसवणूक महाठगांकडून होत आहे.*

# मध्य रेल्वेत इनडोअर प्लांट मोहीम

■ मुंबई

मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाच्या मानव संसाधन विभागाने शाश्वत आणि पर्यावरणपूरक कामाच्या वातावरणाला प्रोत्साहन देण्यासाठी एक उल्लेखनीय उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमामध्ये ४५० रेल्वे कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्यरत डेस्कवर ठेवण्यासाठी हे इनडोअर प्लांट देण्यात आले आहे.

मुंबई विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक रजनीश कुमार गोयल यांच्या हस्ते या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे उद्घाटन शुक्रवारी (ता. २०) करण्यात आले. या उपक्रमांतर्गत सर्व कर्मचाऱ्यांना हवा शुद्ध करणारे गुणधर्म असलेली लहान कुंडीत रोपे दिली गेली आहेत.

# रस्त्यावरील अनधिकृत फेरीवाले व पार्किंगमुळे बोरिवलीत डंपरच्या धडकेने शाळकरीविद्यार्थ्याचा मृत्यू

प्रतिनिधी
■ मुंबई

बोरिवली पूर्व येथील कस्तुरबा क्रॉस रोड न २,३आणि ७ वरील फेरीवाले आणि वाहनांची अनधिकृतपणे रस्त्यावर पार्किंग होत असल्यामुळे रस्त्याची रुंदी कमी होते त्यामुळेच काल या मार्गावर एका शाळकरी विद्यार्थ्याचा डंपर धडकेने एका शाळकरी विद्यार्थ्याचा मृत्यू झाला आहे. फेरीवाले व अनधिकृत पार्किंग करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक प्रभाग क्रमांक १३ चे माजी. नगरसेवक विद्यार्थी सिंह यांनी अत्रिक्त पालिका आयुक्त( पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा यांच्याकडे लेखी स्वरूपात केली.आहे.

बोरीवली पूर्व मध्ये कस्तुरबा क्रॉस रोड न ३ वर डंपर च्या धडकेने या शाळकरी विधार्थ्याचा मृत्यू झाला आहे कस्तुरबा क्रॉस रोड न ३, क्रॉस रोड न २ आणि ७ अत्यंत चिंचोळा मार्ग असून रस्ताच्या दुतर्फा बसलेल्या फेरीवाल्या मुळे नागरिकांच्या येण्याजाण्याचा सर्व रस्ता ब्लॉक होतो.

तसेच अनधिकृतपणे उभी केलेली पार्किंग वाहनेही रस्ता अडवतात त्यामुळे वाहने जाण्यासाठी रस्ताच शिल्लक राहत नाही. या उद्भवलेल्या परिस्थितीमुळे काल एका इवल्याशा निष्पाप जीवाचा अपघातात मृत्यू झाला

पालिकेने आतातरी ह्या फेरीवाल्यावर आणि अनधिकृत पार्किंग वाहनावर कडक कारवाई करावी अशी अपेक्षा आहे.व त्वरित कारवाई झाली तर अशा अपघाताच्या घटना घडणार नाहीत. असेही विद्यार्थी सिंह यांनी पत्रात म्हटले आहे.

### जाहीर सूचना

या नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, गाव मौजे विरार, तालुका वसई, जिल्हा पालघर येथील सर्व्हे क्र. २९८क, क्षेत्र हे. आर. ०-०७-४९, ही मिळकत माझे अशिल १) श्री. मोतीराम उद्धव पितळे, २) श्री. शरद उद्धव पितळे, ३) सौ. वर्षा उल्हास कारेकर, ४) श्री. पराग हरिश्चंद्र पितळे, ५) श्रीमती अम्रिता हरिश्चंद्र पितळे, ६) सौ. मनिषा सुनिल दुधानी, पत्ता. वर्तक रोड, विरार (पश्चिम), तालुका वसई, जिल्हा पालघर, हयांचे मालकीची आहे. सदर मिळकत त्यांस विकसीत करावयाची असुन त्या अनुषंगाने सदर मिळकतीबाबत वसई विरार शहर महानगरपालिका यांचेकडून बांधकाम परवानगी मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाही इसमाचा, व्यक्तीचा, गहाण, दान, दावा, वारसा, वहीवाट, विश्वस्त बोजा, विक्री, कुळारंग, अदलाबदल वा अन्य हक्क, हितसंबंध असेल तर तो त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या २०३, अली प्लाझा, वर्तक रोड, विरार (पश्चिम), तालुका वसई, जिल्हा पालघर, या पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह कळवावा. अन्यथा तसा हक्क हितसंबंध नाही, असे समजून सदर मिळकतीवर कोणाचीही हरकत नसल्याबाबतचा दाखला देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

दि. २४/०९/२०२४ वकील
(अॅड. कल्पना एस. म्हात्रे)

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना माझ्या श्रीमती रश्मी जगदीश पाटील यांजकडुन कळविण्यात येते की गाव मौजे बोळींज, ता. वसई, जि. पालघर, येथील सर्वे क्र. ३५४ ड, प्लॉट नं. १ ते ४, हिस्सा नं. ६, सर्वे क्र. ३५४, हिस्सा क्र. ७ आणि ४, हया जमिन मिळकतीवर बांधण्यात आलेली इमारत "किशोर कुंज नं. ७", प्रस्तावित सोसायटी "किशोर कुंज नं. ७ को-ऑप हौसिंग सोसायटी लि." बोळींज, विरार (प), तालुका वसई, जि. पालघर, हया बिल्डिंग मधील सदनिका क्र. डी/२०१, दुसरा मजला, क्षेत्र ३७.६३ चौ. मी. (कारपेट), हि सदनिका श्री. जगदीश पद्मण पाटील आणि श्रीमती रश्मी जगदीश पाटील यांच्या मालकीची होती. सदरहू श्री. जगदीश पद्मण पाटील, हे दिनांक ०५/०६/२०२१ रोजी मयत झाले असून त्यांच्या पश्चात त्यांना १. श्रीमती रश्मी जगदीश पाटील (पत्नी आणि सदर सदनिकेमध्ये सहहिस्सेदार), २. सौ. विप्रा निलेश चौरासिया (मुलगी) आणि ३. कु. रिद्धी जगदीश पाटील (मुलगी) हे कायदेशिर वारस आहेत, ह्यांच्या व्यतिरिक्त कोणीही वारस नाही तरी सदर मिळकतीवर कोणाचाही कोणाताही हक्क हितसंबंध असेल तर तो त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आम्हांस ऑफिस क्र. १०२, पहिला माळा, कुंती सदन, वीर सावरकर मार्ग, विरार (पु), तालुका वसई, जि. पालघर ४०१ ३०५, या पत्त्यावर लेखी पुराव्यासह कळवावे.

अॅड. रंजन हाशा पाटील

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना माझ्या अशिल श्रीमती गीता दिपक जोशी यांजकडुन कळविण्यात येते की गाव मौजे कोपरी, ता. वसई, जि. पालघर, येथील सर्वे क्र. 114A1 (जुना स. क्र. 3), हिस्सा नं. 6 पैकी, हया जमिन मिळकतीवर बांधण्यात आलेली इमारत क्र. बी, "साई सृष्टी कॉम्पलेक्स", "साई सृष्टी कॉम्पलेक्स बी-विंग को-ऑप हौसिंग सोसायटी लि." सोसायटी नोंदणी क्र. पीएलआर/ (व्हीएसआय)/एचएसजी/ (टीसी) / 1671/2022, शेअर सर्टिफिकेट नं. 010, 10 शेअर प्रत्येकी रु.50/-, 091 ते 100, कोपरी, साई हिल नगर, विरार (पु), तालुका वसई, जि. पालघर, हया बिल्डिंग मधील सदनिका क्र. 202, दुसरा मजला, "ए" विंग, क्षेत्र 530 चौ. फुट म्हणजेच 49.256 चौ. मी. (सुपर बिल्ट अप) हि सदनिका श्री. दिपक अशोक जोशी यांच्या मालकीची होती. सदरहू श्री. दिपक अशोक जोशी, हे दिनांक 09/05/2021 रोजी मयत झाले असून त्यांच्या पश्चात त्यांना 1. श्रीमती गीता दिपक जोशी (पत्नी), 2. कुशल दिपक जोशी (अज्ञान मुलगा), 3. तेजस दिपक जोशी (अज्ञान मुलगा) आणि 4. दिक्षा दिपक जोशी (अज्ञान मुलगी) हे कायदेशिर वारस आहेत, ह्यांच्या व्यतिरिक्त कोणीही वारस नाही तरी सदर मिळकतीवर कोणाचाही कोणाताही हक्क हितसंबंध असेल तर तो त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 14 दिवसांच्या आत आम्हांस ऑफिस क्र. 102, पहिला माळा, कुंती सदन, वीर सावरकर मार्ग, विरार (पु), तालुका वसई, जि. पालघर 401 305, या पत्त्यावर लेखी पुराव्यासह कळवावे.

अॅड. रंजन हाशा पाटील

### नोटीस

माझ्या अशिल **श्रीमती अल्पा जयेश मकवाना** यांच्या वतीने नोटीस दिली जात आहे. जे औद्योगिक युनिट क्र. डी-१२९, पहिला मजला, "जय बोनान्झा इंडस्ट्रियल इस्टेट प्रिमिसिस सहकारी संस्था लि.," अशोक चक्रवती रोड, कांदिवली पूर्व, मुंबई – ४००१०१ चे सध्याचे मालक आहेत व सोसायटी पाच शेअर्स ११४६ ते ११५०, संस्थेचे प्रमाणपत्र क्र. १५५ , दिनांक २०/०१/१९८८ रोजीच्या त्यांचे नावे आहे.

मूळत: हे युनिट दिवंगत अर्जुनभाई मोहनलाल मकवाना आणि किरीटकुमार अर्जुनभाई मकवाना यांनी खरेदी केले होते, अर्जुनभाई मोहनलाल मकवाना यांच्या निधनानंतर , सदर युनिट १२/०८/२०१० रोजी सोसायटीच्या शेअर्ससह हस्तांतरण क्र. ५९०, श्री किरीट ए. मकवाना (किरीटकुमार अर्जुनभाई मकवाना) यांच्या नावाने हस्तांतरित केले आणि किरीट ए. मकवाना यांच्या निधनानंतर २०/०८/२०२१ रोजी सोसायटीच्या शेअर्ससह त्यांच्या सुनेला हस्तांतरण क्र. ७१९, श्रीमती अल्पा जयेश मकवाना यांच्या नावावर हस्तांतरित करण्यात आले आणि तेव्हापासून ती या युनिटच्या शांततेत ताब्यात आहेत.

मी, अॅड. रजत के. सिंग याद्वारे सर्व व्यक्तींना सूचित करतो कि ज्या दावेदार/चे किंवा आक्षेपकर्त्यांकडून या युनिटचे हक्क, व्याज किंवा शीर्षक हस्तांतरित करण्यासाठी, सोसायटीच्या शेअर्सच्या हस्तांतरणासह, दाव्या/आक्षेपाचे समर्थन करण्यासाठी कागदोपत्री पुराव्याच्या प्रतींसह, ही सूचना प्रकाशनाच्या ७ दिवसांच्या आत दावे किंवा आक्षेप आमंत्रित करत आहेत. वरील विहित कालावधीत कोणतेही दावे/आक्षेप प्राप्त न झाल्यास, असे गृहित धरले जाईल आणि/किंवा असे कोणतेही दावे/आक्षेप नाहीत असे मानले जाईल आणि जर असतील तर ते माफ केले गेले आहेत किंवा सोडून दिले आहेत आणि अधोस्वाक्षरीने नो क्लेम जारी करण्यास येणार आणि त्यानंतर कोणतेही दावे स्वीकारले जाणार नाहीत.

**सही**
**अॅड. रजत के. सिंह**
**कार्यालय क्र. १३८, पहिला मजला, ओस्तवाल ऑर्नेट, बिल्डिंग क्र. २/ए, जैन मंदिरा जवळ, जेसल पार्क, भाईंदर पूर्व, जि.ठाणे - ४०११०५ (मोब. क्र. ८१६९८७५१९५)**

**स्थळ : मुंबई**
**दिनांक : २३/०९/२०२४.**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. विजय रामरतन शर्मा यांच्या मालकीचा भाईंदर (पूर्व) बी.पी. क्रॉस रोड क्र.३ वरील प्रेस्टिज इंडस्ट्रीयल इस्टेट को ऑप प्रिमाईसेस सोसायटी लि., या संस्थेमध्ये पहिल्या मजल्यावर एफ-१०९ क्रमांकाचा औद्योगिक गाळा आहे. सदर औद्योगिक गाळा त्याला १२ ऑक्टोबर २०२२ च्या हक्कसोड पत्रकाने मिळाला आहे. सदर औद्योगिक गाळ्याचे त्याने मला नो क्लेम सर्टिफिकेट देण्याची विनंती केली आहे. सदर औद्योगिक गाळ्याचे कागदपत्रे तपासताना असे दिसून आले की मेसर्स संगम कंस्ट्र कंपनी व मेसर्स शारदा इंजिनिअरिंग कंपनी यांच्या दरम्यान झालेला दि. ९ फेब्रुवारी १९८५ मूळ करारनामा गहाळ झाला असून तो शोधूनही मिळत नाही.

तरी सदर औद्योगिक गाळयावर, गहाळ करारनाम्यावर त्याच्या शेअर्सवर कुणाचाही हक्क, हितसबंध, गहाणवट, वारसाहक्क वगैरे असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाचे आत लेखी, योग्य त्या कागदपत्रासह ऑफिस क्र.२, पहिला मजला, न्यू शांती गंगा अपार्टमेंट, स्टेशन रोड, भाईंदर (पू), ता. व जिल्हा ठाणे, ४०११०५ येथे कळवावे. दिलेल्या मुदतीत कळविण्यात न आल्यास कुणाचीही हरकत नाही असे समजून माझ्या अशिलाला नो क्लेम सर्टिफिकेट देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**कळावे,**

**जॉन एम रॉड्रीक्स**
**वकील**
**मो. नं. - ९८९२४०१३४९**

### PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given that my client MRS. PRATIBHA LAXMAN MOTLING (alias MS. PRATIBHA PRABHAKAR BANSODE) & three ors. legal Heir of Late Mr. Prabhakar Sitaram Bansode, residing at Flat No.A/13, First Floor, CHHAYA SADAN CO. OPERATIVE HOUSING SOCIETY LTD., M. B. Estate, Virar (West), Taluka: Vasai, District: Palghar 401 303, are going to make an application in connection of abovesaid Flat with society for extinguish right and interest of the releasor's name and replace the name of MRS. PRATIBHA LAXMAN MOTLING and three ors. as per release deed.

Any person having any objection to sale or claiming any right, title or interest in said Flat by way of sale, exchange, gift, mortgage, charge, trust, possession, Inheritance, lease, lien, attachment or any other right whatsoever. The same may be made known in writing to me at Shop No.23, Shree Vrindavan CHS Ltd., B/H Woodland Cinema, Virar (W), Tal-Vasai, Dist-Palghar, Pin 401 303 within 15 days from the date of issue of this notice, failing which society shall proceed to change the name as per rules & regulation.

**Place: Virar**
**Date: 23.09.2024**
**(Bhagyshree Pujari)**
**(ADVOCATE)**

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Twenty Nine
Issu - 94
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- एकोणतीसावे
अंक - ९४
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

## मुंबईत आणखी 37 आपला दवाखाने, सध्या 243 दवाखाने कार्यान्वित

**मुंबई :** मुंबईकरांना मोफत आणि घराजवळ आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी सुरू केलेल्या 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्या'ला नागरिकांचा प्रतिसाद वाढत असून आपला दवाखाना सुरू झाल्यापासून अवघ्या २२ महिन्यांत ५७ लाखांहून अधिक नागरिकांनी त्याचा लाभ घेतला आहे. आता येत्या काही महिन्यांत ३७ नवीन आपले दवाखाने सुरू करण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेतला आहे.मुंबईकरांना सहज आरोग्य सेवा मिळावी यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून मुंबईत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून १७ नोव्हेंबर २०२२ रोजी पहिला 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' सुरू करण्यात आला. त्यानंतर टप्प्याटप्याने त्यात वाढ करण्यात आली. अवघ्या २२ महिन्यांत मुंबईत २४३ दवाखाने सुरू करण्यात आले. या दवाखान्यातून आतापर्यंत ७५ लाखांहून अधिक नागरिकांनी वैद्यकीय सेवेचा लाभ घेतला आहे. नागरिकांच्या सोयीच्या वेळेत आणि घराजवळ दवाखाने उपलब्ध असल्याने अधिकाधिक संख्येने मुंबईकर या वैद्यकीय सुविधांचा लाभ घेत आहेत.




## थोडक्यात

### लोकनेते केशवराव भोसले यांचे निधन



**मुंबई:** मुंबई - ग्रेट मराठा समाजाचे ज्येष्ठ लोकनेते तसेच खेड तालुक्यातील खोपी गावचे सुपुत्र तथा महाराष्ट्राच्या मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी कित्येक वर्ष अग्रेसर भूमिका मांडणारे मराठा समाजाचे ज्येष्ठ नेते आदरणीय केशवराव जगतराव भोसले यांचे सोमवारी अल्पशा आजाराने मुंबई पेडर रोड येथील त्यांच्या निवासस्थानी निधन झाले .उद्या मंगळवार २४ सप्टेंबर २०२४ सकाळी ११ वाजता त्यांची अंत्ययात्रा त्यांच्या मुंबईतील निवासस्थांतून निघणार आहे.त्यांच्या पार्थिवावर मलबार हिलच्या बाणगंगा स्मशानभूमीत अंत्यसंसकार केले जाणार आहेत.

### भीम आर्मी महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक लढविणार

**मुंबई:** -उत्तर प्रदेशात एक जागा लढवून दीड लाखाच्या फरकाने निवडून आल्यानंतर भीम आर्मी संस्थापक आणि आझाद समाज पार्टी (कांशीराम ) चे अध्यक्ष चंद्रशेखर आझाद यांनी आपल्या पक्षाचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे. उत्तर प्रदेश व राजस्थानमधील पोटनिवडणुकीसह जम्मू काश्मीर हरियाणानंतर महाराष्ट्रातदेखील त्यांनी निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतला आहे.या निवडणुकीच्या तयारीसाठी आझाद यांनी महाराष्ट्रावर लक्ष्य केंद्रित केले असून राज्यात त्यांच्या सभांचा धुरळा उडणार आहे . उत्तर प्रदेशातील नगिना लोकसभा मतदारसंघातून दीड लाखांच्या फरकाने ॲड चंद्रशेखर आजाद हे विजयी झाले आहेत या विजयानंतर त्यांनी उत्तर प्रदेश मधील १० विधानसभांच्या निवडणुकीत आपले उमेदवार उतरविले असून हरियाणात माजी उपमुख्यमंत्री दुष्यन्त ओमप्रकाश चौटाला यांच्या पक्षासोबत युती करून २० जागांवर आपले उमेदवार उतरविले आहेत .

# कंत्राटी वीज कामगारांची 'भरउजेडी' फसवणूक...

- उर्जाखात्याकडून न्यायालयाचा अवमान
- भारतीय कामगार कर्मचारी महासंघाचा आरोप

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेडमध्ये ठेकेदार पद्धतीवर काम करणाऱ्या कामगारांची दिवसाढवळया लाखो रुपयांची फसवणूक उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या उर्जा खात्याकडून केली गेली असल्याचा आरोप भारतीय कामगार कर्मचारी महासंघाने केला आहे. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार या कामगारांना १९ लाखांची भरपाई मिळणे गरजेचे असताना तटपुंजी रक्कम त्यांना देण्यात आल्याचा आरोप भारतीय कामगार कर्मचारी महासंघाचे सचिव प्रकाश शिंदे यांनी केला आहे. हा एकप्रकारे न्यायालयाचा अवमान असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

२००६ सालापासुन हे कामगार कंत्राटी कामगार म्हणून काम करीत आहेत. त्यात लाइनमन, लाईन हेल्पर, ऑपरेटर्स, ऑफीस कर्मचारी, कॉम्प्युटर ऑपरेटर, क्लार्क, स्टेनो, शिपाई व अनेक टेक्निशन कर्मचारांच्या समावेश आहे. परंतु त्यांना कायमस्वरूपी कामगारांप्रमाणे वेतन, अथवा सुखसोयी यापासुन अनेक वर्षे वंचित ठेवण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, या कंपनीमध्ये अनेक प्रस्थापित कामगारांची संघटना असुनही या कंत्राटी कामगारांकडे कुठल्याही युनियनने लक्ष दिलेले नाही, म्हणून जानेवारी २०१७ सालापासुन या कंत्राटी कामगारांनी आमदार भाई जगताप यांच्या नेतृत्वाखालील भारतीय कामगार कर्मचारी महासंघ या युनियनचे सभासदत्व स्वीकारले. भाई जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली महासंघाचे सचिव प्रकाश शिंदे यांनी औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे सन २०१८ साली समान काम समान वेतन मिळावे म्हणुन दावा दाखल केला. या केसमध्ये महासंघाचे सचिव प्रकाश शिंदे हे स्वतः आणि ॲड. के. टी. विश्वनाथन यांनी कामगारांच्या बाजुने औद्योगिक न्यायालय, ठाणे ( संदर्भ क्र. १६ ऑफ २०२० व संदर्भ क्र. १२ ऑफ २०१८) येथे मांडली व मा. औद्योगिक न्यायालयाने करणाऱ्या कामगारांची मागणी योग्य असल्याचे आपल्या दि. १८ जुलै, २०२४ रोजीच्या आदेशात जाहीर केले आहे. त्याचबरोबर या आदेशाने (आवार्ड) असेही जाहीर केले आहे की, कंत्राटी पद्धतीवर काम करणाऱ्या कामगारांना कायमस्वरूपी काम कामगारांप्रमाणेच वेतन व सर्व सोयी सवलती देण्यात याव्यात, त्याचबरोबर २०१६ सालापासुनचे वेतनातील फरक / तफावत सहा महिन्यांच्या कालावधीत कामगारांना देण्यात यावा असे आदेश वितरण कंपनीच्या व्यवस्थापनास देण्यात आले आहेत. त्यामुळे प्रत्येक कामगारास साधारणपणे १६ लाख रूपये थकबाकी मिळणार आहे.

***न्यायालयाच्या आदेशाचा सन्मान राखा - कर्मचारी महासंघाची विनंती***

*सदरचा आदेश न्यायमुर्ती सोनभद्रे, औद्योगिक न्यायालय, ठाणे यांनी दिला आहे. त्यामुळे कंपनीतील प्रस्थापित तथाकथित युनियनच्या पायाखालची वाळू घसरली आहे. कारण त्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. याची त्यांना जाणीव झाली असावी त्यामुळे त्यांनी महाराष्ट्र राज्याचे ऊर्जामंत्री व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे घाईघाईने कंत्राटी कामगारांच्या पगारामध्ये मार्च- २०२४ पासून १९% वाढ करून घेतल्याचे माध्यमात छापून आणले. खरे तर ही तुटपुंजी वेतनवाढ म्हणजे माननीय न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्यासारखे हे ऊर्जामंत्री फडणवीस यांना कळू नये याचे आश्चर्य वाटते, असे सावंत म्हणाले. फडणवीस यांना आमची विनंती राहील की, कृपया न्यायालयाच्या आदेशाचा सन्मान करून त्वरीत आदेशाची अंमलबजावणी करावी. निवडणुका डोळ्यासमोर ठेवून कामगारांची फसवणूक व न्यायालयाचा अवमान न करता प्रत्येक कामगाराला 16 लाख याप्रमाणे थकबाकी द्यावी अशी मागणी भारतीय कामगार कर्मचारी महासंघाचे सचिव प्रकाश शिंदे यांनी केली आहे.*

# 'इंग्लिश खाडी' चा 34 किलोमीटरचा टप्पा 17 तास 25 मिनिटांत गाठण्याचा दिव्यांग जिया रायचा विक्रम

प्रतिनिधी
■ मुंबई

अतिशय आव्हानात्मक आणि प्रतिकूल परिस्थितीत तब्बल ३४ किमी अंतराची 'इंग्लिश खाडी' अवघ्या १७ तास २५ मिनिटात पोहण्याचा विक्रम जिया राय (वय १६) या दिव्यांग जलतरणपटूने नुकताच आपल्या नावे केला. या कामगिरीबद्दल बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांच्या हस्ते कु. जिया राय हिचा शाल, सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन काल महानगरपालिका आयुक्त दालनात सत्कार करण्यात आला.

जियाची कामगिरी ही संपूर्ण मुंबईकरांसाठी अभिमानास्पद गोष्ट आहे असे सांगून आगामी काळात आणखी नवनवीन विक्रम रचण्यासाठी महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी जियाला शुभेच्छा दिल्या.

पोहण्यासाठी अतिशय आव्हानात्मक अशा इंग्लिश खाडीमध्ये पाणी किती थंड होते ? असा प्रश्न आयुक्त गगराणी यांनी जियाला केला. तसेच जियाने जलतरणामध्ये आतापर्यंत केलेली कामगिरी ही संपूर्ण मुंबईसाठी एक गौरवपूर्ण बाब असल्याचेही ते

### पालिका आयुक्तांतर्फे जियाचा सत्कार



म्हणाले.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात असणाऱ्या जलतरणाशी संबंधित सर्व पायाभूत सुविधा तसेच प्रशिक्षण देण्यासाठी पालिका नेहमीच जियाला मदत करेल, असे सांगत गगराणी यांनी जिया आणि तिच्या पालकांचे मनोबल वाढवले. तसेच येत्या काळात होणाऱ्या पॅरालिम्पिक स्पर्धेत जियाला उत्तमोत्तम कामगिरी करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) अमित सैनी आणि जियाचे आई वडील हेदेखील उपस्थित होते.

जिया राय ही अवघ्या १६ वर्षांची जलतरूणपटू ही 'ऑटिजम स्पेक्ट्रम' विकाराने ग्रस्त आहे. एकल जलतरण (सोलो स्विमिंग) प्रकारात अतिशय वेगवान पद्धतीने आणि सर्वात तरूण दिव्यांग जलतरूणपटू (पॅरा स्विमर) म्हणून जागतिक पातळीचा विक्रम जियाने आपल्या नावे केला आहे. जियाने १८ डिग्री सेल्सिअस तापमानात २८ जुलै २०२४ रोजी ॲबोट्स क्लिफ (इंग्लंड) येथून पोहायला सुरूवात करत फ्रान्स येथे पोहचत ३४ किलोमीटरचे अंतर १७ तास २५ मिनिटांमध्ये पूर्ण केले. ऑटिजम स्पेक्ट्रम विकार असतानाही इंग्लिश खाडी (चॅनेल) पोहणारी जिया ही पहिली दिव्यांग जलतरणपटू ठरली आहे. जियाने तिचे हे यश ऑटिजम विकाराच्या जनजागृतीला समर्पित केले आहे.

# बेस्ट उपक्रमात इंग्रजी परिपत्रक काढणाऱ्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार? - सुहास सामंत

प्रतिनिधी
■ मुंबई

बेस्ट उपक्रमाने १६/०९/२४ रोजी शासनाच्या निर्देशानुसार सर्व कारभार हा मराठीतच असला पाहिजे असे परिपत्रक बेस्ट महाव्यवस्थापक यांच्या मंजुरीने काढले होते. मात्र विक्रोळी आगारातील एका बस वाहकावर झालेल्या चाकू हल्ल्याच्या निषेधार्थ काल करण्यात आलेल्या आंदोलनाला कोणत्याही कर्मचाऱ्यांची रजा मंजूर होणार नसल्याचे निघालेले परिपत्रक इंग्रजीत काढण्यात आले होते. परिपत्रक काढणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी बेस्ट कामगार सेनेचे अध्यक्ष सुहास सामंत यांनी केली आहे.

विशेष म्हणजे बेस्ट चा सर्व कारभार मराठीत असला पाहिजे. या संदर्भातील परिपत्रक ज्या बेस्टचे प्रशासकीय विभागाचे अधिकारी सुशील पवार यांच्या सहीने प्रसिद्ध करण्यात आले होते. त्याच सुशील पवार यांनी बेस्ट मध्ये कोणताही मोर्चा अथवा आंदोलन असो कोणत्याही अधिकारी कर्मचारी वर्गाच्या रजा मंजूर होणार नाही त्याकरिता नियमानुसार काढण्यात आलेले परिपत्रक इंग्रजीतून काढले होते.जर मराठीत परिपत्रक नसेल तर संबधित अधिकारी वर्गावर कारवाई करण्याचे परिपत्रक मध्ये नमूद आहे,आता बेस्ट प्रशासन सुशील पवार यांच्यावर काय कारवाई करणार हे आता बघावे लागेल. असे सामंत यांनी म्हटले आहे.

सुहास सामंत यांनी बेस्टचे महाव्यवस्थापक अनिल डिग्गीकर यांना हा प्रश्न विचारला आहे,आता बेस्ट प्रशासन सुशील पवार यांच्यावर काय कारवाई करणार आहे.एक अधिकारी १६/०९/२४ रोजी मराठीत कारभार व्हावा म्हणून परिपत्रक काढतो.आणि तोच अधिकारी २०/०९/२४ रोजी युनियनच्या मोर्चाचे इंग्रजी परिपत्रक काढतो आहे.त्यामुळे बेस्टचे अधिकारी किती हुशार आहेत हे सिद्ध होत आहे,यांना फक्त प्रमोशन पाहिजे असतात पण माझा बेस्टचा सामान्य कामगार बिचारा आपल्या सेवेत आहे त्याच जागेवर राहून निवृत्त होतो. त्यामुळे बेस्ट प्रशासनाने बेस्ट मधील हुशार, अभ्यासू कामगार अधिकारी वर्गास पुढे प्रमोशन देताना विचार करावा. अशी मागणी सुहास सामंत यांनी केली आहे.

# पालिका सुरक्षा रक्षकांचा 13 महिन्याचा अतिकालिन भत्ता प्रलंबित

प्रतिनिधी
■ मुंबई

सुरक्षा रक्षकांनी केलेल्या कामाचा मोबदला त्यांना विहीत वेळेत दिला जावा व त्यांची आर्थिक पिळवणुक थांबवावी यासाठी उपायुक्त (वित्त) प्रशांत गायकवाड यांच्या दालनात झालेल्या बैठकीत सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती 'म्युनिसिपल कर्मचारी सेने'चे उपाध्यक्ष डॉ.संजय कांबळे-बापेरकर यांनी दिली.

तब्बल १३ महिन्यांचा अतिकालिन भत्ता लेखा अधिकारी कार्यालयाच्या अनास्थेमुळे प्रलंबित होता. त्यामुळे युनियनच्या मागणीनुसार सुरक्षा खात्याचे उपप्रमुख सुरक्षा अधिकारी, सहाय्यक सुरक्षा अधिकारी, लेखा अधिकारी, उपप्रमुख लेखापाल, लेखापरिक्षक यांच्यासमवेत उपायुक्त (वित्त) यांच्या दालनात काल बैठक आयोजित करण्यात आली होती.

ड्युटीवर येताना सुरक्षा रक्षक १ मिनिट ते २९ मिनिट उशिरा आला तर त्याचा अर्धा तास व ३१ मिनिट ते ६० मिनिट उशिरा आला तर एक तास कापण्यात येत होता. यापुढे अतिकालिन भत्ता काढताना जेवढे मिनिट उशिर होईल तेवढेच मिनिट अतिकालिन भत्ता काढताना कापावे असा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच अतिकालिन भत्ता काढताना हाताने नोंदी न करता संपुर्णपणे संगणकीय पध्दतीचा वापर करण्याचा निर्णय घेतला गेल्याने आता सुरक्षा रक्षकांचा अतिकालिन भत्ता प्रलंबित राहणार नाही असे डॉ. बापेरकर यांनी सांगितले.

# निवडणूकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी सानुग्रह अनुदान जाहीर करावे

**म्युनिसिपल मजदुर संघाचे मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्री व पालिका आयुक्तांना निवेदन**

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहनमुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सन 2024ची दिवाळी आनंदी व सुख समृद्धीची जावी म्हणून या वर्षी बोनस वा सानुग्रह अनुदान 20 टक्के अधिक 40 हजार (वीस टक्के आणि रुपये चाळीस हजार मात्र )देण्याचा निर्णय घेऊन बृहन्मुंबई महानगरपालिका कामगार, कर्मचारी, अधिकारी, अभियंते यांना 2024 ची दिवाळी आनंदी व उत्साहात साजरी करण्यासाठी आजच्या महागाईचा विचार करून देण्यात यावा अशी मागणी म्युनिसिपल मजदुर युनियनचे सरचिटणीस प्रकाश जाधव यांनी केली आहे.

सर्वांना सरसकट 20 टक्के अधिक रुपये 40 हजार बोनस, सानुग्रह अनुदान विधानसभा निवडणूक 2024 च्या आचारसंहिता लागू होण्यापूर्वी जाहीर करावे अशी मागणीही महाराष्ट्र राज्याचे मुखमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार व मनपा आयुक्त डॉ, भूषण गगराणी यांच्याकडे एका निवेदणाद्वारे म्युनि्सिपल मजदूर संघाने केली आहे.

# 30 हजार म्हाडा भाडेकरु सरकारवर नाराज

प्रतिनिधी
■ मुंबई

म्हाडा पुनर्रचित ३८८ इमारतीमधील ३३(२४) च्या अधिसूचनेला सरकारी धोरणाला ब्रेक लागला आहे. त्यामुळे ३० हजार म्हाडा भाडेकरू सरकारवर नाराज आहेत.आचारसंहिता लागायच्या आत या बाबत निर्णय जाहीर करावा. व ३८८ म्हाडा पुनर्रचित इमारतींचा विकासाचा मार्ग मोकळा करावा. अशी विनंती सरकारला करण्यात आली आहे.

गेल्या पावसाळी अधिवेशनात २३ जुलै २०२३ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपकर प्राप्त असलेल्या इमारतींसाठी असलेल्या ३३(७) या धोरणाचे फायदे ३३ (२४) मध्ये समाविष्ट करण्याचे आदेश दिले होते परंतु ३ नोव्हेंबर २०२३ रोजी ३३(२४) ही अधिसूचना काढताना पुन्हा एकदा नगर विकास खात्याने ३३(७) धोरणातील कायद्याचे कोणतेही स्पष्टीकरण न दिल्यामुळे ३८८ पैकी एकाही इमारतीचा प्रस्ताव सादर होऊ शकला नाही .यामुळे म्हाडा ३८८ इमारतीमधील लाखो रहिवाशांचा जीव टांगणीला लागलेला आहे. जीव मुठीत घेऊन राहणारे रहिवाशांनी आक्रमक होऊन बुधवार २८ ऑगस्ट रोजी आझाद मैदान मुंबई येथे एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाची दखल सरकारने घेतली सरकारच्या

वतीने पालकमंत्री दिपक केसकर धरणे आंदोलना सामोरे आले व त्यांनी आश्वासन दिले मुख्यमंत्री महोदय यांचे सोबत बोलून या बाबत सरकार सकारात्मक निर्णय घेतला जाईल परंतू आता एक महिना होत आला तरी या बाबत निर्णय काही होत नाही. निवडणुक आयोग आता महाराष्ट्र दोऱ्यावर येत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुकीचा कार्यक्रम कधीही घोषित

होऊ शकतो. आचारसंहीता लागू शकते.. आचारसंहिता लागली तर आमचा प्रश्न लांबणीवर पडण्याची दाट शक्यता आहे. सरकार दररोज धडाधड निर्णय घेते आहे. दररोज नवनवीन सरकारी आदेश, अध्यादेश निघत आहेत मग ३० हजार म्हाडा भाडेकरू रहिवाशी यांचे बाबत निर्णय का होत नाही ? सरकारला आमच्या जिवाची पर्वा आहे की नाही असा सवाल मंदार निकेतन म्हाडा पुनर्रचित इमारत-भायखळा सुभाष तळेकर यांनी केला आहे.

# नगरपथ विक्रेता समितीतील एएलएम/ एनजीओ सदस्यांसाठी नवीन अर्ज मागवा

**अँड. मकरंद नार्वेकर यांची आग्रही मागणी**

प्रतिनिधी
■ मुंबई

भाजपचे माजी नगरसेवक अँड. मकरंद नार्वेकर यांनी मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांना पत्र लिहून एनजीओ/ एएलएम/नागरिक संस्थांना सदस्य म्हणून नगरपथ विक्रेता समिती (टीव्हीसी) नियुक्तीसाठी नव्याने अर्ज मागवण्याची मागणी केली आहे. तसे न केल्यास मुंबई महापालिकेला कोर्टात खेचण्याचा निर्वाणीचा इशारा दिला आहे.

आयुक्त भूषण गगराणी यांना लिहिलेल्या पत्रात नार्वेकर यांनी पालिकेने सुमारे 7-8 वर्षांपूर्वी मागवलेल्या अर्जांच्या आधारे टीव्हीसी वरती एनजीओ/एएलएम/ नागरिक संस्थांना सदस्य म्हणून नेमणूक करण्याचा घाट घातल्याचा आरोप केला आहे. पालिकेकडे सद्यस्थितीत निवडून आलेले लोकप्रतिनिधी नाहीत. त्यातच ७-८ वर्षांपूर्वी अर्ज केलेल्या नागरिकांना नियुक्त केल्यास अनेक प्रश्न निर्माण होतात. हे अर्जदार अजूनही काम करण्यास इच्छुक आहेत का? त्यापैकी किती जणांना वयोमानामुळे काम करणे शक्य नाही? यासारखे मूलभूत पण गंभीर प्रश्न आहेत. यापरिस्थितीत अनेक नवीन सक्रिय नागरिक आहेत जे अर्ज करण्यास इच्छुक आहेत. त्यामुळे नव्याने अर्ज मागवून जे काम करण्यास इच्छुक आहेत अशांना संधी दिली पाहिजे, असे नार्वेकर यांनी सांगितले.

नार्वेकर पुढे म्हणाले की, फेरीवाल्यांना पालिकेच्या सर्वेक्षणात त्यांचे प्रतिनिधित्व मिळत नसल्याने सर्वोच्च न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयात खटले दाखल केले जातात. त्याचप्रमाणे या समित्यांमध्ये नागरिकांनाही योग्य प्रतिनिधित्व द्यावे, अशी आमची मागणी आहे. महापालिकेला मनमानीपणे कारभार करता येणार नाही. त्यामुळे नव्याने अर्ज न मागविल्यास एक लोकप्रतिनिधी मला पालिकेला न्यायालयात खेचण्याशिवाय इतर कोणताही पर्याय राहणार नाही, असेही नार्वेकर यांनी सांगितले.

---

**केनरा बैंक Canara Bank** (भारत सरकार का उपक्रम / A Govt. of India Undertaking)
सिंडिकेट Syndicate

**माटुंगा बाझार शाखा (०१५०३९): शंकर मातम बिल्डींग, तेलंग क्रॉस रोड, माटुंगा बाजार, मुंबई ४०००१९**

**ताब्या सूचना [कलम १३(४)] स्थावर मालमत्तेसाठी**

ज्याअर्थी: निम्नस्वाक्षरीकार सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (कायदा) २००२ (५४/२००२) (ह्यानंतर नमूद कायदा असा संदर्भ असलेले) अंतर्गत कॅनरा बँक, माहीम बाझार शाखेचे नियुक्त प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३ (१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून मे. हिरा प्लास्ट इंडिया (प्रोप्रायटर छोगरम कलरामजी चौधरी) ह्यांना सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेली १३.०६.२०२४ अनुसार रक्कम रु. ५०,६६,५८२.४४ (रुपये पन्नास लक्ष सहासष्ट हजार पाचशे ब्याऐंशी आणि चव्वेचाळीस पैसे मात्र) त्यावरील व्याज आणि खर्चाचा भरणा नमूद सूचना प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांच्या आत करण्यासाठी मागणी सूचना दिनांकित १४.०६.२०२४ जारी करण्यात आली होती.

सरफेसी नियमावली २००२ च्या नियम ८ आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सरफेसी कायदा २००२ च्या कलम १३(४) अंतर्गत जारी करण्यात आलेल्या सूचना दिनांकित २०.०९.२०२४ मधील रकमेचा भरणा कर्जदार/ गहाणदार/ हमीदार करू न शकल्यामुळे कर्जदार/ गहाणदार/ हमीदार आणि सामन्य जनतेला निम्नस्वाक्षरीकारांनी येथे खाली नमूद मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

विशेषत: कर्जदार आणि सामान्य जनता ह्याना ह्याद्वारे सावध करण्यात येत आहे की मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी असा व्यवहार जर झाला असल्यास कॅनरा बँक, माटुंगा बाजार शाखा ह्यांच्याकडे रु. ५०,६६,५८२.४४ (रुपये पन्नास लक्ष सहासष्ट हजार पाचशे ब्याऐंशी आणि चव्वेचाळीस पैसे मात्र) चा भरणा करण्यास बाध्य असतील. सुरक्षित मालमत्ता सोडविण्यासाठी उपलब्ध असलेया वेळेच्या संदर्भात नमूद कायद्याच्या कलम १३ (८) अंतर्गत असलेल्या तरतुदीकडे कर्जदारांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

वसई तालुका आणि नोंदणीकरण जिल्हा पालघर आणि उप नोंदणीकरण जिल्हा वसईच्या मार्यादेमधील आणि वसई विरार शहर महानगरपालिका शहराच्या स्थानिक हद्दीमधील गाव चंदनसार येथे वसलेल्या सर्वे क्र. १३६ (३२२) ३ पार्ट, १३८ (२५१) ४, केजेपी नवीन सर्वे क्र. १२३ वर बांधण्यात आलेल्या एचडीआयएल इंडस्ट्रीयल पार्क बिल्डींग क्र. २० च्या २ ऱ्या मजल्यावरील मोजमाप ३७.०८ चौ. मी. (चटई क्षेत्र) चा धारण केलेला औद्योगिक गाळा क्र. २०५ असलेल्या मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड. चटई क्षेत्रफळ: ३७.०८ चौ. मी. गहाणदाराचे नाव: छोगरम कलरामजी चौधरी

**दिनांक: २०.०९.२०२४**
**ठिकाण: मुंबई**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी, कॅनरा बँक**

---

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**संक्षिप्त ई-निविदा सुचना क्र. ३९ सन २०२४-२५**

सत्यमेव जयते

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | मौजे शिळफाटा ता. ज ठाणे येथील मंडळ, अधिकारी व तलाठी कार्यालयाच्या भुखंडास अतिक्रमण होऊ नये या करिता संरक्षण कुंपण भिंत बांधणे. | १,२५,७७,४९३.०० |

१. डाऊन लोड करण्याचा कालावधी : दिनांक. 19-9-2024 ते दिनांक. 26-9-2024

२. ई- निविदा उघडणे (शक्य असल्यास) : दिनांक. 27-9-2024 अधिक्षक अभियंता, सा. बां. मंडळ यांचे कार्यालयात दु.१४.०० उघडण्यात येईल.

सर्वपात्र / ईच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदाप्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालिच्या https//mahatenders.gov.in या पोर्टलवर portal वर enrolled करणे आवश्यक आहे.

**जा.क्र. ठावि/निविदा/ ९८१५**
**कार्यकरी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा. बा. विभाग, क्र. १ ठाणे**
**दिनांक - 12/09/2024**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**सा.बां. विभाग क्र १ ठाणे**

डी.जी.आय.पी.आर/आरओसी२०२४-२५/क्र.५/सी३२०२

---

**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ
म्हाडा MHADA

**ई-निविदा सूचना**

कार्यकारी अभियंता [पश्चिम ] विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ ( दुरध्वनी क्र. ०२२६६४०५४३२) हे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे / सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन/सिपीडब्लूडी / एमईएस / मुंबई महानगरपालिका सिडको रेल्वे / बीपीटी/एमआयडीसी / एम. जे. पी. यांचेकडे नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकुण ५० कामांकरीता बी-१ (Percentage Rate) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर http://mahatenders.gov.in, उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरू | २४/०९/२०२४ सकाळी १०:३० वाजता | २ | निविदा विक्री बंद | ०१/१०/२०२४ दुपारी ६:१५ वाजता |
| ३ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | ०३/१०/२०२४ सकाळी १०:३० नंतर | ४ | आर्थिक बोली उघण्याचा दिनांक | ०४/१०/२०२४ सकाळी १०:३० नंतर |

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निवदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टिप : १. विस्तृत ई- निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

टिप : २. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित

**CPRO/A/724**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता (प).**
**मुं. झो. सु. मंडळ, मुंबई**

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

---

|| अविश्रामो लोकतंत्राधीकारा ||

**खोपोली नगरपरिषद**

KMC

खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड पिनकोड नं. ४१०२०३
फोन नं. ( ०२१९२) २६६२२२, २६३३५६, २६४२११

**खोपोली नगरपरिषद, जि. रायगड**

जा.क्र. केएमसी /सा.प्र/ १२८१/२०२४ — दि. २३/०९/२०२४

**निविदा सूचना क्र १ /२०२४ २०२५**

खोपोली नगरपरिषद कर्मचारी हजेरी करिता बायोमॅट्रिक मशीन खरेदी करणे करिता दरपत्रक मागविणेकामी इच्छुक कंत्राटदारांकडून ऑफलाईन निविदा करिताच्या नमुद अटी व शर्तीच्या अधीन राहून सिलबंद लिफाफ्यात निविदा मागविण्यात येत आहे.


निविदा फॉर्म कार्यालयीन वेळेत दिनांक पर्यंत सकाळी १०.३० ते दु. ५.०० वाजेपर्यंत नागरी सुविधा केंद्रातून प्राप्त करता येईल. सदर कामी नमुद अटी व शर्ती निविदा फॉर्मसोबत संलग्न करण्यात येत आहे. सिलबंद निविदा दिनांक दिनांक २४/०९/२०२४ ते ०२/१०/२०२४ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायं. ५.०० या कालावधीत नगर परिषद कार्यालय, नागरी सुविधा केंद्र येथे सादर करता येईल.

सविस्तर निविदा संबंधी अतिरिक्त माहिती नगरपरिषदेचे संगणक विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस खेरीज) मिळू शकेल.

जा.क्र.केएमसी/आरोग्य/ १२८०
दि : २३/०९/२०२४

**sd/-**
**संगणक अभियंता**
**खोपोली नगरपरिषद**

आयुष्यात घडणाऱ्या गोष्टी या फक्त 10 टक्के असतात. त्यावर दिल्या जाणाऱ्या प्रतिक्रियेमुळे 90 टक्के गोष्टी घडतात.



- चार्ल्स स्विंडोल
प्रसिध्द लेखक

वृत्तमानस
मुंबई, मंगळवार, २४ सप्टेंबर २०२४

# तरुणाईला विकासाची वाट गवसू द्या

कोणत्याही देशातला तरुण देशाच्या विकासासाठी महत्त्वाचा घटक मानला जातो. ज्या देशांमध्ये तरुणांची संख्या जास्त तो देश विकसित असे ढोबळ गणित असते. परंतु भारतासारख्या देशाला या तरुणांच्या योग्य वापर करायला जमत नाही असेच म्हणावे लागेल. कारण जगामध्ये सर्वात जास्त तरुण असलेला भारत देश आहे. त्यामुळे या तरुणाईचा विकासासाठी वापर करून घेणे गरजेचे असताना अस्थिरता आणि नियोजन शून्य ते मुळे हा तरुण भरकटला जाऊ लागला आहे. या तरुणाने देशाची काळजी घेणे ऐवजी देशालाच त्या तरुणाची काळजी घ्यावी लागत आहे. त्याच्या हाताला काम नाही, योग्य शिक्षण नाही, योग्य आरोग्यसेवा नाही, देशातील वातावरण नाही यामुळे तो तणावात असल्यासारखा दिसतो आहे. त्याच्या मनातील व्यवस्था बद्दलचा राग इतर मार्गाने काढू लागला आहे. तर गेल्या काही काळात वाढत्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी आणि रॅट रेसच्या या दुनियेत अति कामाच्या ताणतणावामुळे शारीरिक आणि मानसिक तक्रारी वाढत चालल्या आहेत. पळा पळा कोण पुढे पळे तो या न्यायाने ऊर फाटेस्तोवर पळण्याचा हा सिलसिला वाढला असून, यातून अनेक धक्कादायक घटना वाढत चालल्या आहेत. अलीकडेच एका तरुणीने कार्यालयीन कामाच्या तणावामुळे आत्महत्या केल्याची घटना घडल्याने या विषयाचे गांभीर्य वाढले आहे. कामाशी संबंधित ताण म्हणजे कामाच्या मागण्या आणि त्यांच्या ज्ञानाशी आणि क्षमतांशी जुळणारे नसलेले आणि त्यांना तोंड देण्याच्या क्षमतेला आव्हान देण्याची अनेकांची मानसिकता लवकर तयार होत नाही. कामाच्या ठिकाणचा ताण दिवसेंदिवस वाढत असून, ही एक जागतिक समस्या असली तरी भारतीयांमध्ये याचे प्रमाण अधिक असल्याचे एका अहवालातून स्पष्ट झाले आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीमध्ये कामाच्या ठिकाणचे वातावरण अत्यंत वेगवान असते आणि नवनवीन मागण्या समोर ठेवल्या जातात. या मागण्या पूर्ण करताना कामाच्या ठिकाणी येणारा तणाव हा आपल्या दैनंदिन जीवनाचा एक भाग झाला आहे. डेडलाइन पूर्ण करण्यापासून ते वेगवेगळ्या स्वभावांच्या सहकाऱ्यांशी जमवून घेण्यापर्यंत, कामाशी संबंधित ताण आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर मोठ्या प्रमाणात परिणाम करू शकतो. मानसिक ताणतणाव कमी करण्यासाठी अलीकडच्या वर्षात काही सोप्या पद्धतींनी लोकप्रियता मिळवली आहे आणि त्या कामाच्या ठिकाणी विशेष प्रभावी ठरू शकतात ही वास्तवता आहे. सध्याच्या स्पर्धात्मक कार्यपद्धतीत कामाचा ताण हा अनिवार्यपणे येतो. या ताणाशी सामना करीत स्वतःच्या मानसिक आणि शारीरिक क्षमतांचा पुरेपूर वापर करून दिलेली कामे वेळेत आणि उत्तम प्रकारे पार पाडण्याचे कसब अंगी बाणवणे म्हणजेच कामाच्या ताणाचे व्यवस्थापन करणे. कामाच्या ताणाचे स्वरूप हे प्रत्यक्ष काम किंवा कामाशी निगडीत कार्यालयीन वातावरण आणि अन्य घटकांवरही अवलंबून असते. मुळात प्रत्येक व्यक्तीची स्वतःची क्षमता आणि काम करण्याची स्वतःची पद्धत असते. त्यामुळे दुसऱ्याच्या कामगिरीवर दबाव आणू नका. तुमच्या कामाची इतर कोणाशीही तुलना होऊ शकत नाही. स्वतःची तुलना करण्याच्या भावनेपासून दूर राहिल्यास अनेक प्रकारच्या तणावांपासून तुम्ही स्वतःला दूर ठेवू शकाल. जे लोक सहसा इतरांशी तुलना करतात त्यांच्यापासून दूर राहणे आवश्यक ठरते. कधी कधी कामाचा दबाव इतका वाढतो की, ते नैराश्याचे कारण बनते. या नैराश्यामुळे मनात चुकीचे विचार निर्माण होतात आणि व्यक्ती आत्महत्येसारखे पाऊल उचलू लागते. महत्तवाचे म्हणजे घडीला ताणतणाव किंवा नैराश्य यांसारखे शब्द सामान्य झालेत. पण याला कोणीही गंभीर मानसिक समस्या मानत नाही. शाळकरी मुलं असो वा एखादा निवृत्त अधिकारी, सगळयांसाठी हा प्रचलित शब्द झाला आहे. भारतातील तरुणांमध्ये मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत असल्याचं एका अभ्यासातून समोर आले आहे. या तणावाचं नैराश्यात रूपांतर होतं. तणाव हा तात्पुरता असतो आणि तो परिस्थितीनुसार विकसित होऊ शकतो. परीक्षेत कमी गुण मिळणे, कार्यालयात अंतिम मुदतीत काम पूर्ण न होणे किंवा आर्थिक संकटात सापडणे म्हणजे तणाव. पण नैराश्य दीर्घकाळ असते आणि त्यामधून टोकाचे पाऊल उचलले जाते. बरेच लोक तणाव आणि नैराश्य या एकाच गोष्टीचा विचार करतात. परंतु तीव्र नैराश्य ही एक गंभीर समस्या आहे आणि अशा नैराश्यग्रस्त लोकांना वैद्यकीय मदतीची गरज असते. कामाचा ताण, आर्थिक समस्या आणि आजार यांचा झोपेवर परिणाम होऊ शकतो. आरोग्यासाठी या गोष्टी अतिशय हानिकारक असूनही त्याकडे फारसे गांभीर्याने पाहिले जात नाही. मानसिक आरोग्याच्या समस्यांबद्दल लोक गेल्या काही वर्षांपूर्वीच्या तुलनेत अधिक जागरूक झाले आहेत, असेही चित्र आता दिसू लागले असले तरी त्यात सातत्य नाही. हल्ली अनेक जण डिप्रेशन हा शब्द वापरतात. काही जण आपल्या जवळच्या लोकांशीही याबद्दल बोलतात. पण मानसोपचारतज्ज्ञांकडे जाण्यास काही जण अजूनही कचरतात. काही गंभीर समस्या असतील तरच डॉक्टरकडे जावं असं लोकांना वाटतं. दैनंदिन जीवनात तणाव किंवा नैराश्य येऊ शकते. त्यामुळे तब्बल ८६ टक्के भारतीयांना असे वाटते की, ते त्यांच्या कामाच्या ठिकाणी संघर्ष करीत आहेत किंवा कामाच्या कार्यसंस्कृतीमुळे तणावात आहेत. केवळ १४ टक्के भारतीयांना असे वाटते की, त्यांना आपल्या कामात आनंद मिळत आहे. पण हे सर्व मानसिकतेशी जोडले गेलेले आहे. कामाच्या ठिकाणी असलेल्या बॉसचे वागणे आणि त्यांच्या कार्यालयीन कामाच्या अपेक्षा पूर्तीसाठी अनेक जण तणावात जातात, हे चित्र अनेक ठिकाणी दिसते. आपल्याकडे जास्त काम करणाऱ्यांचा, ओव्हरटाइम करणाऱ्यांचा गौरव केला जातो, ही जणू भारतातील कार्यसंस्कृतीच आहे. पगारवाढ मिळवण्यासाठी, टार्गेट पूर्ण करण्यासाठी, वरिष्ठांकडून प्रशंसा मिळवण्यासाठी लोक आठ ते नऊ तासांच्या वर काम करतात. पण याच कामाचे दीर्घकालीन घातक परिणाम आरोग्यावर होतात. कोणत्याही संस्थेशी प्रामाणिक राहून ढोर मेहनत करून काम करण्याची आपल्याकडील स्थिती असली तरी नोकरी टिकविणे हाच त्यामागील एकमेव उद्देश असतो. कामाचा दर्जा खालावत जाणे हे या संदर्भातली वाईट म्हणावी अशी एक खूण आहे. नोकर कपात ही एके काळी अगदीच वाईट आर्थिक परिस्थिती ओढवली तर केली जात असे. आता तोही एक शिरस्ताच पडून गेलेला दिसतो. लोकांना भरपगारी सुट्टी दिली जाते आणि त्यांनी या सुट्ट्यांचा वापर करणं अपेक्षित असतं. मॅनेजरने त्यांना दर तासाला ईमेल्स पाठवू नये किंवा सतत मेसेजेस पाठवू नयेत, असं अपेक्षित असले तरी कॉर्पोरेट क्षेत्रात ते आपवादाने होते. त्यामुळे ताणतणाव वाढत जातो. लोक त्यांची नोकरी निवडताना केवळ पगार आणि बढतीची संधी इतक्याच गोष्टी बघत नाहीत तर ती नोकरी करताना त्यांचे मानसिक आणि शारीरिक आरोग्यही चांगलं राहावं, अशी अपेक्षा मनोमन करतात. त्यामुळे उद्योगांच्या मालकांनी केवळ फायद्याकडे लक्ष न देता आपल्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्याकडेही तितकेच लक्ष देणे आवश्यक आहे. सरकारनेही कामाच्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या ताणतणावाच्या वाढत्या समस्यांकडे काळजीपूर्वक पाहाणं गरजेचं आहे. कारण कामाच्या जागी निर्माण झालेल्या तणावामुळे लोक आजारी पडतात किंवा वैतागतात. केवळ दरमहा वेतन मिळवण्यासाठी कुणी मृत्यूशी गाठ बांधण्याची अजिबात गरज नाही. एकूणच या जीवघेण्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी स्वतःचे योग्य व्यवस्थापन प्रत्येकाने करणे, हीच काळाची गरज ठरत आहे आणि सरकारची योग्य नियोजनाची जोड मिळणे आवश्यक आहे. या दोन्ही बाबी एकत्र झाल्या तर या देशातील तरुण मानसिक तणावातून बाहेर पडून देशाच्या विकासाच्या वाटेवर लागेल.

# घरातील सर्वांना RIP ? हिंदूंनी एकदा समजून घ्यावे !

सध्या पितृपंधरवडा सुरू आहे. या विषयावर अनेकवेळा चर्चा केली जाते. पण योग्य वेळी, योग्य वयात आपल्याला किमान पायाभूत धार्मिक ज्ञान दिले जात नसल्यामुळे पुढे हा गोंधळ कायम राहतो. म्हणूनच हे एकदा नीट समजून घेण्याची गरज आहे.

"राजद्वारे श्मशाने च य: तिष्ठती स: बांधव: " म्हणजेच तोरणाला आणि मरणाला जो तुमच्यासाठी उभा राहतो तो तुमचा खरा बांधव होय. त्यामुळेच आपल्या समाजामध्ये तोरणाला नाही जमले तरी चालेल पण मरण तरी खूप गांभीर्याने घेतले जाते. शहरांमधील दिनचर्येमुळे सगळीच मंडळी खूप व्यस्त असतात. पण एखाद्याच्या मृत्यूची बातमी कळल्यावर अनेक जणांना मात्र मनापासून वाईट वाटते. पण काय करणार ? मग निदान आपल्या सहवेदना तरी व्यक्त केल्या जातात. पूर्वी घरी जाऊन समक्ष सांत्वन करणे, फोन करणे, पत्र पाठवणे असे अनेक मार्ग होते. पण आता लघुसंदेश म्हणता म्हणता ते इतके लघु झाले आहे की त्यात खूप औपचारिकपणा येत चालला आहे. कुणाच्याही मरणाची बातमी ऐकली की लगेच समाजमाध्यमांवर RIP चा पाऊस पडतो. ' मृतात्म्यास श्रद्धांजली 'असे संदेश पाठविले जातात. एक घोर विटंबना अशी की एका राजकीय पुढाऱ्याने चक्क " त्या घरातील सर्वच RIP "असा संदेश पाठविला होता.

याचे मूळ कारण आपण समजूनच घेत नाही असे वाटते. हिंदू तत्त्वज्ञानाप्रमाणे माणसाचा आत्मा हा अमर असतो आणि तो आत्ताचा देह सोडून पुढच्या प्रवासासाठी निघतो. त्यामुळे येथे दोन गोष्टी खूप महत्त्वाच्या आहेत. कुणीही मृतात्मा कधीच होत नाही, कारण आत्मा कधीच मरत नाही. तो फक्त शरीर बदलतो. त्यामुळे मृतात्मा हा उल्लेख, हा शब्दच चुकीचा आहे. आपल्याकडे मृताच्या आत्म्याला शांती, सद्गती लाभावी, घरातल्या सर्वांना झालेले दुःख सहन करण्याचे परमेश्वराने बळ द्यावे, अशा इच्छा व्यक्त केल्या जातात. अन्य काही धर्मांमध्ये त्यांच्या श्रद्धेनुसार माणसाचे शरीर येथेच पुरले जाते. म्हणजेच त्याला आता चिरशांती किंवा चिरनिद्रा लाभावी म्हणून " रेस्ट इन पीस " म्हणजेच RIP ( किंवा, मे हिज सोल रेस्ट इन पीस ) अशी इच्छा व्यक्त केली जाते. पण ज्या हिंदूचा आत्मा पुढच्या प्रवासाला निघायला आहे त्याला " इथेच रेस्ट इन पीस "असे म्हणणे चुकीचे आहे. उलट त्याला पुढच्या प्रवासासाठी एक प्रकारे शुभेच्छा द्यायच्या असतात. हा फरक लक्षात घेऊन आता अनेक हिंदूंनी, ओम शांती, त्यांच्या आत्म्यास सद्गती लाभो, शांती लाभो अशा सहवेदना व्यक्त करण्यास सुरुवात केली आहे.

यासंदर्भात देखील काही शिस्त आणणे खूप गरजेचे झाले आहे. अनेक मंडळी दुःखग्रस्त घरामध्ये कुठल्याही वेळेला प्रत्यक्ष भेट देणे, कधीही फोन करणे अशा गोष्टी करतात. अनेकदा त्या घरातील मंडळी, दिवंगत माणसाच्या आजारपणामुळे किंवा त्यावेळी येणाऱ्या ताणामुळे थकलेली असतात. तरीही त्यांना अनेकदा सक्तीने सांत्वन करायला येणाऱ्याला सामोरे जावे लागते. प्रत्येक येणाऱ्याचा प्रश्न असतो काय झालं हो, कसं झालं हो ? उत्तरादाखल एकच टेप, घरातल्या लोकांनी किती वेळा वाजवावी याला काही बंधनच राहत नाही.

यातूनच पुढे अत्यंत औपचारिक, विनोदी आणि अप्रस्तुत गोष्टी घडू लागतात. आपल्याला किती वाईट वाटले आहे, हे दाखवण्याच्या नादात सांत्वनासाठी आलेला माणूस अन्य कुठल्यातरी भीषण घटनांचे वर्णन करून त्या कुटुंबाला आणखीनच अस्वस्थ करतो. तुम्ही अमुक डॉक्टरकडेच का गेलात, त्या हॉस्पिटलमध्ये का गेला नाहीत, ही औषधे तुम्ही का घेतली नाहीत, या टेस्ट करायला हव्या होत्या असले प्रश्न विचारून हैराण करतात. बरे हे विचारणारा माणूस, वैद्यकीय पेशव्यातिरिक्त कुठल्याही पेशातला असू शकतो.

एक प्रकारच्या या ब्लॅक कॉमेडीवर आधारित महानिर्वाण नावाचे एक विनोदी नाटक बरोबर ५० वर्षांपूर्वी मराठी रंगभूमीवर आले होते. पण आता काळ जसा पुढे गेला तसा अशावेळी घडणारे विनोदसुद्धा आणखी पुढे गेले आहेत

आमच्या माहितीतील दोन भाऊ अक्षरशः एकमेकांचे हाडवैरी झाले होते. कित्येक वर्ष दोघे एकमेकांचे तोंडही बघत नव्हते. भारतातील भावाचे निधन झालेले कळल्यावर त्याच्या विदेशात राहणाऱ्या भावाने भारतातील जवळच्या माणसांना सांगितले की मी थोड्या वेळाने फोन करतो, पण तेव्हा तुम्ही माझा फोन स्पीकरवर टाका. इथे सर्व नातेवाईक जमल्यावर त्याने स्पीकर फोनवर टाहो फोडला. " अरे दादा असा कसा रे मला सोडून गेलास ? मला भेटावे असे सुद्धा तुला वाटले नाही का रे ?" उपस्थितांच्या डोळ्यातले अश्रू थांबत नव्हते. पण काही जाणकार माणसे मात्र शांत होती. कारण तो नुकताच भारतात येऊन गेला होता, तरी आपल्या या आजारी भावाचे त्याने तोंडही पाहिले नव्हते. अन्य एका मृत व्यक्तीच्या बाबतीत असेच काही घडले होते. विदेशातल्या त्याच्या भावाने, मोबाईल वर केलेला कॉल त्या मृतदेहाच्या कानाला लावायला सांगितला होता. एखाद्या बटबटीत मालिकेमध्ये शोभतील अशाच या घटना आहेत.

आता कालानुरूप खूपच औपचारिकपणा आला आहे. अंत्यविधीला हजर असणाऱ्यांचे स्मशानातसुद्धा मोबाईल खणखणत असतात. श्रद्धांजलीचे मोठमोठे फ्लेक्स, जाहिराती, वृत्तपत्रांमध्ये पानभर मोठी जाहिरात, पेड बातम्या, श्रद्धांजली सभा, अत्यंत औपचारिक भाषणे ( अशी भाषणे अगदी स्मशानात सुद्धा हल्ली ) ठोकली जातात. दशक्रिया, दशपिंडी, तेरावे यांचे देखील आता इव्हेंट साजरे होऊ लागले आहेत. जर मृत व्यक्ती ही पुढारी किंवा पुढाऱ्याची नातेवाईक असेल तर गाव जेवणही घातले जाते.

तरीही लोकांच्या भावना, सहवेदना या मात्र सच्च्या असतात. त्या योग्य प्रकारे व्यक्त झाल्या पाहिजेत .

-मकरंद करंदीकर.
makarandsk@gmail.com

# भारतानेही सतर्क राहावे...

इस्राईल आणि हमास यांच्या युद्धातील नवा अंक आता सुरू झाला आहे. दोन दिवसांपूर्वी या युद्धात नव्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आणि संपूर्ण जगात तंत्रज्ञानाचा उपयोग आणि दुरुपयोग यावर पुन्हा चर्चा होऊ लागली. दोन दिवसांपूर्वी लेबनॉन मध्ये एकाच वेळी हजारो पेजरचा स्फोट झाला. हा स्फोट ताजा असतानाच त्याच्या दुसऱ्या दिवशी लेबनॉनमध्येच हजारो वकिटॉकीचा स्फोट झाला. या स्फोटात हजारो हिजबुल्ला जखमी झाले तर काहींना जीव गमवावा लागला. जगभर या स्फोटाची चर्चा सुरू झाली. हा स्फोट इस्राईलची गुप्तचर संघटना मोसादने घडवून आणला असा आरोप लेबनॉनने केला असून या स्फोटाला लवकरच जशास तसे उत्तर देण्यात येईल अशी घोषणा केली. या स्फोटा नंतर संपूर्ण जगात खळबळ माजली. पेजर सारख्या छोट्या उपकरणाचा संहारक शस्त्र म्हणून वापर करता येऊ शकतो असा विचारच कोणी केला नाही. वास्तविक पेजर हे सध्या कालबाह्य झालेले उपकरण आहे.

१९९० साली आलेले हे उपकरण एकमेकांशी संपर्क करण्यासाठी वापरले जात असे. अर्थात यात फोन प्रमाणे बोलता येत नाही तर या उपकरणाद्वारे फक्त एकमेकांना छोटे टेक्स्ट मेसेज पाठवता येतात. भारतात हे उपकरण १९९५ साली आले मात्र म्हणावे तसे हे उपकरण यशस्वी ठरले नाही. मोबाईल आल्यानंतर तर त्याचा वापरच संपला असे असतानाही कालबाह्य झालेले हे उपकरण हिजबुल्ला का वापरत होते असा प्रश्न पडला असे ल तर त्याचे उत्तर असे आहे की पेजर वापरकर्त्याचे लोकेशन ट्रेस करता येत नाही. केवळ मेसेज पाठवला जात असल्याने मेसेज दोघांशिवाय तीसऱ्याला दिसत नाही म्हणूनच हीजबुल्ला चे कमांडर हे उपकरण वापरत होते. हे उपरकरण सुरक्षित आहे असा त्यांचा समज होता मात्र हा समज तेंव्हा खोटा ठरला जेंव्हा लेबनॉन मध्ये एका पाठोपाठ एक स्फोट झाले. लेबनॉन मध्ये ज्या पेजरचा स्फोट झाला त्या पेजरमध्ये अल्पप्रमाणात पेइटीएन स्फोटकांचा वापर करण्यात आला होता. या पेजरमध्ये ज्या बॅटरया वापरण्यात आल्या होत्या त्या आयात करण्यात आल्या होत्या. याच बॅटर्यांमध्ये हे स्फोटके लपवले होते असे म्हंटले जाते. या स्फोटानंतर जगभर इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित केला जात आहे. भारतातही आता तसाच प्रश्न विचारला जात आहे कारण भविष्यातील युद्ध हे अशाच तंत्रज्ञानाचा वापर करून लढले जाणार आहे. आज जे तंत्रज्ञान वापरून इस्राईलने हा हल्ला केला तेच तंत्रज्ञान जर अतिरेक्यांच्या हातात लागले तर जगभर हाहाकार उडेल. भारतात तर अब्जावधी लोक मोबाईल वापरतात. जगात सर्वात जास्त मोबाईल भारतीय नागरिक वपरतात. आज जर पेजर, वॉकीटॉकीचा वापर बॉम्ब म्हणून केला जातो तर भविष्यात मोबाईलही बॉम्ब होऊ शकतो. भारतात जे मोबाईल वापरण्यात येतात त्याची बॅटरी ही परदेशातून आयात केलेली असते. भारतात वापरण्यात येत असलेल्या ९० टक्के मोबाईलच्या बॅटरया या चीन, तैवान आणि हाँगकाँग येथून आपण आयात करतो केवळ मोबाईल किंवा मोबाईलची बॅटरीच नाही तर दररोज पाच लक्ष इलेक्ट्रॉनिक वस्तू आपण परदेशातून आयात करतो. भारतातील संबंधित अथॉरिटी देखील मान्य करेल की देशात आयात होणाऱ्या ९० टक्के उपकरणांची कोणतीही तपासणी होत नाही.

यावरून लक्षात येईल की आपल्या देशात किती धोकेदायक परिस्थिती आहे. देशातील प्रत्येक नागरिक आपल्या खिशात एक बॉम्ब घेऊन फिरतोय असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मागील काही दिवसात जम्मू काश्मीरमध्ये अतिरेकी पुन्हा सक्रिय झाले आहेत. काश्मीरमध्ये घुसखोरी वाढली आहे. सीमेवर दहशतवादी कारवाया वाढल्या आहेत. गुप्तचर संस्थांच्या चौकशीतून हे निष्पन्न झाले आहे की अतिरेकी घुसखोरी करताना मोठ्या प्रमाणात मोबाईल ॲपचा वापर करत आहेत. या ॲप चा वापर गिर्यारोहक पर्वतावर, डोंगरावर चढण्यासाठी करतात आता याच ॲपचा वापर करत अतिरेकी घुसखोरी करत आहेत. चीन तर आपला १ नंबर चा शत्रू आहे. तंत्रज्ञानाचा दुरुपयोग करण्यात चीनचा हातखंडा आहे. उद्या लेबनॉन स्फोटात वापरण्यात आलेले तंत्रज्ञान अतिरेक्यांच्या हाताला लागले किंवा चीन सारखा देश त्याचा वापर शस्त्र म्हणून करू लागला तर तर काय होईल याचा विचारही करवत नाही म्हणूनच भारताने याबाबत दक्ष राहायला हवे. भारतात विदेशातून येणाऱ्या सर्व इलेक्ट्रॉनिक उपकरणांची तसेच वस्तूंची १०० टक्के तपासणी व्हायला हवी. मोबाईल, टॅब्लेट, लॅपटॉप, स्मार्ट वॉच यासारख्या गॅझेट वापरा संदर्भात सरकारने गाईड लाईन निश्चित करण्यात करावी. प्रत्येक नागरिकांना या बाबत प्रशिक्षण द्यावे. लेबनॉन मध्ये जे झाले ते भारतात होऊ नये यासाठी सरकारने आतापासूनच दक्ष राहून योग्य ती खबरदारी घ्यावी कारण युद्धाच्या या नव्या प्रकाराचा धोका भारताला अधिक आहे. भारताने लेबनॉन पासून धडा घ्यायला हवा.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

## पत्र मानस

### निवडणुकीपूर्वीच मुख्यमंत्रीपदाचा बोंभाटा हास्यास्पद

महाराष्ट्र राज्याची विधानसभा निवडणुक होणार असल्याने सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांना उमेदवारी संदर्भात उत्सुकता शिगेला पोहोचलेली आहे परंतु निवडणुकीपूर्वीच मुख्यमंत्रीपदाचा बोंभाटा केला जात आहे हे हास्यास्पदच आहे. कोणत्या पक्षाचे किती उमेदवार निवडुन येतील यावरच एकमताने निवड केली जात होती. आता तीन पक्षाचे उमेदवार अधिक निवडुन येतील त्यावर एकमत झाले तरच मुख्यमंत्री पदाचा नेता निवडला जाईल असे असताना गुडघ्याला बाशिंग लावुन तयारीत असणे हे अनाकलनीय म्हणावे लागेल. खरंतर याची गरजच नसते. त्या त्या पक्षाचे नेतृत्व करणारे नेतेच प्रमुख नेता निवडीबाबत निर्णय घेऊ शकतात. इतरांनी खुशीत गाजरे खाण्यात काय अर्थ आहे. मुख्यमंत्री पदच मिळाले नाही तर निराशेपोटी डोक्यात राख घालुन दुसऱ्या पक्षात जायला कमी करत नाहीत. मुख्यमंत्री पद उपभोगलेले नेते, अनेक मंत्रीपदे भुषवलेले नेते, स्वार्थापायी दुसऱ्या पक्षात जायला कमी करत नाहीत. ही राजकीय शोकांतिंका म्हणावी लागेल. पक्षाच्या निष्ठा सद्या तरी विष्ठा समजणारे महाभाग पक्षात तयार झाले आहेत.

**- अनंत दत्ताराम दाभोळकर. अंधेरी**

### प्रलंबित देयके देण्यात यावी

गेल्या काही वर्षात झालेली विकासकामांची बारा हजार कोटीची देयके मिळत नसल्याने कंत्राटदार हवालदिल तर काही कर्जबाजारी झाले आहेत.राज्यात २०१५१ कोटी रुपयांची महसुली तूट आणि ११०३५५ कोटी रुपयांची वित्तीय तूट आणि महाराष्ट्रावर ७ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्जाचा बोजा असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.राज्य सरकारने सुमारे एक लाख कोटी खर्चाच्या अंदाजे सात नवीन प्रमुख योजना जाहीर केल्या आहेत.देयकांसाठी असलेला निधी जाहीर केलेल्या इतर योजनांसाठी वळवला गेला आहे,असे आरोप होत आहेत. देयकांसाठी सरकारकडे पैसा नाही पण राज्य सरकारकडे जाहीराती करण्यास भरपूर पैसा आहे. थकित बिले न दिल्यास राज्यातील सर्व विकासकामे थांबणार आहेत.राज्याची आर्थिक घडी व्यवस्थित होण्यापर्यत नव्याने सुरु केलेल्या योजना तात्पुरत्या बंद करुन प्रलंबित देयके देऊन टाकावीत.जनतेचा पैसा विकासकामासाठी वापरावा,राजकीय पक्षांच्या प्रचारासाठी नको. नाहीतर विधानसभा निवडणुकीपूर्वी महाराष्ट्र सरकारला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागेल.

**-विवेक तवटे, कळवा, ठाणे**

### आपला तो बाब्या...

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मागच्या रविवारी झारखंडमधील जमशेदपूर येथे झारखंड सरकारच्या 'मुख्यमंत्री मैय्या सन्मान योजना' या महिलांसाठी आर्थिक लाभाच्या योजनेवर टीका करताना म्हटले की अशा योजना बोगस-भंपक आहेत, बिनकामाच्या आहेत. अशा योजना तुमच्या खिशावर डल्ला मारणाऱ्या आहेत. त्यामुळे जनतेने अशा सरकारला सत्तेतून बाहेर खेचायला हवे. साधारण दोन वर्षापूर्वी उत्तरप्रदेशातील बुंदेलखंड द्रुतगती महामार्गाच्या उद्घाटनानंतर एका जाहीर सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मतांसाठी जनतेला मोफत सेवा, वस्तू वाटप करणाऱ्या राजकीय पक्षांना टीकेचे लक्ष्य केले होते. त्यावेळी ते म्हणाले होतै की आपल्या देशात 'रेवडी' वाटून मते मागण्याची संस्कृती रुजत असून ती देशाच्या विकासासाठी अत्यंत घातक आहे. पंतप्रधान विरोधकांवर अशी सातत्याने टीका करताना भाजप सत्तेत असलेल्या सरकारतर्फेही सुरु करण्यात आलेल्या मोफत योजनांबद्दल अवाक्षरही काढत नाहीत. मध्यप्रदेश सरकारची 'लाडली बहन योजना', महाराष्ट्र सरकारची लाडकी बहिण योजना' याबाबत पंतप्रधानांची भूमिका काय ते कळले असते तर बरे झाले असते. नाहीतर पंतप्रधानांची टीका म्हणजे आपला तो बाब्या आणि दुसऱ्याचे ते कार्ट याहून वेगळी नाही.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

### केजरीवालांचे पाच प्रमुख प्रश्न

आम आदमी पार्टीचे सर्वेसर्वा व दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यानी नुकतेच जंतर मंतरवर पक्षाच्या 'जनता की अदालत' या जाहीर सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्य पद्धतीवर टिका केलेली असून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला उद्देशून पाच प्रमुख प्रश्न देखील विचारले आहेत. परंतु दुर्दैवाने ही सर्व पाच प्रश्न भाजप पक्षाचा अंतर्गत विषयात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी याना त्यांच्या पक्षात असलेली वयाची अट का लागू होत नाही म्हणजेच त्यांना पक्षातून निवृत्त का केले जात नाही किंवा भष्ट्रचाराचा चेहरा ठरलेल्या इतर नेत्यांना भाजप आपल्या पक्षात का घेत आहे किंवा भाजपला आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची आवश्यकता का नाही किंवा केंद्रीय तपास यंत्रणेचा गैरवापर इत्यादी विचारलेल्या प्रमुख पाच प्रश्नांची उत्तरे लवकरच माजी मुख्यमंत्री केजरीवाल याना मिळायला हवी असे वाटते.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला**

### नियमांना एवढे झुकते माप कशासाठी?

यंदाच्या गणेशोत्सवाची उत्कंठा जेवढी मंडळाच्या कार्यकर्त्यांना होती तेवढीच ती राजकीय पक्षांना देखील होती. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जनसमुहापर्यंत पोहोचण्याची ही एक उत्तम संधी होती, त्यामुळे ती कोणत्याच राजकीय नेत्यांनी दवडली नाही. वाढती चढाओढ बघता आपले सरकार परत येईल की नाही याची शाश्वती नसल्यामुळे आणि पुन्हा आपलेच सरकार यावे यासाठी प्रशासनाकडून देखील यंदा नियमांमध्ये चांगलीच सूट देऊन लोकांना खुश करण्याचा प्रयत्न झाला. आपण काही केले तरी आपल्यावर कारवाई होणार नाही याची शाश्वती मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना आल्याचे समजत होते. कर्णकर्कश आवाजचे डीजे तसेच लेझर लाईटवर बंधन आहे की नाही हेच कळत नव्हते? गर्दी जमण्यासाठी बऱ्याच मंडळानी डीजे आणि लेझर लाईट यांना जास्त पसंती दिली होती. प्रशासनाकडून नियमांमध्ये बरीच सूट दिल्यामुळे पोलीसांना देखील बघ्याची भूमिका घेण्याशिवाय पर्याय नव्हता. मोठ्या गणेशमुर्त्यांच्या उंचीने तर सीमाचं ओलांडली असून ४७ फुटांपर्यंत आपण पोहोचलो आहोत. यंदाचा गणेशोत्सव जरी जोरदार साजरा झालेला असला तरी नियमांचे बंधन तेवढेच महत्वाचे होते. एकाच विभागात ३ वेगवेगळया गणेश मंडळाचे ३ डीजे विसर्जन सोहळयात सुरु असल्यामुळे तो एकत्रित आवाज लोकांसाठी असह्य होता. मुंबईसह राज्यात मराठी सणांची परंपरा अशीच अखंडित टिकून राहणे गरजेचे असले तरी निवडणूक डोळयासमोर ठेवून नियमांना झुकते माप देणे आणि पर्यावरणाला तिलांजली देऊन सण साजरे करणे तेवढेच चुकीचे वाटते.

**- नितीन प्रकाश पडते, ठाणे (प.)**

## सुहास पटवर्धन यांना बेस्ट इंग्लिश टीचर राष्ट्रीय पुरस्कार

**बदलापूर :** भारतीय स्वयंसेवी महासंघ या सामाजिक संस्थांचा सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिला बेस्ट इंग्लिश टीचर" राष्ट्रीय पुरस्कार देण्यात येतो. यंदा बदलापूर येथील इंग्रजीचे प्रा. सुहास पटवर्धन यांना जाहीर झाला आहे. सुहास पटवर्धन हे इंग्रजी विषयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक, गाढे अभ्यासक व Learn to enjoy English या पुस्तकाचे लेखक असून महाराष्ट्रातील अनेक दुर्गम भागातील शाळा, महाविद्यालयांना स्वेच्छेने भेटी देऊन विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाचा अभ्यास कसा करावा याचे मार्गदर्शन करीत असतात. त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल त्यांना संस्थेमार्फत" पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.



# अंत्यविधीला न बोलावल्याने डोक्यात दगड घालून भावाचा खून

**प्रतिनिधी**
**■ कर्जत**

वडिलांच्या अंत्यविधीला का बोलवले नाही असे म्हणून दोन भावांमध्ये वाद झाला आणि यामध्ये विकास दिलीप चिंधे (वय – तीस वर्षे) या युवकाचा डोक्यामध्ये दगड घालून निर्घृणपणे खून करण्यात आला आहे. ही घटना कर्जत तालुक्यातील राक्षस वाडी बुद्रुक या गावामध्ये घडली. याप्रकरणी यशवंत उर्फ पप्पू शांतीलाल शिंदे/चिंधे यास पोलिसांनी अटक केली आहे.

मयत विकास शिंदे हा लातूर येथे खून करून फरार झालेला आरोपी होता. याबाबत घडलेली घटना अशी की, रविवार दिनांक २२ सप्टेंबर रोजी रात्री दहा वाजता राक्षसवाडी बुद्रुक येथे विकास दिलीप चिंधे व यशवंत उर्फ पप्पू शांतीलाल शिंदे हे दोघे सख्खे चुलत भाऊ प्रथम दारू प्यायले. दारू प्यायल्यानंतर त्यांच्यामध्ये वाद झाला. या वादामध्ये मयत विकास दिलीप चिंधे हा त्याचे वडील दिलीप सयाजी चिंधे यांचे सहा महिन्यांपूर्वी निधन झाले. त्यावेळी मला न कळवता तुम्ही त्यांचा अंत्यविधी का केला. यावरून त्यांच्यामध्ये वाद झाला. या वादा मधून दोघांनी एकमेकांना चांगलाच चोप दिला. दोघेही दारूच्या नशेत होते. या वादानंतर ते दोघेही त्याच ठिकाणी झोपले. मात्र आपल्याला विनाकारण मारहाण झाली याचा राग आलेला आरोपी यशवंत उर्फ पप्पू शांतीलाल शिंदे याने दिलीप चिंधे हा झोपलेला असताना याच्या डोक्यामध्ये दगड मारून त्यास जागीच जीवे ठार मारले.

मयत दिलीप चींधे याच्यावर लातूर येथे खून केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता आणि त्याला संभाजीनगर येथे जेलमध्ये ठेवण्यात आलेले होते. करोना काळामध्ये दिलीप हा जेलमधून पॅरोल वर गावी राक्षस वाडी बुद्रुक येथे आला होता. मात्र परत तो जेलमध्ये गेलाच नाही तेव्हापासून फरार होता. आणि आज तो पोलिसांना जेव्हा मिळाला तेव्हा त्याचा खून झालेला होता. दरम्यान या प्रकरणी आरोपी यशवंत उर्फ पप्पू शांतीलाल शिंदे हल्ली राहणार बेलवंडी तालुका कर्जत यास पोलिसांनी अटक केली असून दत्तात्रय बाळू थोरात राहणार राक्षसवाडी बुद्रुक यांच्या फिर्यादीवरून कर्जत पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अंध दाम्पत्याचे बाळ परस्पर दत्तक ! प्रसूतीनंतर अंध महिलेला स्तनपान बंद करण्याच्या दिल्या गोळ्या

**प्रतिनिधी**
**■ ठाणे**

कल्याण तालुक्यातील मोहना गोळेगाव येथील एका अंध दाम्पत्याची फसवणूक करून त्यांना कोणत्याही स्वरूपाची माहिती न देता त्यांचे नवजात बाळ छत्तीसगड राज्यातील एका जोडप्याला परस्पर दत्तक दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी अंध दाम्पत्याने तक्रार केल्यानंतर जिल्हा महिला बाल विकास विभागाच्या वतीने हस्तक्षेप केल्यानंतर मोहने येथे गणपती नर्सिंग होम नावे दवाखाना चालवणाऱ्या अनुराग धोनी या डॉक्टर विरुद्ध बेकायदेशीररित्या बाळ दत्तक प्रक्रिया राबविल्याबद्दल खडकपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून डॉक्टरला अटक करण्यात आली आहे.



कल्याण तालुक्यातील मोहना गोळेगाव येथे एक अंध दाम्पत्य राहते. या दाम्पत्याला एक मुलगा आणि मुलगी अशी दोन मुले आहेत. यातील अंध महिला पुन्हा तिसऱ्यांदा गर्भवती राहिल्याने ते गावातील गणपती नर्सिंग होम येथे डॉक्टर अनुराग धोनी यांच्याकडे तपासणीसाठी गेले. यावेळी त्यांना हे बाळ नको असल्याचे त्यांनी डॉक्टर धोनीला सांगितले. मात्र आता तुम्ही तीन महिन्यांच्या गरोदर असून गर्भपात करता येणार नसल्याचे डॉक्टर धोनीने त्या अंध दाम्पत्याला सांगितले. मात्र तुम्ही या बाळाला जन्म दिल्यानंतर माझ्या परिचयातील इच्छुक पालकांना दत्तक देऊ शकतात. त्या मोबदल्यात ते पालक तुमचा सर्व रुग्णालयाचा खर्च आणि तुमच्या दोन्ही मुलांच्या शिक्षणासाठी अर्थ साहाय्य करतील असे सांगितले. कायदेशीर प्रक्रिया माहिती नसल्याने अंध दाम्पत्याने त्यास संमती दिली. मात्र मागील महिन्यात प्रसुती झाल्यानंतर अंध दाम्पत्याशी संवाद न साधता ते बाळ डॉक्टर धोनीने छत्तीसगड येथील कौर नामक दाम्पत्याला थेट देऊन टाकले. यानंतर संबंधित अंध दाम्पत्याने अर्थ साहाय्य आणि रुग्णालयाच्या खर्चाविषयी विचारणा केली असता डॉक्टरने ते देण्यास साफ नकार दिला. यामुळे आमचे बाळ आम्हाला परत द्या, आम्ही त्याचा सांभाळ करू असे सांगितले. मात्र डॉक्टरने बाळ देण्यासह नकार दिला.

# डोंबिवलीत दोन वर्षाच्या मुलीची हत्या करत आईची आत्महत्या

**प्रतिनिधी**
**■ डोंबिवली**

डोंबिवलीत एक हृदयद्रावक घटना घडली आहे. सुखी संसार सुरु असताना अचानक सगळचं संपलं आहे. एका विवाहितेने आपल्या दोन वर्षाच्या मुलीची हत्या करुन आत्महत्या केली आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली असून पोलिस या हत्या प्रकरणाचा तपास करत आहेत. डोंबिवलीच्या रूनवाल मायसिटी या उच्चभ्रू सोसायटीत ही अतिशय धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस सखोल तपास करत आहेत. पोलिसांनी घटनास्थळावरुन मृतदेह ताब्यात घेतले आहेत.




डोंबिवलीच्या रूनवाल मायसिटी या उच्चभ्र सोसायटीमध्ये आय टी इंजिनियर राहुल सकपाळ, पत्नी पूजा, अपंग आई आणि दोन वर्षांची समृद्धी या मुलीसोबत राहत होते. मात्र पूजाने दोन वर्षांच्या समृध्दीची रुमालाने गळा दाबून हत्या केली आणि स्वतः पंख्याला गळफास घेत आपला जीवन संपवलं.

रविवारी रात्री आठच्या सुमारास हा प्रकार घडला. यावेळी राहुल हा सोसायटीच्या कामानिमित्त बाहेर गेला असतांना हा प्रकार घडला. दरम्यान याप्रकरणी पूजाचा पती राहुलच्या फिर्यादी वरून मानपाडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पोलीस सखोल तपास करत आहेत.

# 'स्वच्छता ही सेवा' अभियानातंर्गत सफाई कर्मचाऱ्यांकरीता आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

**प्रतिनिधी**
**■ कल्याण**

शासनाच्या निर्देशानुसार स्वच्छता ही सेवा हा कार्यक्रम घोषित करण्यात आलेला आहे. त्यानुसार दि. १८ सप्टेंबर २०२४ ते दि. ०२ ऑक्टोबर २०२४ या कालावधीमध्ये "स्वच्छता हि सेवा" या अभियाना तंर्गत अनेक कार्याक्रमांचे आयोजन महापालिकेमार्फत करण्यात येत आहे. सन २०२४ करीता "स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता" हा स्वच्छता ही सेवे चा मुख्य विषय निर्धारीत करण्यात आला आहे.

त्या अनुषंगाने शनिवार दि. २१ सप्टेंबर २०२४ व रविवार दि. २२ सप्टेंबर २०२४ रोजी बाई रुक्मीणीबाई रुग्णालय व शास्त्रीनगर सामान्य रुग्णालय येथे महापालिकेच्या सफाई कर्मचा-यांकरीता आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.




सदर शिबीराचे प्रथम सत्र शनिवार दि. २१ सप्टेंबर २०२४ रोजी संपन्न झाले असून शिबीरातंर्गत बाई रुक्मीणीबाई रुग्णालय येथे २४३ तर शास्त्रीनगर सामान्य रुग्णालय येथे १७२ सफाई कर्मचारी अशा एकूण ४१५ सफाई कर्मचारी यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तर शिबीराचे व्दितीय सत्रात रविवार दि. २२ सप्टेंबर २०२४ रोजी बाई रुक्मीणीबाई रुग्णालय येथे ८९ सफाई कर्मचारी व शास्त्रीनगर सामान्य रुग्णालय येथे ४७ सफाई कर्मचारी अश्या एकूण १३६ सफाई कर्मचारी यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

दोन्ही रुग्णालयांमार्फत दि. २१ सप्टेंबर व दि. २२ सप्टेंबर रोजी स्वतंत्र डॉक्टर्स व पॅरामेडीकल कर्मचारी यांची नियुक्ती करुन आरोग्य तपासणी शिबीर यशस्वीपणे पार पाडले.

# पनवेलमधील पाणी पुरवठा बंद

**■ पनवेल**

पनवेलमधील नागरिकांना पावसाळ्यातच पुढील चार दिवसांचे पाण्याचे नियोजन गुरुवारपासून करावे लागणार आहे. पनवेलला पाणी पुरवठा करणा-या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने (म.जी.प्र.) याबाबतची सूचना नोटीस पनवेल महापालिका, सिडको मंडळ, विविध ग्रामपंचायतींना दिली आहे. गुरुवारी सकाळी नऊ वाजल्यापासून ते शुक्रवारी सकाळी नऊ वाजेपर्यंत पाणी पुरवठा बंद राहणार म.जी.प्र.ने भोकरपाडा पंपस्टेशनमधील आणि जलवाहिनीवरील दुरुस्तीचे कामे हाती घेतल्यामुळे २४ तास हा पाणी पुरवठा बंद राहणार आहे. पनवेल शहरासह विविध सिडको वसाहतींमधील आणि गावांमधील नागरिकांनी पुढील पाच दिवस पिण्याच्या पाण्यासाठी साठवणूक करावी, तसेच पाण्याचा जपून वापर करावा असे आवाहन म.जी. प्र.च्या अधिका-यांनी केले आहे.

# निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर 144-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघ कार्यालयात बैठक संपन्न

**प्रतिनिधी**
**■ कल्याण**

आगामी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या निर्देशानुसार आज 144-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघ कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीत उपस्थित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमवेत ईव्हीएम-व्हीव्हीपॅट मतदान जनजागृती, स्वीप-मतदान जनजागृती व मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी उपाययोजना, दुबार मतदार, मतदार यादीचे शुध्दीकरण-नमुना अर्ज 6, 7 व 8, Vulnerable मतदान केंद्रे, मतदान केंद्रांवरील सोयीसुविधा, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचेबाबत तसेच मतदान केंद्रस्तरीय सहाय्यक यांच्या नेमणूका करणे इ. विषयांबाबत चर्चा करण्यात आली.

आगामी विधानसभा निवडणूकीत मतदारांच्या सोयीसुविधांसाठी एका ठिकाणी सुमारे 7 मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात येईल. त्याचप्रमाणे प्रत्येक मतदान केंद्रावर पिण्याचे पाणी, पंखे व तद्अनुषंगिक सुविधा पुरविण्यात येतील. दिव्यांग मतदारांच्या सोयीसाठी मतदान केंद्रांच्या ठिकाणी रॅम्प व व्हिलचेअरची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल अशी माहिती 144-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी विश्वास गुजर यांनी उपस्थित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना दिली आणि सदर प्रतिनिधींनी विचारलेल्या शंकांचे/प्रश्नांचे निरसन केले. त्याचप्रमाणे येत्या विधानसभा निवडणूकीत मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी आपल्याकडूनही सहाय्य करावे, असे आवाहन 144-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी विश्वास गुजर यांनी राजकीय पक्षाचे प्रतिनिधींना केले.

या समयी डोंबिवलीचे सहा.पोलीस आयुक्त सुहास हेमाडे, ठाणे झोपुप्रा तहसिलदार श्रध्दा चव्हाण, पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी पल्लवी सस्ते, सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी योगेश जंगले, गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती रुपाली खोमणे, नायब तहसिलदार सुरेश महाला तसेच ठाणे महापालिकेचे सहा. आयुक्त तथा सहा.मतदार नोंदणी अधिकारी अक्षय गुडधे, कल्याण डोंबिवली महापालिकेचे सहा. आयुक्त सहा.मतदार नोंदणी अधिकारी संजयकुमार कुमावत व इतर अधिकारी, कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# एमएमआरडीए प्रदेशात मराठवाडावासियांसाठी विशेष घरकुल योजना द्यावी - डॉ. जी के डोंगरगावकर

### हैद्राबाद मुक्ती संग्राम दिन सत्याग्रह कॉलेजतर्फे साजरा

**प्रतिनिधी**
**■ नवी मुंबई**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामुळे सिडको आणि म्हाडाचे अध्यक्षपद पहिल्यांदाच संजय शिरसाठ आणि अतुल सावे यांच्या रूपाने मराठवाड्याकडे आले आहे. त्याचे स्वागत करतानाच शिरसाट आणि सावे यांनी दिवंगत मोरोतराव कन्नमवार आणि यशवंतराव चव्हाण या मुख्यमंत्र्यांचा आदर्श घ्यावा व हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षांत कर्नाटकातील कल्याण-गुलबर्गा, तेलंगणा आणि मराठवाडयातून मुंबई महानगरप्रदेशात स्थलांतरीत झालेल्या मराठी बांधवांसाठी म्हाडा आणि सिडकोच्या माध्यमातून ' विशेष घरकूल योजना ' राबवावी, अशी मागणी शिक्षणतज्ज्ञ प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी येथे केली.




मंगळवारी ७६ वा हैद्राबाद मुक्तीसंग्राम दिन त्या लढयातील स्वातंत्र्यसैनिकांनी स्थापन केलेल्या राहुल शिक्षण प्रसारक मंडळाच्या खारघर येथील सत्याग्रह कॉलेजतर्फे साजरा करण्यात आला. त्यानिमित्त नवी मुंबईतील मराठवाडावासियांच्या स्नेह मेळाव्यात ते बोलत होते. डॉ. डोंगरगावकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या मेळाव्यात प्रा. मिलिंद ठोकळे, ॲड. हर्षल शाक्य, प्राचार्या नेहा राणे यांनी भारतानंतर एक वर्ष उशिराने स्वतंत्र झालेल्या मराठवाड्याच्या मुक्ती संग्रामाचा इतिहास कथन केला.

# पालिकेतर्फे विशेष स्वच्छता जनजागृती रॅलीचे आयोजन

**प्रतिनिधी**
**■ भिवंडी**

विशेष स्वच्छता जनजागृती रॅलीमध्ये शालेय विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग. केंद्रीय गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालय, भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशानुसार दि.१७/०९/२०२४ ते दि.०२/१०/२०२४ दरम्यान स्वच्छता हि रोवा (SHS) पंधरवडा "स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता अभियान भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरु असून त्या अंतर्गत दि. २३/०९/२०२४ रोजी स्व. राजव्या गाजेंगी सभागृह ते छत्रपती शिवाजी महाराज चोक मार्गावर 'विशेष स्वच्छता जनजागृती रॅली व श्रमदान' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

भिवंडी निजामपूर मनपा आयुक्त अजय वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली व भिवंडी विधानसभा (पश्चिम) आमदार श्री. महेश चौघुले यांच्या प्रमुख




उपस्थितीत स्व. राजव्या गाजेंगी सभागृह येथे सुरुवात झाली. भिवंडी मनपा उपआयुक्त (मुख्या.) श्रीमती नयना ससाणे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले असून त्या अंतर्गत सदर कार्यक्रमाचे स्वरूप, व्याप्ती व कार्यक्रमास सहकार्य करण्याचे आवाहन केले. तद्नंतर प्रमुख पाहुणे महेश चौघुले आमदार विधानसभा पश्चिम यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्व, स्वच्छतेची सुरुवात दररोज आपल्या घरापासून करण्याचे आवाहन केले.

# दोन दिवसीय भागवत सत्संगचे भाईंदरमध्ये आयोजन

- भाविकांना मिळणार श्री अनिरुद्धाचार्य महाराज यांच्या प्रवचनाची पर्वणी
- आ. प्रताप सरनाईक यांच्यातर्फे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री शिंदे ही होणार सहभागी

**प्रतिनिधी**
**■ भाईंदर**

आमदार प्रताप सरनाईक यांनी दि. २८ सप्टेंबर ते३० सप्टेंबर दरम्यान भागवत सत्संग 'सनातन राष्ट्रसंमेलना'चे आयोजन केले आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान, भाईंदर येथे दररोज दुपारी ३.०० ते सायंकाळी ७.०० या वेळेत हा सत्संग संपन्न होईल. मिरा-भाईंदरच्या नागरिकांना या भागवत सत्संग सनातन राष्ट्रसंमेलनाच्या माध्यमातून भक्तिमय वातावरणाची अनुभूती मिळणार आहे. मीरा भाईंदर मध्ये पहिल्यांदाच इतक्या भव्य प्रमाणात या संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून शहरात उत्साहाचे वातावरण आहे.




या भागवत सत्संग सनातन राष्ट्रसंमेलनास प्रमुख प्रवचनकर्ते म्हणून श्री श्री अनिरुद्धाचार्य जी महाराज उपस्थित राहणार आहेत. तीनही दिवस त्यांचे प्रवचन होईल. तर तिसऱ्या दिवशी प. पू. बालयोगी श्री सदानंद महाराज, अनंत श्री विभूषित श्री अयोध्या कोसलेस सदन पीठाधीश्वर जगद्गुरू रामानुजाचार्य स्वामी श्री वासुदेवाचार्य 'विद्याभास्कर' जी महाराज, अनंत श्री विभूषित श्री पश्चिमाम्नाय द्वारकाशारदापीठाधीश्वर जगद्गुरू शंकराचार्य स्वामीश्री सदानन्द सरस्वती जी महाराज, स्वामी गोविंद देव गिरी जी महाराज कोषाध्यक्ष - राम जन्मभूमि तीर्थ क्षेत्र न्यास (अयोध्या), गजानन ज्योतकर गुरूजी अयोध्या श्री राम मंदिर प्राणप्रतिष्ठा पुरोहित आदींचेही या संमलेनात प्रवचन होणार आहे. मिरा-भाईंदरमधील सर्व नागरिकांनी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे ही विनंती असे आवाहन आयोजक आमदार प्रताप सरनाईक यांनी केले आहे. ३० सप्टेंबर रोजी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांच्या प्रमुख उपस्थितीत सत्संगामध्ये सहभागी झालेल्या संत महात्म्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.


## मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ
म्हाडा MHADA

### ई-निविदा सुचना

कार्यकारी अभियंता [ पूर्व ] विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३६, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१ ( दुरध्वनी क्र. ०२२६६४०५२५१) यांनी योग्य वर्गवारी तथा शासकीय किंवा निमशासकीय नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकुण ०४ कामाकरीता बी-१ (टक्केवारी) नमुन्यातील ई- निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. विस्तृत ई-निविदा सुचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळ http://mahatenders.gov.in, वर उपलब्ध असतील. निविदा विक्री दिनांक २४.०९.२०२४ सकाळी १०.०५ पासून दिनांक ०१.१०.२०२४ सायंकाळी ६.१५ पर्यंत राहील. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त http://mahatenders.gov.in संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (पूर्व) मुं. झो. सु.मंडळ यांनी राखुन ठेवला आहे.

Follow us: @mhadaofficial
CPRO/A/ 720
म्हाडा - गृहनिर्मान क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

सही/-
कार्यकारी अभियंता (पूर्व).
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई


# विधानसभा निवडणूकीसाठी कर्मचाऱ्यांची बैठक



**प्रतिनिधी**
**■ उल्हासनगर**

दिनांक २३/०९/२०२४ रोजी दुपारी १२:३० वाजता सिंधु भवन, सपना गार्डन जवळ उल्हासनगर-३ येथे उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूकी संदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले.

सदर बैठकीस मा. उपविभागीय अधिकारी, विजयानंद शर्मा यांनी उपस्थित सर्व अधिकारी/कर्मचारी यांना निवडणूकीच्या कामकाजाविषयी मार्गदर्शन केले. तसेच सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून उल्हासनगर तहसिलदार, कल्याणी कदम, सहाय्यक संचालक नगररचना उमपा, ललित खोब्रागडे व तालुका कृषी अधिकारी, विठ्ठल बांबळे हे काम पाहतील अशी माहिती दिली, व सर्वांनी आप-आपल्या विषयाशी निगडित PPT चे वाचन करावे, दिव्यांग मतदाराना करिता सुविधा उपलब्ध करुन द्याव्या , जास्तीत जास्त मतदान होणेसाठी स्वीप टीम ने जनजागृती करावी व सर्वांनी मागील लोकसभेमध्ये ज्याप्रमाणे कामे केली, त्याप्रमाणे विधानसभा निवडणूकी मध्येही सर्व नियुक्त अधिकारी /कर्मचारी यांनी काम करावे असे सांगितले. सदर बैठकीच्यावेळी मा. तहसिलदार कल्याणी कदम, अतिरिक्त आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका, किशोर गवस, तालुका कृषी अधिकारी, विठ्ठल बांबळे, मा. नायब तहसिलदार प्रशांत कुमावत, तसेच निवडणुकी संबंधित सर्व अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.


## बृहन्मुंबई महानगरपालिका

### वृक्ष प्राधिकरण
**-जाहिर सूचना-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (जानेवारी २०१८ सुधारलेला) कलम ८ (३) (क) मधील तरतूदी नुसार परिमंडळ - १ मधील 'डी' विभागातील ०२ प्रस्ताव परिमंडळ - २ मधील 'जी / दक्षिण' विभागातील ०१ प्रस्ताव म्हणजेच एकूण ०३ प्रस्ताव, म.न.पा. आयुक्त, अध्यक्ष वृक्ष प्राधीकरण / वृक्ष प्राधिकरण समिती यांचा मंजुरी प्राप्त झाले आहेत.

उपरोक्त प्रस्तांवामधील झाडे कापणे / पुनरोपित करणेबाबतचा तपशील हा म. न. पा. च्या www.mcgm.Gov.in संकेतस्थळावर, बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी उद्याने व वृक्ष खातेनिहाय माहिती पुस्तिका विभाग आणि खाते प्राधिकरण कागदपत्रे या लिंक वर उपलब्ध आहे. ९७८ (डी), ९७९ (डी), ९८० ( जी / दक्षिण )

**उद्यान अधीक्षक यांचे कार्यालय,**
पेंग्विन इमारत, २ रा माळा,
वीरमाता जिजाबाई भोसले उदयान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग,
भायखळा (पूर्व) मुंबई - 400027.
दुरध्वनी क्र. २३७४२१६२
Email-sg gardens@mcgm.gov.in

पीआरओ/१३६५/जाहि/२०२४-२५
गप्पी मासे पाळा, मलेरिया टाळा.

सही/-
उद्यान अधीक्षक
व वृक्ष अधिकारी



## वसई विरार शहर महानगरपालिका
प्रभाग समिती 'ए' बोळींज, विरार (प.)
ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१ ३०५.
दूरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/ ०४/०५/०६ फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र.: व.वि.श.म./बांध/१६५/२०२४ दिनांक : २०/०९/२०२४

**वसई - विरार शहर महानगरपालिका**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्यालय, विरार (प.)**
**जाहीर ई - निविदा सुचना**

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १. | विरार (प.) प्रभाग क्र. १४ मध्ये डि-मार्ट ते शांतीनाथ प्लाझा पर्यंत फुटपाथ बनविणे. (फेर निविदा) |
| २. | विरार (प.) प्रभाग क्र. ३४ मध्ये दोन तलाव-वटार येथील सामेरपाडा येथे रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे. |

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'ए' बोळींज विभागातील खालील उल्लेखीत कामांचे कोरे निविदा फॉर्म (https://mahatenders.gov.in) या अधिकृत संकेतस्थळावर दि. २४/०८/२०२४ पासुन उपलब्ध होणार आहे. ई टेंडरिंग बाबत अधिक माहितीसाठी ई-निविदा कक्ष, वसई विरार शहर महानगरपालिका, विरार, मुख्यालय येथे संपर्क साधावा.

Please visit our official web-site
https://mahatenders.gov.in
जा.क्र./व.वि.श.म./भा.व.ज./२५७/ २०२४
दिनांक : २३/०९/२०२४

सही/-
(प्रदीप पाचंगे)
कार्यकारी अभियंता
वसई विरार शहर महानगरपालिका

## रसायन मिश्रित पाण्यामुळे मुळा नदीत मृत माश्यांचा खच

**पिंपरी :** कंपन्यांमधून निघणारे रसायन मिश्रित पाणी नदीमध्ये सोडले जात असते. याचा परिणाम नदीतील जीवांवर होत असून या रसायन मिश्रित पाण्यामुळे पिंपरी चिंचवड शहरातील पिंपळे निलख परिसरातील मुळा नदीपात्रात मोठ्या प्रमाणात मासे मृत झाले आहेत. नदी पात्रातील लाखो मासे मृत अवस्थेत आढळून आले आहेत. शहरांजवळून गेलेल्या नदींमध्ये कंपन्यांचे पाणी सोडले जात असते. यामुळे अनेकदा नदीतील जलचर प्राणी मृतावस्थेत आढळून आले आहेत. दरम्यान पिंपरी चिंचवड शहरातील पवना नदी पात्रावरील केजूबाई बंधाऱ्याजवळ यापूर्वी देखील लाखो मासे मृत अवस्थेत आढळून आले होते. त्यानंतर आज पुन्हा एकदा पिंपरी चिंचवड शहरातील पिंपळे निलख परिसरातील मुळा नदी पात्रात लाखो मासे मृत अवस्थेत आढळून आले आहेत. महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पिंपरी चिंचवड महापालिकेचे पर्यावरण विभागाच्या निष्काळजीपणामुळे काही खासगी कंपन्या मुळा नदीपात्रामध्ये रसायन मिश्रीत पाणी सोडत आहेत.



## म ह त्त्वा चे

### मनसैनिकांच्या दमदाटीने डॉक्टरांमध्ये दहशत

**बीड :** बीड जिल्हा रुग्णालयात मनसे पदाधिकाऱ्यांकडून गुंडगिरी करतानाचा व्हिडिओ समोर आला आहे. यात रुग्णालयातील डॉक्टरला शिवीगाळ व धक्काबुक्की केल्याचा प्रकार समोर आला आहे. मोबाईलमध्ये कैद झालेल्या या प्रकाराचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. बीड जिल्हा रुग्णालयात अपघातात क्रतीक टाकळकर (वय ३०, रा. नाळवंडी नाका) याचा अपघात झाल्याने जिल्हा रुग्णालयातील अपघात विभागात दाखल करण्यात आले होते. डोक्याला मार असल्याने सीटीस्कॅन करून रुग्ण परत आला. त्याच्या रिपोर्टला वेळ लागत असल्याने व्हिडीओ काढला. तो पाहून डॉ. कार्तिक हे सर्जन डॉ. सदाशिव राऊत यांना फोनवरून सांगत होते. याचवेळी मनसेच्या दोन पदाधिकाऱ्यांनी तेथे येऊन गोंधळ घालण्यास सुरुवात केली. उपचार केले नाहीत, न्यूरोसर्जन का नाही? अशा प्रकारचे प्रश्न करत डॉक्टरची कॉलर पकडली. तसेच सर्वच अधिकारी, कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केली. खुर्चीवर बसलेल्या निवासी डॉक्टरांना दोन पदाधिकाऱ्यांनी धक्काबुक्की केली. भीतीपोटी १७ डॉक्टर रुग्णालयातून गेले मनसेच्या दोन पदाधिकाऱ्यांनी गोंधळ घालण्यात आला. डॉक्टर, कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केली रुग्णालयातील निवासी डॉक्टरला धक्काबुक्की केली.

### लिपिक असल्याच्या बतावणीने महिलेची फसवणूक

**पुणे :** इंटरनेट पुरवठादार परवाना मिळवून देण्याच्या आमिषाने एका महिलेची २० लाख ९२ हजार ३९९ रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांकडून तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी तक्रारदार महिलेकडे मंत्रालयात लिपिक असल्याची बतावणी केली होती.याबाबत एका ४३ वर्षीय महिलेने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आाहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार सुनील नामदेव गडकर, किरण सुनिल गडकर (दोघेरी रा. भिंताडे नगर, आंबेगाव) यांच्यासह एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार महिला भारती विद्यापीठ भागात राहायला आहे. तक्रारदार महिला आणि त्यांच्या पतीची आरोपींशी एका व्यायामशाळेत ओळख झाली.

### पाकिस्तानी अभिनेत्याच्या चित्रपटाविरोधात मनसेचे आंदोलन

**नाशिक :** पाकिस्तानने भारतावर २०१६ साली उरी आणि २०१९ यावर्षी पुलवामा येथे अतिरेकी हल्ल्यानंतर भारताच्या सिने वर्कर्स असोसिएशनने पाकिस्तानी कलावंतांना भारतात कार्यक्रमास बंदी घातली. परंतु, या बंदीला झुगारून फवाद खान या पाकिस्तानी अभिनेत्याचा 'लिजेंड ऑफ मौला जट' हा चित्रपट भारतात प्रदर्शित होत आहे. चित्रपटाची जाहिरात नाशिकरोड येथील रेजिमेंटल मल्टिप्लेक्समध्ये लावण्यात आली आहे. चित्रपट प्रदर्शित करु नये, यासाठी मनसे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी जाहिरातीचा फलक जाळून निषेध केला.पाकिस्तानी अभिनेत्याचा चित्रपट प्रदर्शित होऊ न देण्याचा इशारा मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी याआधीच दिला आहे.

# तुम्हाला जरांगे आणि बहुजन समाज नकोय का?

## संभाजीराजेंचा महायुती सरकारला सवाल

प्रतिनिधी
■ जालना

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटलांनी जालन्यात आमरण उपोषण सुरू केले आहे. मनोज जरांगे यांच्या उपोषणाचा आज सातवा दिवस असून, संभाजीराजे छत्रपती यांनी त्यांची भेट घेतली आहे. मनोज जरांगेंची भेट घेतल्यानंतर संभाजीराजे छत्रपती यांनी सरकारला खडे बोल सुनावले आहेत. जरांगे पाटील हे यंदाच्या वर्षात सहाव्यांदा आमरण उपोषण करीत आहेत, खरं तर ही राज्यासाठी शरमेची बाब आहे. एक व्यक्ती आरक्षणासाठी जीवाची बाजी लावत आहे आणि त्यावर सरकारने अजूनही निर्णय घेतला नाही. डॉक्टरांकडून मी सगळे रिपोर्ट मागवून घेतले आहेत. छत्रपती घराण्यातील व्यक्ती म्हणून त्यांची तब्येत पाहायला आलो आहे. तब्येत खराब झालेली असताना सरकार एअर कंडिशनमध्ये बसले आहे. विरोधक बघ्याची भूमिका घेत आहेत हे चालणार नाही, असा इशाराही संभाजीराजे छत्रपती यांनी दिला आहे. संभाजीराजे छत्रपती



जालन्यातील आंतरवालीतून बोलत होते.

मनोज जरांगे यांचे मेडिकल रिपोर्ट फार खराब आले आहेत. त्यांना कधीही काहीही होऊ शकतं. ते त्यांच्या तब्येतीची काळजी घेणार असल्याचा त्यांनी मला शब्द दिला आहे. सरकारने आरक्षण देणार आहे की नाही ते आताच सांगून टाकावं. निवडणूक जवळ आली असतानाही तुम्हाला जरांगे आणि बहुजन समाज नको आहे का? असा टोलाही संभाजीराजेंनी महायुती सरकारला लगावला. महायुती सरकारने आरक्षणाचं आश्वासन दिलं होतं त्यावर नंतर काहीही भाष्य केलं नाही. जरांगे यांची आरक्षणासाठी अधिवेशन घेण्याची मागणी आहे. सरकारने अधिवेशन घेऊन आधीच्या सरकारने दिलेले 10 टक्के आरक्षण कसं टिकवणार तेही सांगावं, असा सवालही संभाजीराजे छत्रपतींनी विचारला आहे.

मुख्यमंत्री अन् उपमुख्यमंत्र्यांकडे भरपूर विमानं आहेत. मग इकडे या आणि त्यांच्या तब्येतीचे रिपोर्ट जाणून घ्या. त्यांना काही झाले तर सरकार आणि विरोधक दोघेही जबाबदार असतील, असं म्हणत जरांगे यांना पाणी पाजण्याची गरज असेल त्यावेळी मी इथे यायला तयार असल्याचंही संभाजीराजेंनी सांगितलंय. घटनात्मक पद्धतीने आंदोलन असेल तर चुकीचे नाही. धनगर ओबीसींचे नेते आंदोलन करू शकतात.

### 'मिस्टर संभाजी भोसले, मी आता तुम्हाला राजा म्हणणार नाही'- लक्ष्मण हाके

*__जालना :__ मराठा समाजाला कुणबी जातप्रमाणपत्रांसह ओबीसीतून आरक्षण द्यावं ही मागणी घेऊन मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा आंतरवाली सराटी या गावात उपोषणाला बसले आहेत. (२३ सप्टेंबर) त्यांच्या उपोषणाचा आठवा दिवस आहे. अधिवेशनातून या प्रश्नावर तोडगा निघू शकतो''. तसेच संभाजीराजे मनोज जरांगे यांना म्हणाले, ''तुम्ही निवडणुकीत कोणाला पाडायचं बोलू नका, त्यापेक्षा तुम्ही निवडून कसं आणायचं ते पाहा. तुम्ही आमच्याबरोबर आला नाहीत तरी चालेल. मात्र तुम्ही सत्तेत बसलं पाहिजे. सत्ताधारी तुमची व तुमच्या मागण्यांची दखल घेत नसतील तर तुम्हीच सत्तेत या''. दरम्यान, संभाजीराजे छत्रपतींनी मनोज जरांगे यांच्या आंदोलनस्थळाला भेट दिल्यानंतर ओबीसी आरक्षणासाठी लढणारे कार्यकर्ते लक्ष्मण हाके यांनी संभाजीराजेंवर टीका केली आहे. ''मिस्टर संभाजी भोसले, मी आता तुम्हाला राजा म्हणणार नाही'', असं लक्ष्मण हाके यांनी म्हटलं आहे. ''तुम्ही राजर्षी शाहू महाराजांचे वैचारिक वारस नाही'', असा टोला देखील यांनी लगावला आहे.*

### ... तर महाराष्ट्रातल्या जनतेला कुत्र्याचं मटण खावं लागेल - गोपीचंद पडळकर

*__कोल्हापूर :__ कोल्हापूरमध्ये रास्ता रोको आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला भेट देत गोपीचंद पडळकर यांनी आरक्षणाच्या प्रश्नावर आपली भूमिका व्यक्त केली. आम्ही शेळ्या मेंढ्या पाळणं सोडलं तर कुत्र्यांचं मटण खावं लागेल, कोल्हापुरातील धनगर आंदोलनात भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी हे वक्तव्य केले आहे. 'जेव्हा धनगर समाज शेळ्या मेंढ्या राखणं बंद होईल तेव्हा महाराष्ट्रातील लोकांना कुत्र्यांच मटण खावं लागेल. ही महाराष्ट्राची परिस्थिती आहे. ', असं वक्तव्य गोपीचंद पडळकर यांनी केलं आहे. पुढे ते असेही म्हणाले की, कोल्हापुरला आल्यावर सगळ्यांना वाटतं बोकडाचं मटण खावं, तांबडा रस्सा आणि पांढरा रस्सा तुम्ही खाता. पण तुम्ही धनगराला मारता... तुमचं आम्ही काय मागत नाही. सरकार कोणती सुविधा देत नाही पण फिरत असताना तुम्ही त्याला गुरासारखं मारतात. यानंतर पोलीस कोणतीही दखल घेतल नाही. जर धनगरांनी शेळ्या मेंढ्या राखणं बंद केलं तर काय होईल आवस्था? असा आक्रमक सवालच गोपीचंद पडळकर यांनी सरकारला केला आहे.*

## समोरासमोर झालेल्या अपघातात दोघे जखमी



प्रतिनिधी
■ सावंतवाडी

सावंतवाडी येथील मोती तलाव परिसरात दुचाकी व रिक्षा यांच्या समोरासमोर धडक होऊन अपघात घडला. या अपघातात दोघेजण किरकोळ जखमी झाले आहेत तर रिक्षाचे मोठे नुकसान झाले आहे. ही घटना आज दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास घडली. दरम्यान जखमींना येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी आहे तसेच पोलीस घटना स्थळी दाखल झाले असून अधिक तपास सुरू आहे.

## वंचितचा मराठा समाजाला ओबीसी आरक्षण देण्यास विरोध

### आंबेडकरांची 55 लाख कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्याची मागणी

प्रतिनिधी
■ पुणे

अनुसूचित जाती, जमाती व ओबीसी वर्गाला व्यवस्थेविरोधात घालण्याचा प्रयत्न काही पक्ष करत आहेत. ओबीसी व मराठा यांचे ताट वेगळे असले पाहिजे. मनोज जरांगे यांनी जी मागणी केली की, ओबीसीमधून मराठा समाजाला आरक्षण द्यावे त्यास आमचा विरोध आहे. सरकारने जे ५५ लाख मराठ्यांना ओबीसी प्रमाणपत्र वाटप केले ते रद्द करण्यात यावे. जो कोणी ओबीसी आहे त्यांनी कागदपत्रे दाखल केल्यावर त्यांना ओबीसी प्रमाणपत्र मिळावे परंतु शासन जे प्रमाणपत्र वाटप करते त्याला आमचा विरोध कायम राहणार आहे, असे मत



वंचित बहुजन आघाडीचे नेते अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर यांनी पत्रकार परिदेत व्यक्त केले.

आंबेडकर म्हणाले, ब्रिटिश काळानंतर सर्व जातीधर्माचा सहभाग व्यवस्थेत असावा याकरिता घटनेच्या माध्यमातून काही जातींना आरक्षण देण्यात आले. त्याचे वर्गीकरण करण्याचा अधिकार हा सर्वाच्च न्यायालयास नसून तो संसदेला आहे. समाज जात-धर्म आधारावर विभागला गेल्याने परकीय शक्ती देशात राज्य करु शकल्या ही परिस्थिती पुन्हा येऊ नये. सर्वाच्च न्यायालयाने एससी, एसटी आरक्षण वर्गीकरण बाबतीत घेतलेला निर्णय हा संविधानाचे मुळ चैकटीला धक्का लावणारा आहे. दुर्दैवाने आरक्षण हे विकासाचे साधन नाही. तर आरक्षण प्रतिनिधीत्व देणारे साधन आहे. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले की, काही मुद्द्यावर आम्ही एकमत आणले आहे. मतभेद काळाच्या ओघात समाविष्ट होत जातील. संविधानाच्या मार्फत कन्वहरजन्स मुद्दा आणला आहे. त्यामार्फेत आपला देश स्वत:च्या पायावर उभा राहू शकतो. परंतु एकोपा आणण्याऐवजी विभक्तपणा आणला जात आहे.

## आईला उदरनिर्वाह भत्ता न दिल्याने मुलावर गुन्हा दाखल

प्रतिनिधी
■ रत्नागिरी

जिल्हाधिकारी यांच्या आदेशाचे उल्लंघन करत आईला ३ हजार रुपयांचा उदरनिर्वाह भत्ता न देणाऱ्या मुलाविरोधात रत्नागिरी शहर पोलिस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आईला उदरनिर्वाह भत्ता न दिल्याप्रकरणी दाखल झालेला हा जिल्ह्यातील पहिलाच गुन्हा आहे.

राजू ऊर्फ राजेंद्र विठ्ठल तळेकर असे गुन्हा दाखल केलेल्या मुलाचे नाव आहे. त्याच्या विरोधात पोलिस हेड कॉन्स्टेबल दिनेश हरचकर यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार, शोभा विठ्ठल तळेकर यांनी जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांच्याकडे उदरनिर्वाह भत्ता मिळण्यासाठी अर्ज केला होता. त्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी १४ फेब्रुवारी २०२४ ते अपिलाचा दिनांक लागेपर्यंत प्रतिमहिना ३ हजार रुपये शोभा तळेकर यांना देण्याचे आदेश दिला होता. तसेच या आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय दंड विधान कायदा कलम १८८ नुसार शिक्षेस पात्र राहील, असेही आदेशात म्हटले होते. या आदेशाचे पालन मुलाने केले नसल्याची तक्रार शोभा तळेकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे एका अर्जाद्वारे केली होती, त्याआधारे आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी राजू तळेकर याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## निवडणुकीपूर्वी देवेंद्र फडणवीस यांचा शरद पवारांना धक्का

### रोहित पवारांच्या मतदार संघातून प्रा. मधुकर राळेभातांचा भाजप प्रवेश

प्रतिनिधी
■ अहमदनगर

महाराष्ट्रात केवळ मोठे नेतेच पक्ष बदलत नाहीत तर कार्यकर्तेही आपल्या मूळ पक्षापासून फारकत घेऊन इतर पक्षांमध्ये सामील होत आहेत. अलीकडच्या काळात अनेक नेते आणि कार्यकर्त्यांनी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस सोडून शरद पवार यांच्या गटात प्रवेश केला आहे. आता अहमदनगरमध्ये शरद पवार गटाला जोरदार धक्का बसणार आहे. येथे आमदार रोहित पवार यांचे कार्यकर्ते आज भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत.



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत अहमदनगर जिल्ह्यातील शरद पवार गटातील काही वरिष्ठ पदाधिकारी भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. कर्जत जामखेडे विधानसभा मतदारसंघातून शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांना भाजप दणका देणार आहे. येथील तालुकाध्यक्ष प्रा. मधुकर राळेभात भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याने हा रोहित पवार यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे. याशिवाय उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे कार्यकर्तेही भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. कोणत्याही पक्षासाठी कार्यकर्त्यांची मोठी जबाबदारी असते. तळागाळात ते पक्षाची विश्वासार्हता मजबूत करण्याचे काम करतात आणि त्यांच्या बदलत्या बाजू कोणत्याही पक्षासाठी हानिकारक असतात. काही दिवसांपूर्वी भाजप नेते अशोक चव्हाण यांचे मेहुणे भास्करराव पाटील खतगावकर आणि मीनल पाटील खतगावकर आणि माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. नांदेडमध्ये लोकसभेच्या जागेसाठी पोटनिवडणूक होत असताना या घडामोडी समोर आल्या आहेत.

## इम्तियाज जलील शेकडो वाहनांसह मुंबईला रवाना

प्रतिनिधी
■ संभाजीनगर

आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या रामगिरी महाराज आणि भाजपा आमदार नितेश राणे यांच्यावर कारवाई का होत नाही? याचा जाब विचारण्यासाठी एमआयएम प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी मुंबईकडं प्रस्थान केलंय. राज्यात मुद्दाम विशिष्ट समाजाला लक्ष्य केलं जातंय. तरीही सरकार कुठलीच कारवाई होत नाही. त्यामुळं मुख्यमंत्र्यांना कायदा कळावा म्हणून त्यांनी संविधानाची प्रत देण्यासाठी मुंबईला जात असल्याचं जलील



म्हणाले.

इम्तियाज जलील यांच्यासह आज (22 सप्टेंबर) शेकडो वाहनांतून लोक समृद्धी महामार्गावरुन मुंबईच्या दिशेनं रवाना झाली. सावंगी टोल नाका पार करताना समृद्धी महामार्गाचा रस्ता जाम झाला होता. वैजापूरपर्यंत हा महामार्ग जाम झाल्यानं अनेकांना अडचणीचा सामना करावा लागला. "आम्ही कुठल्याही परिस्थितीत मुंबईला पोहोचू. कुठं जाणार हे माहित नाही. मात्र, सरकारला जाब विचारल्याशिवाय राहणार नाही," असा इशारा जलील यांनी दिलाय.

## चांदीच्या दागिन्यांसाठी भावानेच केली भावाची निर्घृण हत्या

प्रतिनिधी
■ कोल्हापूर

कोल्हापूर जिल्ह्यातील हुपरीमधील चांदीचा व्यापार करणाऱ्या व्यावसायिकाची निर्घृणपणे हत्या करण्यात आल्यानंतर एकच खळबळ उडाली होती. या घटनेनंतर तपासाची चक्रे फिरवत अवघ्या काही तासात कोल्हापूर पोलिसांनी गुन्ह्याचा उलघडा केला असून भावानेच भावाची हत्या केल्याचे निष्पन्न झाले. ब्रआरोपी प्रविण सुकुमार हालुंडे (वय 28 रा. मानेनगर रेंदाळा वाळवेकर नगर



हुपरी आणि आनंद शिवाजी लेमलापूरे (वय 22 रा. श्री चौक शिवाजीनगर हुपरी ता. हातकणंगले जि. कोल्हापूर) या दोघांना चोरीस गेलेले चांदी व गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकलसह गोकुळ शिरागांव पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आलं आहे. पुढील तपास गोकुळ शिरगांव पोलीस ठाणे करीत आहेत.

मयत ब्रह्मनाथ सुकुमार हालुंडे व त्याचा लहान भाऊ प्रविण सुकुमार हालुंडे यांची वडिलोपार्जीत मालमत्तेबाबत झालेल्या वाटणी वरुन वाद सुरु होता. पोलिसांनी हाच धागा पकडत तपास सुरु केला. प्रविणला राहत्या घरातून ताब्यात घेत तपास केला असता, त्याने सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरवात केली. पथकाने खाक्या दाखवताच त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली.

## पुण्यातील 32 गावांनी घेतला मोठा निर्णय

### आता थेट निवडणुकीवर टाकणार बहिष्कार

प्रतिनिधी
■ पुणे

कर कमी करावा अन्यथा निवडणुकांवरती बहिष्कार घालू असा निर्णय ३२ गाव कृतीसमितीने घेतला आहे. 'गाव विकणे आहेत' अशा आशयाचे बॅनर ३२ गावांमध्ये लावण्यात आले आहेत. पुणे महापालिकेच्या आवाजवी कर धोरणामुळे ३२ गावातील ग्रामस्थ चांगलेच आक्रमक झाले आहेत. महापालिकेचा जुलमी कर भरू शकत नसल्याने आमचे गावच महापालिकेने विकत घ्यावे अशी मागणी या ग्रामस्थांनी केली आहे.




यासाठी ३२ गावांच्या ग्रामस्थांनी 'गाव विकणे आहे' अशा प्रकारच्या जाहिराती गावोगावी लावत पुणे महापालिकेचा निषेध व्यक्त केला आहे.

पुणे महापालिकेने कोणत्याही सुविधा न पुरवता, टॅक्स मात्र भरमसाठ लावलेला आहे या पार्श्वभूमीवर 'आम्ही टॅक्स भरू शकत नाही, तुम्ही आमचे गावच विकत घ्या.', अशी भूमिका ३२ गावातील ग्रामस्थांनी घेतली आहे. टॅक्स या विषयांवरून ३२ गावातील नागरिक प्रचंड आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. यासाठी पुढील मोठ्या आंदोलनाची तयारी सुरू केली असून महानगरपालिकेला टाळं ठोकण्याचा इशारा गावकऱ्यांनी दिलाय.

## मारवाडी फाउंडेशनतर्फे रामदास आठवलेंना डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या हस्ते प्रदान

प्रतिनिधी
■ नागपूर

आम्हाला चौथ्यांदा सत्तेत येण्याची गॅरंटी नाही. मात्र रामदास आठवले यांना आमचे सरकार येऊन मंत्री होण्याची गॅरंटी आहे. खरे म्हणजे सरकार कोणाचेही आले तरी ना. रामदास आठवले यांचे मंत्रीपद पक्के आहे. असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले.

मारवाडी फाउंडेशनतर्फे देण्यात येणारा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांना नितीन गडकरींच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला फाऊंडेशनचे अध्यक्ष गिरीश गांधी, माजी खासदार



प्रदीप गांधी, सुधीर बाहेतील, सीमा आठवले उपस्थित होते. गडकरी म्हणाले की, ना. रामदास आठवले आता तिस-यांदा केंद्रात मंत्री आहेत. पुढे होणा-या लोकसभा निवडणुकीत आमचे सरकार येऊन त्यांना पुन्हा मंत्री होण्याची गॅरंटी आहे. आम्हाला मात्र ती गॅरंटी नाही. गमतीने मी नेहमीच म्हणत असतो की, राज्य कोणाचेही आले तरी ना. रामदास आठवले यांचे स्थान मंत्रिमंडळात पक्के आहे. एकदा लालुप्रसाद यादव हे रामविलास पासवान यांना म्हणाले होते की, ना. रामदास आठवले राजकीय हवामान शास्त्रज्ञ आहे.

राजकारणात पुढे काय होणार याचे भविष्य त्यांना चांगले कळते. गिरीश गांधी, सामाजिक , राजकीय, साहित्यीक अशा सर्वच क्षेत्रातील व्यक्तींना प्रोत्साहन देत असल्याचे गडकरी म्हणाले.

मी चळवळीतुन पुढे आलो असून समाजामध्ये व्यावहारीक आंबेडकरवाद रुजवायचा आहे. सर्व जाती धर्मीय समाजाला जोडायचे आहे.देश एकसंघ जोडून ठेवला पाहिजे हीच डॉ बाबासाहेब आंबेडकरांची भावना होती.त्यानुसार सामाजिक आणि आर्थिक न्याय मिळवून देण्यासाठी आपला संघर्ष सुरू आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने पुरस्कार मिळतो h माझ्या आयुष्यातील मोठा क्षण आहे असे सत्काराला उत्तर देताना रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदींना सत्तेत येण्याचे तंत्र माहीत असल्याने आम्ही चौथ्यांदा केंद्रात सरकार बनवू असा विश्वास ना.रामदास आठवले यांनी यावेळी व्यक्त केला.

## जालन्यात सकल हिंदू समाजाच्या बंदला प्रतिसाद

### व्यापारी संघटना रस्त्यावर; धार्मिक रॅलीदरम्यान झाला होता वाद

प्रतिनिधी
■ जालना

जालना शहरात आज सकल हिंदू समाजाच्यावतीन पुकारण्यात आलेल्या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळला. जालना शहरात चार दिवसांपूर्वी ईद ए मिलाद निमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीत घडलेल्या एका घटनेच्या निषेधार्थ आजचा हा बंद पुकारण्यात आला होता.

हिंदू व्यापाऱ्यांच्या दुकानांवर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या व वाढत्या गोहत्याच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाच्या वतीने सोमवारी जालना शहर बंदची हाक देण्यात आली होती. या वेळी विराट मूकमोर्चा काढण्या आला . दरम्यान, जालना शहरातील भाजीपाला मार्केट, काही शाळा बंद ठेवण्यात आल्या आहेत.



दरम्यान, सेंट मेरीज हायस्कूलमधील सहामाही परीक्षेचा आजचा पेपर देखील पुढे ढकलण्यात आला आहे.

दोन दिवसांपूर्वी जालन्यात एका धार्मिक कार्यक्रमाच्या रॅलीदरम्यान व्यापाऱ्यांच्या दुकानावर भांडण झाले होते. या प्रकारामुळे व्यापाऱ्यांकडून या प्रकाराचा निषेध करून जालना बंदची हाक देण्यात आली होती. यानिमित्ताने भव्य विराट मूकमोर्चा काढण्यात आला. सकाळी 10 वाजता मोर्चाला बडी सडक येथून सुरुवात झाली. हा मोर्चा शहरातील मुख्य मार्गावरून गांधीचमन पर्यंत काढण्यात आला.विशेष म्हणजे या मोर्चात कोणत्याही धर्म, पंथाविरोधात घोषणाबाजी करण्यात आली नाही. जालना बंदच्या हाकेला चांगला प्रतिसाद देत जालन्यातील बाजारपेठ, कपडाबाजार, किराणा बाजार अशी सर्वदालने या निमित्ताने बंद ठेवण्यात आली होती. मराठवाडा तसेच विदर्भाचे केंद्र असलेल्या जालना शहरातून मोठ्याप्रमाणात एसटी बसेस सुरू असतात. सोमवारी सकाळपासून ग्रामीणसह इतरत्र जाणाऱ्या सर्व बसेस सुरू राहणार असल्याचे आधीच कळवण्यात आले होते. त्यानुसार जालना शहराच्या रिंगरोडवरून बस सुरु होत्या. यामुळे कोणत्याही बसेस रद्द करण्यात आल्या नाही.

# राष्ट्रीय जुनिअर कॅरम स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ रवाना

**मुंबई :** भारतीय कॅरम महासंघाच्यावतीने २३ ते २६ सप्टेंबर २०२४ पासून एल एन आय पी ए ग्वालियर, मध्य प्रदेश येथे ४९ वी जुनियर राष्ट्रीय अजिंक्यपद कॅरम स्पर्धा संपन्न होत आहे. या स्पर्धेसाठी ८ मुले, ८ मुली व संघ व्यवस्थापक असा एकंदर १८ जणांचा महाराष्ट्राचा संघ ग्वालियर येथे रवाना झाला आहे. सांघिक व वयक्तिक अशा दोन गटांमध्ये या संघातील खेळाडू सहभागी होणार आहेत. महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्यावतीने संघाला प्रत्येकी २ टी शर्ट्स, २ ट्राऊजर्स, वातानुकिलित रेल्वे प्रवास सवलत तसेच प्रत्येकी रुपये १,०००/- खर्चासाठी देण्यात आले आहेत. स्पर्धेला रवाना होण्यापूर्वी संघाचे २ दिवसांचे प्रशिक्षण शिबीर मुंबईत घेण्यात आले होते. महाराष्ट्राचा संघ पुढीलप्रमाणे १८ वर्षा खालील मुले (जुनियर गट) : १) कौस्तुभ जागुष्टे २) आयुष गरुड ३) महम्मद हसनैन अर्शद शेख ४) सार्थक केरकर ५) मुनावर अब्बास अन्वर अब्बास सय्यद ६) भाव्या सोलंकी २१ वर्षाखालील मुले ( युथ गट) : १) शेख फैझान



# माहीम जुवेनील चषक कॅरम स्पर्धेत ज्युनियर 32 खेळाडूंमध्ये चुरस

प्रतिनिधी
■ मुंबई

माहीम जुवेनील स्पोर्ट्स क्लब-शिवाजी पार्क व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे २५ सप्टेंबर रोजी होणाऱ्या कॅरम स्पर्धेत शालेय-कॉलेजमधील ज्युनियर ३२ खेळाडूंमध्ये अजिंक्यपदाचा माहीम ज्युवेनील चषक पटकाविण्यासाठी चुरस होईल. मुंबई शहर व उपनगर, ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यातील शालेय ज्युनियर खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी कॅरम स्पर्धा होत असून पहिल्या १६ विजेत्या-उपविजेत्यांना माहीम जुवेनील स्पोर्ट्स क्लबचे अध्यक्ष विजय येवलेकर व उपाध्यक्ष विकास खानोलकर यांच्या हस्ते आकर्षक १६ पुरस्कारासह स्ट्रायकरद्वारे गौरविण्यात येणार आहे. माहीम जुवेनील पव्हेलीयन, शिवाजी पार्क येथे ही विनाशुल्क कॅरम स्पर्धा रंगणार आहे.

शालेय-महाविद्यालयीन मुख्य कॅरम स्पर्धेअगोदर स्पर्धात्मक सरावात विजेतेपद पटकाविण्यासाठी आयएनजी इंग्लिश स्कूल-वसईचा श्रीशान पालवणकर, रुपारेल कॉलेजचा कुणाल जाधव, पाटकर विद्यालय-डोंबिवलीचा नील म्हात्रे, एमडी कॉलेजचा साम्यक पवार, ठाकूर रामनारायण स्कूल-दहिसरचा तीर्थ ठाकर, इन्फंट जेसस स्कूल-अंबरनाथचा ओमकार चव्हाण, लव्ह ग्रोव्ह एमपीएसचा सिद्धांत मोरे, वरळी सीफेस म्युनिसिपल स्कूलचा रेहान शेख, नारायण गुरु स्कूल-चेंबूरचा उमेर पठाण, जन गण मन कॉलेज-कोपरचा अथर्व म्हात्रे, पोद्दार अकॅडमी हायस्कूल-मालाडचे पुष्कर गोळे व प्रसन्ना गोळे आदी उत्सुक आहेत. परिणामी दादरकरांना दर्जेदार लढती पाहण्यास मिळतील. श्रीशान पालवणकर वि. बालाजी काठूरोजीगारी आणि पृथ्वी बडेकर वि. शुभम परमार यामधील उदघाटनीय लढती एमजेएससीचे सेक्रेटरी सुनील पाटील, खजिनदार महेश शेट्ये व शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहेत.

# पाकिस्तानला चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी मोठा धक्का!

## करोडो रुपये गमवावे लागणार

वृत्तसंस्था
■ नवी दिल्ली

चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी पाकिस्तान जोरदार तयारी करत आहे. पण चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी आता पाकिस्तानला एक मोठा धक्का बसला आहे. त्यामुळे आता पाकिस्तानला करोडो रुपये गमवावे लागू शकतात.

चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारताला पाकिस्तानमध्ये बोलण्यासाठी पीसीबी आक्रमक झाली होती. त्यानंतर भारताने त्यांना एकच उत्तर दिले आणि त्यानंतर पाकिस्तानने भारताचा नाद सोडला. बीसीसीआयने ही गोष्ट भारत सरकारवर सोडली. भारत सरकारने परवानगी दिली तरच आम्ही पाकिस्तानात येऊ असे, म्हटले होते. त्यानंतर आयसीसीची एक बैठक झाली. त्यानंतर पाकिस्तानने भारताचा नाद सोडला होता.



काही दिवसांपूर्वी पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्या कसोटी मालिका खेळवली गेली. या मालिकेत पाकिस्तानला २-० असा मानहानीकारक पराभव पत्करावा लागला. त्यानंतर आता पाकिस्तानमध्ये इंग्लंडचा संघ कसोटी मालिका खेळण्यासाठी येणार आहे. प्रत्येक मालिकेसाठी महत्वाची गोष्ट असते ती मालिका कुठे खेळवली जाणार आहे. त्यासाठी पैसा ही गोष्ट महत्वाची असते.

पाकिस्तानमध्ये सध्याच्या घडीला स्टेडियमची कामं सुरु आहेत. त्यामुळे ही मालिका पाकिस्तानला देशाबाहेर खेळवायची होती. पण त्यासाठी लागणारा पैसा हा प्रसारण हक्कांमधून येत असतो. यावेळी पाकिस्तानच्या क्रिकेट संघटनेने हे प्रसारण हक्क १७५ कोटी रुपयांना विकण्याचे ठरवले आहे. पण आतापर्यंत पाकिस्तानच्या क्रिकेट मंडळाला एवढे पैसे देण्यासाठी कोणीच तयार नाही. आतापर्यंत पाकिस्तानला ज्या ऑफर आल्या आहेत त्या २० ते ३० टक्के रक्कम देण्यास तयार आहे. त्यामुळे जर पाकिस्तानला १७५ कोटी रुपये मिळाले नाही तर त्यांना पहिली गोष्ट मालिका देशाबाहेर खेळवता येणार नाही. दुसरी गोष्ट म्हणजे जर पाकिस्तानला जर २० किंवा ३० टक्के मिळाले तर त्यांना करोडोंचे नुकसान होऊ शकते, हे आता समोर आले आहे.

चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी पाकिस्तानला जर हा धक्का बसला तर त्यांचे आर्थिक नियोजन बिघडू शकते. या गोष्टीचा फटका चॅम्पियन्स ट्रॉफीला होऊ शकतो. त्यामुळे आता पाकिस्तान या मालिकेबाबत कोणता निर्णय घेते, हे सर्वात महत्वाचे ठरणार आहे.

## प्रभात जयसूर्या ठरला लंकेचा तारणहार

# गाले कसोटीत श्रीलंकेचा न्यूझीलंडवर 63 धावांनी विजय



वृत्तसंस्था
■ गाले

येथे सुरू असलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात श्रीलंकेने न्यूझीलंडचा ६३ धावांनी पराभव केला. सोमवारी पाचव्या दिवशी न्यूझीलंडचा संघ कालच्या 207 धावांच्या धावसंख्येत केवळ ४ धावा जोडू शकला आणि २११ धावांवर सर्वबाद झाला. सामन्यात 9 विकेट घेतल्याबद्दल फिरकीपटू प्रभात जयसूर्याला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

275 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या न्यूझीलंडची सुरुवात चांगली झाली नाही. संघाने पहिली विकेट 6 धावांवर गमावली. रचिन रवींद्रने संघाकडून सर्वाधिक 92 धावा केल्या. दुसऱ्या डावात श्रीलंकेकडून प्रभात जयसूर्याने 5 आणि रमेश मेंडिसने 3 बळी घेतले, तर धनंजय डी सिल्वा आणि असिथा फर्नांडोने प्रत्येकी 1 बळी घेतला.

तत्पूर्वी, चौथ्या दिवसाचे दुसरे सत्र सुरू होण्यापूर्वीच श्रीलंकेचा संघ दुसऱ्या डावात 309 धावांत सर्वबाद झाला होता. श्रीलंकेने पहिल्या डावात 305 धावा केल्या होत्या आणि प्रत्युत्तरात न्यूझीलंडने पहिल्या डावात 340 धावा केल्या होत्या.

न्यूझीलंडकडून दुसऱ्या डावात रचिन रवींद्रने सर्वाधिक ९२ धावा केल्या. त्याने टॉम ब्लंडेलसोबत 56 धावा जोडल्या, पण तो संघाला पराभवापासून वाचवू शकला नाही. रचिनने आपल्या खेळीत 9 चौकार आणि 1 षटकार लगावला. सर्वाधिक धावा करण्याच्या बाबतीत विल्यमसनने रॉस टेलरला मागे टाकले आहे. विल्यमसनने आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत 359 सामन्यांच्या 525 डावांमध्ये 18,213 धावा केल्या आहेत.

**दुसऱ्या डावात प्रभातने 68 धावांत पाच बाद केले**

*श्रीलंकेचा मॅच विनर प्रभात जयसूर्या ठरला. त्याने पहिल्या डावात 4 तर दुसऱ्या डावात 5 बळी घेतले. त्याने विल्यमसन, ब्लंडेल, ग्लेन फिलिप्स, रचिन रवींद्र आणि विल्यम ओ'रुर्के यांना बाद केले. 30.4 षटकांच्या गोलंदाजीमध्ये प्रभातने 7 मेडन्स टाकल्या आणि 68 धावांत पाच गडी बाद केले.*





*मुंबई : जिल्हा क्रीडा काऊंसील, मुंबई उपनगरतर्फे 13 सप्टेंबर रोजी इंटर स्कूल वेटलिफ्टिंग स्पर्धा 2024-25 चे आयोजन नॅशनल कॉलेज, वांद्रे येथे करण्यात आले होते. यामध्ये टी.पी.भाटिया सायन्स कॉलेज कांदिवलीची रोशनी सिंह हिने सुवर्णपदक पटकावले. रोशनीला निलेश पोसमपेलू, सर मधुकर पिसाळ व संदेश पोर्लेकर या शिक्षकांचे विशेष मार्गदर्शन लाभले.*

# भरत गोगावलेंनी स्वीकारला एसटी महामंडळ अध्यक्षपदाचा पदभार

प्रतिनिधी
■ मुंबई

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे आमदार भरत गोगावले यांनी आज महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (MSRTC) अध्यक्षपदाचा पदभार सांभाळला.

राज्यात महायुती सरकार अस्तित्वात आले तेव्हापासूनच भरत गोगावले यांना मंत्रीपद मिळणार अशी चर्चा होती. पण काही कारणांमुळे ते त्यांना मिळाले नाही. त्यामुळे ते नाराज होते. पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांची एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करून त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. या पदाला राज्यमंत्रीपदाचा दर्जाही देण्यात आला आहे. त्यामुळे गोगावलेंचे मंत्रीपदाचे स्वप्नही एका अर्थाने पूर्ण झाले आहे. दरम्यान गोगावले यांनी पदभार स्वीकारताच राज्यभरातील एसटी बसस्थानकामध्ये सुधारणा करण्याचे आदेश दिले.



# जोगेश्वरीतील महाआरोग्य शिबीरात 5 हजार पेक्षा जास्त नागरीकांनी घेतला लाभ

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्रातील जनतेचे आरोग्य सुद्रुढ राहावे, यासाठी मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राचे खासदार रविंद्र वायकर यांच्या मार्गदर्शना खाली शिवेसेने तर्फे जोगेश्वरी पूर्व येथे आयोजीत विनामुल्य महा आरोग्य शिबीरात वायकर यांनी अवयव दानाचा संकल्प करीत अर्ज भरला. या शिबीराचा सुमारे 5 हजार पेक्षा जास्त लोकांनी लाभ घेतला.

दिवसेंदिवस वाढत जाणारी व न परवडणारी उपचार पद्धती, आर्थिक बाबीमुळे अनेक रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नाहीत. यावर परिणामकारक उपाययोजना तसेच रोगाचे निदान वेळीच व्हावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून खासदार रविंद्र वायकर दरवर्षी आरोग्य शिबिराचे आयोजन करतात. या शिबिरात विविध रोगांवर डॉक्टरांचे मार्गदर्शन, उपचार तर मिळातातच तसेच विनामुल्य औषधे देण्यात येतात. रविवारी श्यामनगर तलाव येथे महा आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उदघाटन खासदार रविंद्र वायकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या शिबिरात लोकसभा क्षेत्रातील दिव्यांग बांधवाना

## खा. रविंद्र वायकरांनी केला अवयव दानाचा संकल्प





आवश्यक्यतेनुसार व्हीलचेअर, नेक बेल्ट, वॉकर, गुडघापट्टी, आधार काठी, मोफत औषधे व चष्मे यांचे वाटप करण्यात आले.. शिबिरात अस्थी रोग, बाल रोग, स्त्री रोग, दंत रोग, नाक-कान-घसा, मधुमेह, रक्त तपासणी, डोळे तपासणी, हाडांची ठीसुळता, त्वचा रोग, सर्वसाधारण रोग आदींची तपासणी तज्ञ डॉक्टरांकडून करण्यात आली. यात आयुर्वेदिक व होमीयोपथीक उपचार पद्धतीचा ही शिबिरात समावेश करण्यात आला होता. या शिबीरात अवयव दानाचा स्टॉल उभारण्यात आला होता. खासदार रविंद्र वायकर यांनी हा फॉर्म भरून अवयव दानाचा संकल्प केला.

या शिबिरात मुंबई महानगर पालिकेच्या के. ई. एम, नायर, ट्रॉमा, कूपर रुग्णालयातील डॉक्टर, त्याचं बरोबर डॉ. रत्नपारखी, डॉ. राहुल महाले, डॉ. अमेय पोतनीस, डॉ. पोतनीस, डॉ. सावंत, डॉ. काटे, डॉ. हजारी, डॉ. आरीफ, डॉ. प्रवीण बांगर आदी डॉक्टर सहभागी झाले होते.न रोटरी क्लब, सेवाभावी संस्था सहभागी झाल्या होत्या.

# आयोटेकवर्ल्ड आणि इफको भागीदारीमुळे कृषी उत्पादनात वाढ

प्रतिनिधी
■ मुंबई

भारतातील आघाडीची ड्रोन तंत्रज्ञान कंपनी आयोटेकवर्ल्ड एविगेशन आणि एक प्रमुख सहकारी संस्था इफको यांच्या भागीदारीमुळे डिसेंबर २०२३ पासूनच्या केवळ ८ महिन्यांत ११ भारतीय राज्यांतील ५०० पेक्षा जास्त शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबांवर सकारात्मक परिणाम झाला आहे. या भागीदारीतून ५०० ड्रोन शेतीच्या उत्पादकतेत वाढ करण्यासाठी समर्पित केले गेले आहेत. या उपक्रमाचा उद्देश शेती पद्धतींमध्ये क्रांती घडवून आणणे आणि भारतातील शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्याचा आहे.

नुकतीच आयोटेकवर्ल्ड आणि इफको यांनी 'एग्रीबोट' ड्रोन ग्राहकांसाठी एक विशेष मर्यादित कालावधीसाठी ऑफर जाहीर केली आहे, ज्यात शेतकरी आणि सेवा प्रदात्यांना आधुनिक ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करण्याची संधी मिळणार आहे. या अनन्य प्रोत्साहन योजनेअंतर्गत इफको 'एग्रीबोट' ड्रोन कोणत्याही एकर मर्यादेशिवाय देत आहे, ज्यामुळे सहभागी शेतकऱ्यांना अधिकाधिक फायदा होऊ शकतो. आयोटेकवर्ल्ड आणि इफको यांच्यातील या कराराचे उद्दिष्ट ३० लाख एकर शेतजमीन कव्हर करण्याचे आहे ज्यात हरियाणा, पंजाब, उत्तर प्रदेश, राजस्थान, आंध्र प्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्र, गुजरात, जम्मू-कश्मीर, मध्य प्रदेश आणि बिहार यासह अनेक राज्यांमध्ये पसरलेल्या शेतजमिनीचा समावेश आहे.

# हाकेच्या अंतरावर राहणाऱ्या ठाकरेंना संक्रमण शिबीरातील भाडेकरुंचा आक्रोश दिसला नाही का?

## डॉ. श्रीकांत शिंदे यांची खरमरीत टीका

प्रतिनिधी
■ मुंबई

मुख्यमंत्री असताना आठ मजली मातोश्री-२ उभारले मात्र येथून हाकेच्या अंतरावर संक्रमण शिबीरात दयनीय अवस्थेत राहणाऱ्या २० हजार कुटुंबांचा आक्रोश दिसला नाही का, अशी खरमरीत टीका शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर केली. जनसंवाद यात्रेच्या तिसऱ्या टप्प्यात डॉ. शिंदे यांनी काल मुंबई उत्तर-मध्य लोकसभेतील चांदिवली आणि वांद्रे पूर्व विधानसभेसंदर्भात एमआयजी क्लब येथे आढावा बैठक घेतली. यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.



ते पुढे म्हणाले की, मुंबईतील इतर मतदार संघाच्या तुलनेत वांद्रे पूर्व विधानसभेत घरांचा प्रश्न सर्वाधिक गंभीर आहे. सगळ्यात जास्त बेघर लोक देखील याच मतदार संघात आहेत. शिवालिकच्या प्रकल्पातील रहिवाशी तब्बल १२ वर्ष ट्रान्झिट कॅम्पमध्ये राहत आहेत, मात्र हाकेच्या अंतरावर राहणाऱ्या माजी मुख्यमंत्र्यांना त्या २० हजार रहिवाशांचा आक्रोश दिसला नाही का, अशी टीका त्यांनी केली.शासकीय वसाहतींबाबत नुकतीच मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली. ज्ञानेश्वर नगर, भारत नगरमधील रहिवाशांचा घरांचा प्रश्न गंभीर आहे. याबाबत देखील अडचणी दूर करु, असे ते म्हणाले.

मुंबईकरांना त्यांच्या हक्काच्या घराची स्वप्नपूर्ती हे सरकार करेल. त्याची सुरुवात रमाबाई आंबेडकर नगरमधून झाली आहे. तेथील हजारो रहिवाशांना घरभाडे रक्कम अदा करण्यात आली. चांदिवलीतील ४००० लोकांना घराची चावी दिली आणखी १२०० लोकांना चावी दिली जाईल, असे डॉ. शिंदे म्हणाले.

अडीच वर्ष मुख्यमंत्री असताना या रहिवाशांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नव्हता. तेव्हा ते घरी बसून राहिले. आता विशिष्ट वर्गाच्या मतदानासाठी त्यांना भडकवले जाते आणि मतांचे धुव्रीकरण केले जात आहे, त्यामुळे जे केवळ मतांसाठी येतात त्या लोकांपासून सावध रहा, असे आवाहन खासदार डॉ. शिंदे यांनी केले.

# कोकणात जाणाऱ्या सर्व एक्सप्रेस गाड्यांना भांडुप स्थानकात थांबा द्यावा

## खासदार संजय दिना पाटील यांची मागणी

■ मुंबई

मुंबईत भांडुप ते विक्रोळी दरम्यान लाखो कोकणवासी राहतात. त्यांना कोकणात जाण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस किंवा दिवा रेल्वे स्थानकावर जावे लागते. याचा सर्वाधीक त्रास महिला, लहान मुले व वृद्धाना होतो. यासाठी भांडुप रेल्वे स्थानकात कोकणला जाणा-या व येणा-या सर्व गाड्यांना थांबा देण्यात यावा, तसेच दोन्ही प्लॅटफार्मची लांबी वाढविण्यात यावी, अशी मागणी ईशान्य मुंबई महाविकास आघाडीचे खासदार संजय दिना पाटील यांनी रेल्वे प्रशासनाकडे केली आहे. खा. संजय पाटील हे २००९ ते २०१४ या दरम्यान खासदार असताना त्यांनी कोकणात जाणा-या व येणा-या सर्व गाड्यांना भांडुप रेल्वे स्थानकात थांबा देण्यात यावा अशी मागणी केली होती. याबाबत रेल्वेच्या महाव्यवस्थापका बरोबर झालेल्या बैठकीत हा मुद्दा मांडण्यात आला होता. त्यावेळी रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आले होते की सर्वे करुन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. मात्र आजगायत याबाबत काहीच कार्यवाही न झाल्याने खा. संजय दिना पाटील यांनी हा मुद्दा पुन्हा उपस्थित करीत ही मागणी केली आहे.

# कोकण मराठी साहित्य परिषदेतर्फे वाङमयीन पुरस्कारासाठी साहित्य पाठविण्याचे आवाहन

प्रतिनिधी
■ मुंबई

कोकण मराठी साहित्य परिषदेतर्फे कोकणातील सभासद साहित्यिकांना विविध वाङमयीन व वाङमयेतर पुरस्कार प्रतिवर्षी दिले जातात. सन २०२३ - २४ साठी घोषित होणाऱ्या वाड्मयीन पुरस्कारासाठी पुस्तके मागविण्यात येत आहे. हे सर्व पुरस्कार कोकण मराठी साहित्य परिषदेच्या कोकणातील सभासद असणाऱ्या लेखकांसाठी आहेत.

या पुरस्कारांमध्ये प्रथम श्रेणीचे अकरा पुरस्कार, द्वितीय श्रेणीचे पाच, विशेष श्रेणीचे तीन पुरस्कार आणि वाड्मयेतर बारा पुरस्कार दिले जाणार असून, यापैकी प्रथम श्रेणीच्या पुरस्कारासाठी पाच हजार रुपये, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि द्वितीय व विशेष पुरस्कारासाठी प्रत्येकी तीन हजार, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र प्रदान केले जाणार आहे.

यामध्ये प्रथम श्रेणी पुरस्कारात र. वा. दिघे कादंबरी पुरस्कार, वि. सी. गुर्जर कथासंग्रह पुरस्कार, आरती प्रभू कविता संग्रह पुरस्कार, धनंजय कीर स्मृती आत्मचरित्र पुरस्कार, श्रीकांत शेट्ये स्मृती चरित्र पुरस्कार, प्रभाकर पाध्ये स्मृती समीक्षा पुरस्कार, भाई भगत चित्रपट - नाट्य - विषयक पुरस्कार, अनंत काणेकर ललित गद्य पुरस्कार, प्र. श्री. नेरुरकर स्मृती बालवाड्.मय पुरस्कार, वि. कृ. नेरुरकर स्मृती संकीर्ण पुरस्कार, फादर स्टीफन सुवार्ता वैचारिक पुरस्कार यांचा समावेश आहे. तर विशेष पुरस्कारामध्ये वि. वा. हडप स्मृती कादंबरी पुरस्कार, विद्याधर भागवत स्मृती कथासंग्रह पुरस्कार, वसंत सावंत स्मृती कविता पुरस्कार, अरुण आठल्ये स्मृती संकीर्ण पुरस्कार, रमेश कीर नाटक - एकांकिका पुरस्कार व सौ. लक्ष्मीबाई व न्यायमूर्ती राजाभाऊ गवांदे ललित गद्य पुरस्कारासाठी कोकणासह गोवा - कारवार - बेळगाव या प्रदेशातील लेखकांचाही विचार केला जाणार आहे.

पुरस्कारासाठी आपल्या पुस्तकाच्या दोन प्रती ३१ ऑक्टोबर २०२४ पूर्वी केंद्रीय कार्यवाह, कवी केशवसुत स्मारक संकुल, मालगुंड पो. मालगुंड ता. जि. रत्नागिरी - ४१५६१५ या ठिकाणी पाठवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

या पुरस्कारासाठी लेखक, कवी हे कोकण मराठी साहित्य परिषदेच्या कार्यक्षेत्रातील (सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, पालघर, ठाणे, मुंबई, नवी मुंबई) या परिसरातील आणि कोकण मराठी साहित्य परिषदेचे आजीव सभासद असणे आवश्यक असून, तशा प्रकारचे कोमसाप जिल्हाध्यक्ष अथवा शाखाध्यक्षांचे प्रमाणपत्र किंवा सभासद पावतीची छायांकित प्रत यासोबत जोडणे आवश्यक आहे. पुस्तकाचा वाङमय प्रकाराचा स्पष्ट निर्देश लेखकाने पुरस्कारासोबत करावयाचा आहे. वरील पुरस्कारासाठी पुस्तके ही १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत प्रसिद्ध झालेली असावीत. तरी या पुरस्कारासाठी जास्तीत जास्त सभासदांनी पुस्तके पाठविण्याचे आवाहन कोमसापच्या केंद्रीय अध्यक्षा नमिता कीर, केंद्रीय कार्याध्यक्ष प्रा. डॉ. प्रदीप ढवळ यांनी केले आहे.

गृहनिर्माण विभाग
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई

SRA/CO/OW/२०२४/५१२५८
सहकार कक्ष, झो.पु.प्रा.
दिनांक : २०/०९/२०२४

-: सर्वसाधारण सभा घेण्यासाठीची नोटीस :-

तथागत गौतम बुध्द एस.आर. ए. सहकारी गृहनिर्माण संस्था (नियो), न.भू.क्र. १८०८ (भाग) आणि १७७६ / अ (भाग), भिमनगर, व्ही. एम. पवार चाळीच्या बाजूला, सर्वोदय विद्यालय जवळ, घाटकोपर (प), मुंबई- ४०० ०८६ या संस्थेचा प्राधिकरणाकडील परिपत्रक क्र. १४४ (ड) नुसार प्रस्ताव या विभागास प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर संस्थेची सर्वसाधारण सभा आयोजित करणेकरीता मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, (पुर्व व पश्चिम उपनगरे), झोपुप्रा यांनी दि. १९/०८/२०२४ रोजीच्या टिप्पणीद्वारे माझी नियुक्ती केलेली आहे.

त्यानुसार प्राधिकरणाकडील परिपत्रक क्र. १४४ (ड) नुसार सदर संस्थेची सर्वसाधारण सभा दि. ०५/१०/२०२४ रोजी सकाळी ११ वाजता, स्थळ : सेंट्रल कम्युनिटी हॉल, हिराचंद देसाई म्युनिसिपल मार्केटच्या समोर, घाटकोपर मेट्रो स्टेशन जवळ, हिराचंद देसाई रोड, घाटकोपर (प), मुंबई- ४०० ०८६ येथे आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सदर वेळेस परिशिष्ट - २ मधील सर्व झोपडीधारकांनी मतदानासाठी उपस्थित रहावे, ही विनंती.

-: सभेपुढील विषय :-

१) संस्थेचे मुख्यप्रवर्तक व इतर प्रवर्तक यांची निवड करणे.
२) संस्थेचे विकासक व वास्तुविशारद यांची निवड करणे.

(अरुण जाधव)
प्राधिकृत अधिकारी तथा
सहकारी अधिकारी श्रेणी १, झोपुप्रा, बृहन्मुंबई

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २०/०९/२०२४.**

: सुचना :

१. सदर सभेस फक्त प्रारुप परिशिष्ट - २ मध्ये नमूद झोपडीधारकास प्रवेश व मतदानाचा हक्क राहील. अन्य व्यक्ती / झोपडीधारकास सभेच्या हॉलमध्ये प्रवेश राहणार नाही किंवा त्यांना मतदानाचा हक्क राहणार नाही.
२. सभेस संस्थेच्या परिशिष्ट - २ मधील पात्र झोपडीधारक पती / पत्नी या दोघांपैकी एकाच व्यक्तीस उपस्थित राहता येईल. इतर नातेवाईकांना अथवा प्रतिनिधींना उपस्थित राहता येणार नाही.
३. प्रारुप परिशिष्ट - २ मधील व्यक्तींनी स्वतःची ओळख होईल अशा ओळखपत्रासह (आधार कार्ड / निवडणूक ओळखपत्र / पॅनकार्ड इत्यादी) उपस्थित रहावे.
४. संस्थेच्या सभासदांना सभागृहात प्रवेश देते वेळी त्यांनी त्यांची ओळख पटवून सभेच्या उपस्थिती नोंदवहीत स्वाक्षरी करुन व बायोमॅट्रीक पध्दतीने उपस्थिती नोंदविल्यानंतरच सभागृहात प्रवेश दिला जाईल.
५. सभेच्या कामकाजाचे प्राधिकरणामार्फत व्हिडीओ चित्रिकरण करण्यात येईल.

प्रति,
श्री. / श्रीम........................................परि- २ अ.क्र. --------
तथागत गौतम बुध्द एस. आर. ए. सहकारी गृहनिर्माण संस्था (नियो), न.भू.क्र. १८०८ (भाग) आणि १७७६ / अ (भाग), भिमनगर, व्ही. एम. पवार चाळीच्या बाजूला, सर्वोदय विद्यालय जवळ, घाटकोपर (प), मुंबई - ४०० ०८६.
**संस्थेचे नोटीस बोर्डवर माहितीसाठी,**
तथागत गौतम बुध्द एस.आर. ए. सहकारी गृहनिर्माण संस्था (नियो), न.भू.क्र. १८०८ (भाग) आणि १७७६ / अ (भाग), भिमनगर, व्ही.एम. पवार चाळीच्या बाजूला, सर्वोदय विद्यालय जवळ, घाटकोपर (प), मुंबई - ४०० ०८६.
**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**
मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, (पुर्व व पश्चिम उपनगरे), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई

## सुरतमध्ये रेल्वे रुळावरुन उतरवण्याचा कट:रेल्वे कर्मचारीच निघाला आरोपी

**सुरत:** शुक्रवारी पहाटे गुजरातमधील सुरतमधील किम रेल्वे स्थानकाजवळ रेल्वे ट्रॅकला छेडछाड करण्यात आली. येथे अप लाईनच्या ट्रॅकवरून फिश प्लेट आणि 71 चाव्या काढण्यात आल्या. त्याचवेळी एकाच ट्रॅकवर दोन फिश प्लेट ठेवण्यात आल्या होत्या. पण, वेळीच की-मॅन सुभाष कुमार यांना ट्रॅकवर ठेवलेली फिश प्लेट दिसली, त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. आता या प्रकरणात एक धक्कादायक खुलासा समोर आला आहे की, हा कट खुद्द सुभाष कुमार यानेच रचला होता. रेल्वेकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रमोशन मिळवण्यासाठी सुभाषने हा संपूर्ण कट रचला होता. त्यानेच चाव्या आणि फिश प्लेटही काढल्या होत्या. आता यात सुभाषने कोणत्या लोकांची मदत घेतली होती याचा तपास पोलिस करत आहेत. देशात सातत्याने घडणाऱ्या गाड्या रुळावरून घसरण्याच्या घटनांवरून सुभाष यांना याची कल्पना आली. मोठी दुर्घटना टाळण्यासाठी त्यांनी केलेल्या सतर्कतेमुळे लवकरच पदोन्नती मिळेल, असे त्यांना वाटत होते.



# इस्रायलने लेबनॉनवर 300 क्षेपणास्त्रे डागली, 182 ठार

## हल्ल्याआधी मेसेज पाठवला, लोकांनी सुरक्षित ठिकाणी जावे | सलग 4 चौथ्या दिवशी हल्ला

**वृत्तसंस्था**
**जेरुसलेम**

इस्रायलने सोमवार, 23 सप्टेंबर रोजी लेबनॉनवर 300 हून अधिक क्षेपणास्त्रे डागली. या हल्ल्यात आतापर्यंत 182 जणांचा मृत्यू झाला आहे. त्याचबरोबर 700 हून अधिक लोक जखमी झाले आहेत.

हल्ल्यानंतर लेबनॉनमधील शाळा दोन दिवसांसाठी बंद ठेवण्यात आल्या आहेत. लोक सुरक्षित स्थळी जाताना दिसले. त्यामुळे अनेक शहरात वाहतूक कोंडी होत आहे. सलग चौथ्या दिवशी इस्रायलचा हा क्षेपणास्त्र हल्ला आहे. या काळात लेबनीज शहरांवर 900 हून अधिक क्षेपणास्त्रे डागण्यात आली, ज्यात आतापर्यंत 250 हून अधिक लोक मारले गेले आहेत.



आयडीएफचे प्रवक्ते रिअर ॲडमिरल डॅनियल हगरी यांनी सोशल मीडियावर एक व्हिडिओ जारी केला आहे. आम्ही लेबनीज नागरिकांना त्यांच्या स्वतःच्या सुरक्षिततेसाठी धोक्याच्या क्षेत्रापासून ताबडतोब दूर जाण्याचा सल्ला देतो. इस्रायली लष्कर हिजबुल्लाहवर आणखी प्राणघातक हल्ले करणार आहे. हगारी यांनी सांगितले की, हिजबुल्लाने घरे आणि इमारतींमध्ये शस्त्रे साठा केली आहेत. जर तुम्ही अशा इमारतीत असाल जिथे शस्त्रे असतील तर ती लवकरात लवकर सोडा. ते म्हणाले की, लेबनॉनमधील सर्व नेटवर्क आणि प्लॅटफॉर्मवर हा संदेश अरबी भाषेत पाठवला जात आहे.

इस्रायली सैन्याने अरबी भाषेत पाठवला संदेश, गाझा युद्धापूर्वीही हे केले होते अल जझीराच्या वृत्तानुसार, लेबनीज मीडियाने असेही म्हटले आहे की, इस्रायली सैन्य सोशल मीडियावर अरबी भाषेत संदेश पाठवत आहे. मात्र, इस्रायलचा हा सल्ला किती लोकांनी स्वीकारला हे अद्याप कळू शकलेले नाही. वृत्तानुसार, सीमेजवळ राहणारे इस्रायल-लेबनीज लोक रोजच्या बॉम्बस्फोटांमुळे सुरक्षित ठिकाणी गेले आहेत.

याशिवाय दक्षिण लेबनॉनमधील लोकांनाही अनोळखी नंबरवरून कॉल येत आहेत. यामध्ये लोकांना हिजबुल्लाह वापरत असलेल्या कोणत्याही चेकपॉईंटपासून ताबडतोब दूर जाण्यास सांगितले जात आहे. इस्रायली लष्कराने गाझामध्ये युद्ध सुरू करण्यापूर्वी लोकांना असाच इशारा दिला होता. त्यानंतर लोकांना गाझा सोडून जाण्यास सांगणारी पत्रके आकाशातून टाकण्यात आली.

# समाजात द्वेष पसरवणे आणि सूडाचे राजकारण हेच भाजपचे धोरण!

## राहुल गांधी यांचा हल्लाबोल



**वृत्तसंस्था**
**श्रीनगर**

भाजप आणि संघपरिवार देशात द्वेष पसरवून दुहीची बिजे पेरत असल्याचा हल्लाबोल काँग्रेसचे नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला आहे. त्यांना केवळ द्वेष पसरवणे माहित आहे आणि त्यांचे राजकारण सूडाचे आहे असाही निशाणा त्यांनी यावेळी साधला.

राहुल गांधी यांनी सोमवारी जम्मू काश्मीर येथील पूंछ येथे प्रचार रॅली काढली होती. यावेळी ते म्हणाले की, आमची प्रमुख मागणी आहे की, पुन्हा एकदा राज्याचा दर्जा मिळावा. त्यासाठी आम्ही त्यांच्यावर दबाव आणू. त्यांनी तसे केले नाही तर आम्ही करु. नरेंद्र मोदी यांनी देशात बेरोजगारी पसरवली आहे. त्यांनी हजारो कोटी रुपये आपल्या मित्रपरिवाराला माफ केले आहेत. आम्हाला वाटते तुमचे सरकार तुम्ही चालवावे मात्र तुमचे सरकार दिल्लीतून चालते. तुमचे सरकार श्रीनगर आणि जम्मू येथून चालते असा हल्लाबोलही यावेळी केली. शिवाय द्वेषाने द्वेषाला संपवता येत नाही, तर तो प्रेमानेच संपवता येते असेही ते म्हणाले.

भाजप नेहमी समाजात तेढ पसरविण्याचे काम करतात आणि तेच त्यांनी येथे केले आहे. ते आमच्या पहाडी बांधवांना आणि गुर्जर बांधवांमध्ये आपापसात भांडाणे लावतात. आमच्यासाठी सर्व लोकं समान आहेत आणि आम्ही कोणालाही मागे सोडणार नाही. आम्ही सर्वांना प्रेमाने सोबत घेऊन चालणार आहोत. तुम्ही आमच्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी काम करा असे आवाहनही यावेळी केले.

राहुल गांधी म्हणाले की, मी तुम्हा सर्वांचे आभार मानतो. एवढ्या सुंदर ठिकाणी तूम्ही बोलावले, आज मी इथे फक्त दोन-तीन तासांसाठी आहे. तुम्हाला माझ्याकडून जे काही हवे आहे आणि जे काही मुद्दे तुम्हाला सरकारसमोर मांडायचे आहेत, ते तुमचे मुद्दे संसदेत मांडेन. पुढच्या वेळी दोन तीन दिवसांसाठी इथे येईन असेही ते म्हणाले.

पान ९ वरुन

### मुंबई-गोवा महामार्गाची चौकशी करु

होईल पण त्यापूर्वी अन्य काही पक्षांना महाविकास आघाडीत समाविष्ट करण्याचा माझा विचार आहे. कम्युनिस्ट पक्ष, शेकाप सारख्या पक्षांना महाविकास आघाडीत घेण्याचा विचार सुरू आहे, असे शरद पवार म्हणाले. महाराष्ट्रात एक चांगला प्रगतशील पर्याय उभा करण्याचा आमचा प्रयत्न आहे. महाराष्ट्रात चांगले सरकार आम्ही देऊ. जागावाटप केल्यानंतरच उमेदवार जाहिर केला जाईल. चिपळूणची जागा आम्हाला मिळाल्यास आम्ही आमचा उमेदवार जाहिर करू, असे त्यांनी स्पष्ट सांगितले. लाडक्या बहिणी वरून सुरू असलेल्या श्रेयवादावर शरद पवार म्हणाले की, योजना ही सरकारच्या पैशातून असते, कोण खिशातून पैसे देत नाही. मी 24 वर्ष महाराष्ट्राच्या राजकारणात होतो. पण आम्ही कधी असे केले नाही. महाशक्ती या तिसऱ्या आघाडी बाबत शरद पवार म्हणाले की, लोकशाहीत सर्वांना निवडणूक लढवण्याचा अधिकार आहे. यावेळी माजी सहकारमंत्री बाळासाहेब पाटील, माजी आमदार रमेश कदम, जिल्हाध्यक्ष सुरेश बने, सरचिटणीस प्रशांत यादव उपस्थित होते.

### 'कुणबी'च्या तीन पोटजाती 'ओबीसी'मध्ये

मंत्रिमंडळ बैठकीतील महत्वाचे निर्णय

1. लोहगाव विमानतळाचे नाव जगद्गुरु संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ पुणे असे करण्याचा निर्णय.
2. बालगृहे निरीक्षणगृहातील कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना : शिक्षकांना वरिष्ठ निवड श्रेणी
3. धान उत्पादकांना दिलासा : आता प्रतिक्विंटल चाळीस रुपये अतिरिक्त भरडाई दर
4. कुणबीच्या तीन पोटजातींचा इतर मागासवर्ग यादीमध्ये समावेश
5. जुन्नर येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय
6. शिरूर ते छत्रपती संभाजीनगर ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्ग
7. करदात्यांचे हित लक्षात घेऊन जीएसटी अधिनियमात सुधारणा
9. यवतमाळ, जळगांव सूतगिरणींना थकबाकी परतफेडीसाठी हप्ते
10. क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे यांना सूसज्ज क्रीडा सुविधा उभारण्यासाठी वांद्रेतला भूखंड
11. ग्रामसेवक आणि ग्रामविकास अधिकारी पदांचे एकत्रीकरण करून ग्रामपंचायत अधिकारी पद
12. राज्यातील सरपंच उपसरपंच यांच्या मानधनात दूप्पट वाढ
13. मुंबई उच्च न्यायालयाच्या वांद्रेतील नव्या संकुलाचे बांधकाम राज्याचा महत्त्वपूर्ण प्रकल्प
14. हरित हायड्रोजन धोरणात अँकर युनिटची पारदर्शकपणे निवड करणार
15. एसटी महामंडळाच्या जमिनी बीओटी तत्वावर विकसित करणार : साठ वर्षाचा भाडेपट्टा करार
16. ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ
17. राजपूत समाजासाठी वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ
18. राज्यातील १४ आयटीआय संस्थांचे नामकरण
19. छत्रपती संभाजीनगर, नागपूर येथील विधी विद्यापीठांना सात कोटी रूपये
20. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना थेट नियुक्ती देण्याच्या निर्णयात सुधारणा
21. जलसंपदा कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी
22. श्रीरामपूर तालुक्यातील मौजे हरेगाव येथील शेती महामंडळाच्या जमिनी मुळ मालकांना परत करणार
23. दूध अनुदान योजना सुरु राहणार. उत्पादकांना गायीच्या दूधासाठी लीटरमागे सात रुपयांचे अनुदान
24. महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण जाहीर

# आमिरचा 'लापता लेडीज' ऑस्करमध्ये परदेशी चित्रपट श्रेणीत अधिकृत एंट्री मिळाली

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

'लापता लेडीज' या चित्रपटाला ऑस्कर 2025 मध्ये भारताकडून अधिकृत एंट्री मिळाली आहे. हा चित्रपट परदेशी चित्रपट श्रेणीत पाठवण्यात आला आहे. आमिर खानच्या प्रोडक्शन हाऊसच्या बॅनरखाली बनलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन किरण राव यांनी केले आहे. या चित्रपटात स्पर्श श्रीवास्तव, प्रतिभा रान्ता आणि नितांशी गोयल यांच्या प्रमुख भूमिका आहेत.




फिल्म फेडरेशन ऑफ इंडियाच्या निवड समितीचे अध्यक्ष जाहनू बरुआ यांनी सोमवारी ही घोषणा केली. त्यांनी सांगितले की, यावर्षी देशभरातील 29 चित्रपट ऑस्करसाठी पाठवण्याच्या शर्यतीत होते. यामध्ये विकी कौशलचा 'सॅम बहादूर', रणबीर कपूरचा 'एनिमल' आणि कार्तिक आर्यनचा 'चंदू चॅम्पियन' यांचा समावेश होता. 13 सदस्यांच्या ज्युरीने या 29 चित्रपटांमधून 'लापता लेडीज'ची निवड केली आहे. 97 व्या ऑस्करसाठी नामांकने 17 जानेवारी 2025 रोजी जाहीर केली जातील. ऑस्कर पुरस्कार सोहळा 2 मार्च 2025 रोजी होणार आहे.

'लापता लेडीज' हा चित्रपट यावर्षी 1 मार्च रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला होता. हा चित्रपट आमिरची दुसरी माजी पत्नी किरण राव हिने दिग्दर्शित केला होता. बॉक्स ऑफिसवर 25 कोटी रुपयांचा आजीवन कलेक्शन असूनही, समीक्षक आणि लोक दोघांनीही या चित्रपटाची खूप प्रशंसा केली. (डावीकडून उजवीकडे) अभिनेत्री नितांशी गोयल, दिग्दर्शक किरण राव, अभिनेता स्पर्श श्रीवास्तव आणि आमिर खानसोबत प्रतिभा रान्ता.

चित्रपटाची कथा ग्रामीण भागातून सुरू होते. गावात सध्या लग्नसराई सुरू आहे. दोन तरुण त्यांच्या नववधूंसोबत ट्रेनमध्ये चढले. दोन्ही नववधूंच्या चेहऱ्यावर पदर आहेत, त्यामुळे त्यांचे चेहरे दिसत नाहीत. प्रवास संपल्यानंतर दोन्ही नववधू खाली उतरून कुठेतरी गायब होतात. एक तरुण 'दीपक' चुकून दुसरी वधू 'पुष्पा'ला त्याच्या घरी घेऊन येतो. त्याची खरी पत्नी 'फूल' स्टेशनवरच राहते. जर वधूने पदर ओढलेला नसता तर कदाचित ती गायब झाली नसती. या मानसिकतेच्या आधारे चित्रपटाची रचना लिहिली गेली आहे.

# CAच्या आत्महत्येवर सीतारामन बरळल्या, आत्मशक्तीचा अभाव होता

## ती दबाव सहन करु शकली नाही...

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

पुण्यातील अर्न्स्ट अँड यंग इंडिया कंपनीच्या 26 वर्षीय सीए एना सेबॅस्टियन यांच्या निधनावर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या वक्तव्यानंतर वाद सुरू झाला आहे. सीतारामन यांनी तामिळनाडूतील एका खासगी वैद्यकीय महाविद्यालयातील एका कार्यक्रमात महिला सीए कामाचा दबाव सहन करू शकली नाही असे म्हणाल्या होत्या. दबाव सहन करण्याची शक्ती देवाकडून येते, म्हणून देवाचा आश्रय घ्या असे त्या म्हणाल्या होत्या.

यावर शिवसेनेच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी म्हणाल्या की, सीएच्या अभ्यासादरम्यान एनामध्ये दबाव सहन करण्याची ताकद निर्माण झाली होती, मात्र विषारी कार्यसंस्कृती आणि जास्त तास काम केल्यामुळे तिला आपला जीव गमवावा लागला. यावर चर्चा व्हायला हवी. तुम्ही पीडितेची थट्टा करणे थांबवा आणि थोडेसे संवेदनशील होण्याचा प्रयत्न करा. तुम्ही प्रयत्न केल्यास देव तुम्हाला मदत करेल.



गेल्या दोन दिवसांपासून चर्चेत असलेल्या एका मुद्द्यावर मी चर्चा करत आहे. आमची मुलं कॉलेज आणि युनिव्हर्सिटीमध्ये शिकायला जातात आणि चांगले रिझल्ट घेऊन बाहेर पडतात. एक कंपनी आहे, मी तिचे नाव घेणार नाही, पण ती या प्रकरणात गुंतलेली आहे. सीएचे चांगले शिक्षण घेतलेल्या महिलेला या कंपनीत कामाचा ताण सहन होत नव्हता. यामुळे तिने आत्महत्या केली. अशा परिस्थितीत कुटुंबांनी मुलांना शिकवले पाहिजे की त्यांना अभ्यास किंवा नोकरीचे दडपण हाताळायला शिकले पाहिजे. दबाव सहन करण्याची ही क्षमता दैवी कृपेनेच प्राप्त होऊ शकते. तुम्ही देवावर विश्वास ठेवा, देवाचा आश्रय घ्या आणि चांगली शिस्त शिका. यातूनच तुमची आत्मशक्ती वाढेल. जेव्हा आत्मशक्ती विकसित होईल तेव्हाच आंतरिक शक्ती येईल.

# वैवाहिक बलात्कारात पतींना सूट, उद्या सुप्रीम कोर्टात सुनावणी

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

पत्नीसोबत बळजबरीने शारीरिक संबंध ठेवल्याप्रकरणी पतीविरुद्ध गुन्हा दाखल करायचा की नाही, यावर मंगळवारी (24 सप्टेंबर) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. भारताचे सरन्यायाधीश (CJI) DY चंद्रचूड आणि न्यायमूर्ती जेबी पारदीवाला यांच्या खंडपीठासमोर यावर सुनावणी होणार आहे.

कर्नाटक उच्च न्यायालय आणि दिल्ली उच्च न्यायालयाच्या दोन निर्णयांविरोधात हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले आहे. याशिवाय अनेक जनहित याचिका दाखल झाल्या. हे सर्व एकत्र करून त्यावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे.

भारतीय न्याय संहितेच्या (BNS) कलम 63 (बलात्कार) च्या अपवाद 2 नुसार, वैवाहिक बलात्कार हा गुन्हा मानला जात नाही. मात्र, याप्रकरणी केंद्र सरकारलाही उत्तर दाखल करायचे आहे. कायदे बदलण्यासाठी चर्चेची गरज आहे, असे केंद्राचे म्हणणे आहे.

# चाईल्ड पॉर्न पाहणे, डाऊनलोड करणे हे देखील गुन्हेच

## सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**



चाइल्ड पॉर्नवर सर्वोच्च न्यायालयाने मोठा निकाल दिला आहे. मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द करुन सर्वोच्च न्यायालयाने चाइल्ड पोर्नोग्राफी पाहणे आणि डाऊनलोड करणे दोन्ही पॉक्सो कायद्यातंर्गत गुन्हा आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. याबाबतचा मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णयही सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला आहे.

एका प्रकरणात आरोपीने फक्त चाईल्ड पोर्नोग्राफी डाऊनलोड केली होती, त्याने ते कोणालाही पाठवले नव्हते, असे नमूद करत मद्रास न्यायालयाने आरोपीला दिलासा दिला होता. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, चाइल्ड पोर्नोग्राफीच्या जागी चाइल्ड सेक्शुअली अब्यूसिव्ह अँड एक्स्प्लॉयटेटिव्ह मटेरियल (सीएसईएएम) असे लिहिण्याचा सल्ला दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, शब्दांमध्ये काही बदल केल्यास अशा प्रकरणांचे गांभीर्य समाज आणि न्याय व्यवस्थेसमोर येणार आहे. चाइल्ड पॉर्नबद्दल चिंता व्यक्त करताना सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड आणि न्यायमूर्ती जेबी पार्डीवाला यांच्या खंडपीठाने सांगितले की, वास्तव आणि मुलांचे कायदेशीर संरक्षण यामध्ये समतोल राखणे आवश्यक आहे. खंडपीठाने म्हटले की चाइल्ड पॉर्नला CSEAM (बाल लैंगिक अत्याचार आणि शोषण करणारे साहित्य) म्हणून संबोधल्याने कायदेशीर चौकटीत एक नवीन दृष्टीकोन निर्माण होईल आणि मुलांच्या शोषणाविरुद्ध लढण्याचा नवा दृष्टीकोण दिसणार आहे.


खंडपीठाने या प्रकरणावर 19 एप्रिलला आपला निर्णय सुरक्षित ठेवला होता. न्यायालयाने सांगितले होते की, डिजीटल युगात मुलांच्या सुरक्षेसंदर्भात कायद्याशी जोडलेल्या गंभीर प्रश्नांची उत्तरे देणे गरजेची आहेत. जानेवारी 2024मध्ये मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एन आनंद वेंकटेश यांनी 28 वर्षीय एका तरुणाला दिलासा देत त्याच्याविरुद्धचा फौजदारी खटला रद्द केला होता. या तरुणावर चाइल्ड पॉर्न पाहण्याचा आणि डाउनलोड केल्याचा आरोप होता. न्यामूर्ती व्यंकटेश म्हणाले की, केवळ चाइल्ड पॉर्न पाहणे हा पॉक्सो आणि आयटी कायद्यांतर्गत गुन्हा मानला जाऊ शकत नाही.

जर मुलांचा पोर्नोग्राफीत वापर केला जात असेल तर त्याच्यावर पॉक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. मात्र त्या अपराधात थेट सहभागी नसून चाईल्ड पॉर्न पाहत असेल तर त्याच्यावर फौजदारी खटला चालवणे योग्य नाही असे स्पष्ट केले. उच्च न्यायालयाने आयटी कलमाअंतर्गत सेक्शन 67 बी चा हवाला देत सांगितले होते की, आरोपीने चाईल्ड पॉर्नोग्राफीची सामग्री ना पब्लिश केली आहे आणि नाही कोणाला पाठवले आहे. त्यामुळे त्याच्याविरुद्धचा अपराध सिद्ध होत नाही. मार्चमध्ये झालेल्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने उच्च न्यायालयाच्या या आदेशावर टीका केली होती. सर्वोच्च न्यायालयाने न्यायमूर्तींच्या कायदेशीर आकलनावरही प्रश्न उपस्थित केले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने म्हटले होते की, एकल न्यायाधीश असे कसे बोलू शकतात? हे भयावह आहे.

रिपब्लिकन पक्ष (खोरीपा)
राष्ट्रीय अध्यक्ष - नामंतरवीर मा. आमदार उपेंद्रजी शेंडे साहेब



रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक सरचिटणीस तसेच
राज्यसभेचे माजी उपसभापती दिवंगत नेते
बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांचा



जन्मशताब्दी सोहळा



बुधवार दि.२५ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १.०० वा.
स्थळ : हिंदी मोरभवन, सिताबर्डी, नागपूर.

अध्यक्ष : मा. उपेंद्रजी शेंडे साहेब, राष्ट्रीय अध्यक्ष
सहभाग : मा. देशक गिरीशबाबू खोब्रागडे, राष्ट्रीय सरचिटणीस
मा. प्रा: मा. गोपीचंद मेश्राम, राष्ट्रीय उपाध्यक्ष, मा. ॲड. शिवराज कोळीकर
मा. उत्तमराव गवई, राष्ट्रीय संघटक, डॉ. एन.व्हि.ढोके, राष्ट्रीय प्रवक्ते

निमंत्रक

मा.भाऊ निरभवणे, अध्यक्ष-महाराष्ट्र प्रदेश मा.डॉ.देवेश कांबळे, कार्याध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश
मा.जीवन बागडे, सरचिटणीस महा.प्रदेश मा.प्रा.अशोक ढोले, अतिरिक्त सरचिटणीस महाराष्ट्र प्रदेश
मा.भागवत कांबळे, अध्यक्ष मुंबई प्रदेश मा.विक्रांत पाटील, सरचिटणीस मुंबई प्रदेश

रिपब्लिकन विद्यार्थि फेडरेशन, रिपब्लिकन युवा आघाडी, रिपब्लिकन महिला आघाडी,
रिपब्लिकन कामगार आघाडी, सर्व आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते व भिम सैनिक.